# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे अधिवेशन, २०२३

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**बुधवार, दिनांक १९ जुलै, २०२३ / आषाढ २८, १९४५ (शके)**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **मुख्यमंत्री** | |
| **(२)** | **विशेष सहाय्य मंत्री** | |
| **(३)** | **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** | |
| **(४)** | **मृद व जलसंधारण मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(५)** | **अल्पसंख्यांक विकास व औकाफ, पणन मंत्री** | |
| **(६)** | **मदत व पुनर्वसन, आपत्ती व्यवस्थापन मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ७८**

---

### सांगली, मिरज आणि कुपवाड महानगरपालिकेने पथदिवे तसेच सार्वजनिक वीज देयकांचा भरणा न केल्याबाबत

**(१) * १८८०५ श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगली-मिरज आणि कुपवाड महानगरपालिका क्षेत्रातील रस्त्यांवरील पथदिवे वीज देयके व त्यांच्या विविध कार्यालयांतील सार्वजनिक वीज देयके दरमाह अकाउंट पेयी धनादेशाने महावितरणने निश्चित केलेल्या भरणा केंद्राकडे जमा होत असून, वीज देयके भरणा केंद्राकडे दिलेल्या धनादेशातून महानगरपालिकेचे पूर्ण वीज देयक न भरता खाजगी व्यक्तीची वीज देयके भरल्याची बाब सन २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सांगली-मिरज आणि कुपवाड महानगरपालिकेच्या वीज देयकातील गैरव्यवहाराला अडीच वर्षे पूर्ण होऊन देखील आजतागायत दोषींवर कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय ,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सांगली मिरज आणि कुपवाड महानगरपालिकेचे पूर्ण वीज देयके न भरता खाजगी व्यक्तींचे देयके भरणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) सदर अनियमिततेप्रकरणी सांगली शहर पोलीस स्टेशन येथे गुन्हा नोंदविण्यात आला आहे. वीज बिल देयके तयार करणाऱ्या महानगरपालिकेच्या ३ विभागातील जबाबदार एकूण ११ कर्मचाऱ्यांविरुध्द विभागीय चौकशीची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे. तसेच प्रतिनियुक्तीवरील २ अधिकाऱ्यांविरुध्द विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली आहे. विद्युत विभाग, लेखा परिक्षण विभाग व लेखा विभागातील कर्मचाऱ्यांच्या वेतनातून ३०% रक्कम वसुल करण्याचे आदेश महानगरपालिकेने दिले आहेत. तथापि, सदर आदेशास मा.औद्यौगिक न्यायालय, सांगली यांनी स्थगिती दिली आहे.

वीज बिल घोटाळयाबाबत मा.लोक आयुक्त यांचेकडे प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने मा.लोक आयुक्त यांनी याप्रकरणी विशेष चौकशी समिती (SIT) नियुक्त करण्याचे आदेश दिनांक २८/०४/२०२३ रोजी दिले असून त्यानुसार पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांचेस्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वरळी (मुंबई) येथील रस्ता रुंदीकरणामध्ये बाधित होणाऱ्या अनिवासी गाळेधारकांच्या पुनर्वसनाचे धोरण निश्चित करण्याबाबत

**(२) * १८९१८ श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरळी येथील ३०.५० मी. रुंदीच्या गणपतराव कदम मार्ग, केशवराव खाडे मार्ग, डॉ. ई. मोजेस मार्ग रुंदीकरणात बाधित होणाऱ्या खाजगी उपकर प्राप्त चाळींतील सर्व अनिवासी गाळेधारकांच्या पुनर्वसनाचे धोरण निश्चित होईपर्यंत बृहन्मुंबई महानगरपालिकेने दिलेल्या नोटीसींना तात्काळ स्थगिती देण्याची मागणी मा.लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे, तसेच आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेकडे दिनांक २७ एप्रिल, २०२३ रोजीच्या लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू मागणीच्या अनुषंगाने रस्ता रुंदीकरणात बाधित होत असलेल्या खाजगी उपकर प्राप्त चाळीतील अनिवासी गाळेधारकांना दिलासा देण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने दिलेल्या नोटीसींना स्थगिती देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) मा.लोकप्रतिनिधी यांचे दिनांक २७/०४/२०२३ रोजीचे पत्र आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेकडे आवश्यक त्या कार्यवाहीकरिता दिनांक ०५/०६/२०२३ रोजीच्या पत्रान्वये पाठविण्यात आले आहे.

प्रस्तावित मंजूर रस्ता रेषेनुसार सदर रस्त्यांचे रुंदीकरण होणे आवश्यक आहे. रस्ता रुंदीकरणात बाधित होणाऱ्या निवासी/अनिवासी पात्र प्रकल्पधारकांना महानगरपलिकेच्या पुनर्वसनाच्या प्रचलित धोरणानुसार पर्यायी सदनिका/गाळा/दुकान अथवा आर्थिक मोबदला देण्यात येतो.

सदर बांधकामांची पात्रता/अपात्रता निश्चित करण्याकरिता गाळेधारकांमार्फत सादर करण्यात आलेल्या पुराव्यांची पडताळणी महानगरपालिकेमार्फत सुरु आहे.

-----------------

## राज्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांना अनुदान देण्याबाबत

**(३) * १८९५६ श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अंबादास दानवे, श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यात माहे मार्च-एप्रिल, २०२३ मध्ये झालेल्या अवकाळी पाऊस व गारपिटीमुळे जिल्ह्यातील साठ हजार एकरवरील कांदा पीकाचे नुकसान झाले असून, शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर विक्रीसाठी आणलेला कांदा व्यापाऱ्यांनी २५ पैसे प्रति किलो दराने खरेदी केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील विशेषत: अकोला, वाशिम, बुलढाणा, यवतमाळ व अमरावती जिल्ह्यात कांदा पिकाची लागवड माहे जानेवारी, २०२३ मध्ये करण्यात येऊन काढणी दिनांक २० मे, २०२३ पर्यंत चालू असल्याने शासनाचा प्रती क्विंटल रुपये ३५० अनुदान देण्याचा दिनांक २७ मार्च, २०२३ रोजीचा शासन निर्णय केवळ ३१ मार्च,२०२३ अखेरपर्यंत विक्री होणाऱ्या कांद्यालाच लागू असल्याने तो पश्चिम विदर्भासाठी लागू होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने दिनांक १ फेब्रुवारी ते ३१ मार्च पर्यंत विक्री झालेल्या कांद्यावर बाजार समितीचा विक्री पावती पुरावा व ७/१२ उतारा आवश्यक असल्याची तसेच ई-पीक नोंदणी करण्याची अट घातल्याने शेतकऱ्याला अनुदानाचा लाभ मिळणार नसल्याकारणाने शेतकऱ्यांनी कांदा रस्त्यावर फेकल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शेतकऱ्यांनी केलेल्या मागणीनुसार बाजार समितीतील कांदा विक्रीची मूळ पावती ग्राह्य धरण्याबाबत तसेच सदर अनुदानाला मुदतवाढ देण्याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बाजार समितीतील कांदा विक्रीची मूळ पावती ग्राह्य धरून अनुदानास मुदतवाढ देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अब्दुल सत्तार :** (१) अमरावती विभागातील अकोला व वाशिम जिल्ह्यामधील कृषी उत्पन्न बाजार समिती अकोला व वाशिम येथे माहे मार्च २०२३ मध्ये सरासरी दर प्रति क्विंटल रुपये ८०० /- व एप्रिल, २०२३ मध्ये प्रति क्विंटल रुपये ५०० प्राप्त झाले आहेत.

(२) दिनांक २७ मार्च, २०२३ या शासन निर्णयानुसार जे शेतकरी लेट खरीप हंगामातील लाल कांदा दिनांक १ फेब्रुवारी, २०२३ ते दिनांक ३१ मार्च, २०२३ या कालावधीत मुंबई कृषी उत्पन्न बाजार समिती वगळता राज्यात सर्व संबंधित कृषी उत्पन्न बाजार समितीत, खाजगी बाजार समितीमध्ये, थेट पणन अनुज्ञप्ती धारकाकडे अथवा नाफेडकडे विक्री करतील त्यांना या योजनेद्वारे रुपये ३५० प्रती क्विंटल व जास्तीत जास्त २०० क्विंटल प्रती शेतकरी याप्रमाणे अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. तसेच ७/१२ उताऱ्यावर खरीप / रब्बी अशी नोंद असली तरी दिनांक १ फेब्रुवारी, २०२३ ते दिनांक ३१ मार्च, २०२३ या कालावधीतील कांदा खरेदी ग्राह्य धरण्यात यावी तसेच लेट खरीप कांद्याला जरी अनुदानाची घोषणा झाली असली तरी लाल कांदा अशी नोंद खरेदी पट्टीमध्ये नसल्यामुळे शासन निर्णयातील लाल कांदा च्या शर्तीवर

आग्रह धरू नये असे दिनांक १९ मे, २०२३ रोजीच्या पत्रान्वये पणन संचालक, पुणे यांना कळविण्यात आले.

(३) व (४) ज्या ठिकाणी शेतकऱ्यांच्या ७/१२ उताऱ्यावर ई-पीकपेऱ्यांची नोंद झालेली नाही, अशा ठिकाणी कांद्याच्या लागवडीखालील क्षेत्राची शहानिशा करण्यासाठी संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांनी गावपातळीवर संबंधित गावाचे तलाठी, कृषी सहाय्यक व ग्रामसेवक यांची समिती गठित करावी. सदर समितीने शेतकऱ्यांच्या कांद्याच्या लागवडीखालील क्षेत्राची पाहणी करून, शंका असल्यास आजूबाजूच्या लोकांशी चर्चा करून सत्यता पडताळून, शहानिशा करावी व ७/१२ उताऱ्यावरील नोंदीसमोर स्पष्टपणे नमूद करावे. असे प्रमाणित केलेले ७/१२ उतारे कांदा अनुदानासाठी ग्राह्य धरण्यात येतील. सदर समितीने आपला अहवाल ७ दिवसांत संबंधित बाजार समितीकडे सादर करावा, अशा सूचना राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांना दिनांक २१ एप्रिल, २०२३ रोजीच्या पत्राद्वारे देण्यात आल्या आहेत.

शेतकऱ्याला कांदा अनुदानाचा लाभ मिळणार नसल्याकारणाने शेतकऱ्यांनी कांदा रस्त्यावर फेकल्याची बाब अमरावती विभागामधील जिल्ह्यामध्ये निदर्शनास आलेली नसून या बाबतची तक्रार शासनास प्राप्त झालेली नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील अवकाळी पावसामुळे मृत्यूमुखी पडलेल्या व्यक्तींच्या कुटुंबियांना तसेच पिकांचे व घरांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याबाबत

**(४) * १९७३४ श्री.रमेश कराड, श्री.प्रवीण दटके, श्रीमती उमा खापरे, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.रामदास आंबटकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.सत्यजीत तांबे, प्रा.राम शिंदे, श्री.जयंत पाटील, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.एकनाथराव खडसे, श्री.सचिन अहिर, श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात माहे मार्च, एप्रिल व मे, २०२३ मध्ये झालेल्या मुसळधार अवकाळी पाऊस, वादळी वारे व गारपीट यामुळे शेतकऱ्यांच्या १ लाख ९९ हजार ४८६ हेक्टर वरील कडधान्य, फळपिके व भाजीपाला इ. पिकांचे व मालमत्तांचे नुकसान झाले असून, सातारा जिल्हयातील फलटण, माण व पाटण तालुक्यातील मौजे दिवशी बुद्रुक या ठिकाणी तसेच फलटण शहरातील गिरवी आणि तरडफ, मराठवाडा, विदर्भ यासह राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये नद्यांना पूर येऊन तसेच गारपीटीमुळे विविध भागातील जनावरे दगावणे, पावसामुळे शेत जमिनीची प्रचंड धुप होऊन बांध बंदिस्ती अनेक ठिकाणी वाहून गेल्याचे तसेच २५ व्यक्तींचा मृत्यू तर २९ व्यक्ती गंभीर जखमी झाल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अवकाळी पाऊस, वादळी वारे, गारपीट व वीज पडल्यामुळे राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये सुमारे ९०० पेक्षा अधिक घरांचे नुकसान झाले असून यापैकी २३ घरांची पूर्णत: पडझड झाली, १२३ घरांची अंशत: व ७७७ कच्च्या घरांचीही पूर्णत: पडझड झाली व १८ जनावरांच्या गोठ्यांचेही नुकसान

झाले, विदर्भातील वर्धा, गडचिरोली, नागपूर, अकोला, बुलढाणा, अमरावती, अकोला, वाशिम व भंडारा इ. जिल्ह्यातील शेतपिके, गहू, हरभरा, संत्रा, आंबा, मोसंबींच्या फळबागांचे, भाजीपाला, घरे व जनावरांच्या गोठ्यांचे नुकसान झाले, नाशिक जिल्ह्यातील सटाणा, मालेगाव, नांदगाव, कळवण देवळा दिंडोरी, नाशिक, इगतपुरी, निफाड, सिन्नर आणि चांदवड या तालुक्यांतील ३७ हजार ९८१ हेक्टरवरील भाजीपाला कांदा, आणि फळपिकांचे नुकसान झाले, जळगाव जिल्ह्यांतील भुसावळ, मुक्ताईनगर, बोदवड तालुक्यांतील केळी, कांदा, मका, ज्वारी, बाजरी, भुईमूग या पिकांचे नुकसान झाले, लातूर जिल्ह्यातील लातूर ग्रामीण, औसा, रेनापुर, उदगीर, अहमदपूर, चाकूर या तालुक्यात ३ हजार ४५ शेतकऱ्यांच्या शेतातील १ हजार ४७० हेक्टरी पिकांचे नुकसान झाले तसेच अहमदनगर, उस्मानाबाद, सांगली, सोलापूर, कोल्हापूर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, औरंगाबाद, धुळे, परभणीसह इतर जिल्ह्यांतील आंबा, केळी, पपई, द्राक्ष, संत्रा, मोसंबी इ. फळपिके, भाजीपाला पिकांसह उन्हाळी बाजरी, ज्वारी, सोयाबीन, हळद पिकांचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील अवकाळी पाऊस व गारपिटीमुळे बाधित जिल्हानिहाय नुकसान किती झाले असून नुकसानापोटी देण्यात येणाऱ्या व आलेल्या आर्थिक मदतीची जिल्हानिहाय सविस्तर माहिती काय आहे तसेच किती मुदतीत आर्थिक मदत देण्यात येणार आहे,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अवकाळी पाऊस, वादळी वारे व गारपीटीमुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या पिकांचे पंचनामे करुन बाधित शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्यासह अवकाळी पावसामुळे मृत्यूमूखी पडलेल्या व्यक्तींच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल पाटील :** (१) राज्यात माहे मार्च ते मे, २०२३ या कालावधीमध्ये झालेल्या अवेळी पाऊस व गारपीट यामुळे एकूण ३,०२,७०६.०७ हेक्टर शेतीपिकांचे नुकसान झाले आहे. तसेच या कालावधीत नैसर्गिक आपत्तीमुळे ९५ इतक्या व्यक्तींचा व ९४६ जनावरांचा मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) व (४) माहे मार्च ते मे, २०२३ मधील नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या शेतीपिके व मालमत्तेच्या नुकसानीकरीता द्यावयाच्या मदतीसाठी निधी वितरीत करण्यास दिलेल्या मान्यतेचा निधीचा जिल्हानिहाय तपशील खालीलप्रमाणे आहे :-

| अ.क्र. | जिल्ह्याचे नाव | मार्च, २०२३ | एप्रिल, २०२३ | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | अमरावती | २३८.५४ | १३५६.२० | १५९४.७४ |
| २ | अकोला | ४४९.८६ | २६८१.४१ | ३१३१.२७ |
| ३ | यवतमाळ | ६९१.३३ | ९९१.७५ | १६८३.०८ |
| ४ | बुलढाणा | ७९२.२३ | ९९७.११ | १७८९.३४ |
| ५ | वाशिम | २८५.९९ | ५९२.८७ | ८७८.८६ |
| **एकूण (अ)** | | **२४५७.९५** | **६६१९.३४** | **९०७७.२९** |
| ६ | नाशिक | १७३६.३६ | ८०२२.६० | ९७५८.९६ |
| ७ | धुळे | ६७५.९८ | ४५१.८० | ११२७.७८ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ८ | नंदुरबार | ८१३.२३ | ५०.१२ | ८६३.३५ |
| ९ | जळगाव | २०४२.६१ | २६६५.४८ | ४७०८.०९ |
| १० | अहमदनगर | १०४१.५९ | ४६९३.०८ | ५७३४.६७ |
| **एकूण (आ)** | | **६३०९.७७** | **१५८८३.०८** | **२२१९२.८५** |
| ११ | पुणे | ७०.७० | ९८.३८ | १६९.०८ |
| १२ | सातारा | ७०.०४ | २०५.६९ | २७५.७३ |
| १३ | सांगली | ३.०० | ०.७७ | ३.७७ |
| १४ | सोलापूर | ३९२.८२ | ३७७.३३ | ७७०.१५ |
| १५ | कोल्हापूर | १.१४ | ६४.६५ | ६५.७९ |
| **एकूण (इ)** | | **५३७.७०** | **७४६.८२** | **१२८४.५२** |
| १६ | औरंगाबाद | २२१७.४१ | २६९७.४३ | ४९१४.८४ |
| १७ | जालना | ३६७.८८ | ६५८.०४ | १०२५.९२ |
| १८ | परभणी | ४३७.४७ | ३२.२५ | ४६९.७२ |
| १९ | हिंगोली | ६०४.४९ | ७७.०१ | ६८१.५० |
| २० | नांदेड | ३०५२.१३ | १६२४.१३ | ४६७६.२६ |
| २१ | बीड | ५९९.९९ | ११३२.०१ | १७३२.०० |
| २२ | लातूर | १०५६.५५ | २५७.०५ | १३१३.६० |
| २३ | उस्मानाबाद | १३९.२७ | ५६१.०१ | ७००.२८ |
| **एकूण (ई)** | | **८४७५.१९** | **७०३८.९३** | **१५५१४.१२** |
| २४ | नागपुर | ९०७.४६ | २१.७१ | ९२९.१७ |
| २५ | भंडारा | २१.८१ | ९५.१५ | ११६.९६ |
| २६ | गोंदिया | २५.४० | ३०.९३ | ५६.३३ |
| २७ | चंद्रपुर | ५४.३१ | १७९.६१ | २३३.९२ |
| २८ | गडचिरोली | १७८.०५ | १९३.८६ | ३७१.९१ |
| २९ | वर्धा | ०.०० | २४.०४ | २४.०४ |
| **एकूण (उ)** | | **११८७.०३** | **५४५.३०** | **१७३२.३३** |
| ३० | ठाणे | ११५.६० | ०.०० | ११५.६० |
| ३१ | पालघर | ११५०.८० | ०.०० | ११५०.८० |
| ३२ | रायगड | २६१.३७ | १०.३३ | २७१.७० |
| ३३ | रत्नागिरी | ०.०० | १०.९३ | १०.९३ |
| ३४ | सिंधुदुर्ग | ३.७२ | २५.८५ | २९.५७ |
| **एकूण (ऊ)** | | **१५३१.४९** | **४७.११** | **१५७८.६०** |
| **एकूण (अ+आ+इ+ई+उ+ऊ)** | | **२०४९९.१३** | **३०८८०.५८** | **५१३७९.७१** |

(५) प्रश्न उद्भवत नाही

-----------------

## अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या परदेशी शिष्यवृत्तीबाबत

**(५) * १९०८१ श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना परदेशात शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देण्यात येत असून त्यामध्ये जागतिक विद्यापीठांच्या क्रमवारीतील १०० विद्यापीठांमध्ये तसेच लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स मध्ये प्रवेश मिळणाऱ्या विद्यार्थ्यांना उत्पन्न मर्यादा लागू नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार महाज्योतीच्या माध्यमातून अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना परदेशात शिक्षण घेण्यासाठी ही योजना तयार करण्यात येऊन ओबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांनाही शिष्यवृत्तीचा असा लाभ देण्याकरीता शासन निर्णय निर्गमित करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत इतर मागास वर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील एकूण ५० विद्यार्थ्यांना परदेश शिष्यवृत्ती योजनेचा लाभ देण्यात येतो. मात्र महाज्योतीच्या माध्यमातून कोणत्याही प्रकारची शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शाहू, फुले, आंबेडकर निवासी/ अनिवासी आश्रमशाळांना अनुदान देण्याबाबत

**(६) * १९८४७ श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.किरण सरनाईक, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे : तारांकित प्रश्न क्रमांक १७३५९ ला दिनांक १ मार्च, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शाहू, फुले, आंबेडकर निवासी/अनिवासी अशा १६५ आश्रमशाळांना (केंद्रीय आश्रमशाळांना) २०% ने वेतन अनुदान वेतनश्रेणीनुसार देण्याबाबत तत्कालीन शासनाने निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णयाच्या अनुषंगाने सदर आश्रमशाळांना अनुदान देण्याबाबत शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, त्यानुसार किती शाळांतील शिक्षक-कर्मचाऱ्यांना वेतन अनुदान सुरु करण्यात आले आहे,

(३) असल्यास, नियमीत वेतनश्रेणीनुसार १००% अनुदान मंजूर करण्याबाबत, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, वैयक्तीक मान्यता व सर्व मान्यता, सेवासातत्य तात्काळ देण्याबाबत, विद्यार्थी परिपोषण १०० टक्के प्रमाणे देण्यात यावे अशा मागण्यांबाबत आश्रमशाळा चालक व कर्मचारी सातत्याने पाठपुरावा करीत

असून अद्याप देखील कोणताही निर्णय घेण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) शासन निर्णय, दिनांक ८ मार्च, २०१९ अन्वये शाहू, फुले, आंबेडकर निवासी/अनिवासी शाळा योजनेंतर्गत १६५ आश्रमशाळांना तपासणीच्या अधिन राहून शैक्षणिक वर्ष सन २०१९-२० पासून २० टक्के प्रमाणे अनुदान मंजूर करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.
(२), (३) व (४) शाहू, फुले, आंबेडकर निवासी/अनिवासी शाळा योजनेतील १६५ आश्रमशाळांना तपासणीच्या अधिन राहून नियमानुसार अनुदान देण्याबाबतची कार्यवाही प्रगतीत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना थकबाकीसह सातवा वेतन आयोग स्वनिधी लागू करणेबाबत

**(७) * १९३०४ श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खाजगी प्राथमिक शाळांतील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना थकबाकीसह सातवा वेतन आयोग स्वनिधी लागू करावा असे आदेश आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना शासनाने दिनांक २० जानेवारी, २०२३ रोजीच्या पत्रान्वये दिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, खाजगी प्राथमिक शाळांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना थकबाकीसह सातवा वेतन आयोग स्वनिधी लागू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.
(२) बृहन्मुंबई महानगरपालिका परीक्षेत्रातील खाजगी प्राथमिक शाळांतील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू करण्याबाबत आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी दिनांक ३०/०५/२०२३ रोजी खालीलप्रमाणे मान्यता दिली आहे :-

• दिनांक ०१ जानेवारी, २०१६ पासून पूर्वलक्षी प्रभावाने सातवा वेतन आयोग लागू करण्यात येईल.

• शालेय शिक्षण विभागाच्या दिनांक ०७/०७/२०१५ रोजीच्या शासन निर्णयानुसार अनुज्ञेय बाबींवरील खर्चाची प्रतिपूर्ती महानगरपालिकेस झाल्यानंतर सदर कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगाची थकबाकी प्रदान करण्यात येईल.

त्यानुषंगाने, प्रशासक (शिक्षण समिती / स्थायी समिती / महानगरपालिका) यांची मान्यता घेण्याची कार्यवाही महानगरपालिकेमार्फत सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शासकीय सेवेतील रिक्त असलेली ७५ हजार पदे भरण्याबाबत

**(८) * १९६३६ श्री.सत्यजीत तांबे, श्री.अरुण लाड, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भारतीय स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षाचे औचित्य साधून शासकीय सेवेतील रिक्त असलेली ७५ हजार पदे भरण्याची घोषणा माहे ऑगस्ट, २०२२ मध्ये शासनाने केली असून शासनाच्या विविध विभागांच्या मागणीनुसार १ लाख ४५ हजार इतकी पदे भरण्याची आवश्यकता आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या विविध पदांच्या मेगाभरतीमध्ये सरळ सेवा परीक्षा घेण्यासाठी २ खाजगी कंपन्यांची नियुक्ती करण्यात आली असून सदर कंपन्यांना प्रति विद्यार्थी रुपये १०००/- इतकी फी निश्चित करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या परीक्षेचे शुल्क केवळ रुपये ५०० प्रति विद्यार्थी असून खाजगी कंपन्यामार्फत दुप्पट शुल्क आकारणी करण्यात येत असल्याने विद्यार्थ्यांवर आर्थिक ताण पडत असल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये असंतोषाची भावना निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या परीक्षा खाजगी कंपन्यांमार्फत न घेता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून घेण्याच्या विविध विद्यार्थी संघटनांच्या मागणीबाबत व परीक्षांची फी कमी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली आहे,

(५) असल्यास, उक्त पदांपैकी किती पदे भरण्यात आली असून, रिक्त पदे भरण्याबाबत तसेच भरती प्रक्रिया वेळेत पूर्ण करणेबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून ७५ हजार पदांची भरती प्रक्रिया सुरु करण्याची घोषणा करण्यात आली आहे.

(२) होय.

(३) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून गट-क च्या पूर्व परीक्षा व मुख्य परीक्षा अशा दोन्ही मिळून एका पदाच्या परीक्षेसाठी प्रति उमेदवार रुपये ९३८/- इतके परीक्षा शुल्क आकारण्यात येते. कंपनीकडून एका पदाच्या परीक्षेसाठी रुपये १०००/- इतके शुल्क आकारण्यात येते. म्हणजेच आयोग व कंपनी या दोन्ही यंत्रणांकडून घेण्यात येणाऱ्या परीक्षांचे शुल्क हे जवळपास सारखे आहे. तसेच आयोगामार्फत ओ.एम.आर. पध्दतीने (ऑफलाईन पध्दतीने) परीक्षा घेण्यात येते. मात्र कंपनीमार्फत ऑनलाईन पध्दतीने परीक्षा घेतली जात असल्याने दोन्ही यंत्रणांच्या परीक्षांच्या स्वरुपात फरक असल्याने त्यानुसार परीक्षा शुल्कातही काही किरकोळ फरक दिसून येतो.

(४) खाजगी कंपन्यांमार्फत परीक्षा न घेता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून घेण्याबाबत विद्यार्थी संघटनांची मागणी महाराष्ट्र लोकसेवा आयोगास अथवा सामान्य प्रशासन विभागास प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(५) राज्य शासकीय कार्यालये व शासनाच्या अधिपत्याखालील इतर कार्यालये मिळून एकूण १७,५४२ पदांवर नियुक्त्या देण्यात आल्या आहेत. उर्वरित रिक्त पदे भरण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्याबाबत संबंधित प्रशासकीय विभागांना सूचना देण्यात आल्या आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील समुद्रकिनारी पर्यटकांच्या सुरक्षिततेसाठी प्रशिक्षित जीवरक्षक नेमण्याबाबत

**(९) * १८९४७ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईच्या समुद्रकिनारी येणाऱ्या पर्यटकांच्या सुरक्षिततेसाठी सद्य:स्थितीत ११ कायमस्वरूपी आणि 'दृष्टी' या खाजगी कंपनीचे १०५ जीवरक्षक बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाने तैनात केले असून समुद्रकिनाऱ्यावर येणाऱ्या पर्यटकांच्या तुलनेत ही संख्या कमी असल्याची बाब दिनांक ३० मे, २०२३ रोजी निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या जीवरक्षकांना गेली १४ वर्षे प्रशिक्षण देण्यात आलेले नसून त्यांच्याकडे समुद्रकिनारी बुडणाऱ्यांना वाचविण्यासाठी साधन सामुग्रीचादेखील अभाव आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या जीवरक्षकांकडे दुर्बिण, जेट्स की, पेट्रोलिंगसाठी जीप तसेच त्यांच्या बॅगा ठेवणे, कपडे बदलणे, आंघोळ इत्यादी सुविधांचा देखील अभाव आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मुंबईतील समुद्रकिनारी पर्यटकांच्या सुरक्षिततेसाठी पुरेसे प्रशिक्षित जीवरक्षक नेमण्यासह त्यांना आवश्यक सुरक्षा सुविधा पुरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) मुंबईच्या समुद्रकिनारी येणाऱ्या पर्यटकांच्या सुरक्षिततेसाठी सद्य:स्थितीत बृहन्मुंबई महानगरपालिकेचे ११ कायमस्वरुपी आणि 'दृष्टी' या खाजगी कंपनीचे ९३ जीवरक्षक बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाने तैनात केले आहे.

'दृष्टी' या खाजगी कंपनीच्या एकूण जीवरक्षकांपैकी २५ टक्के जादा जीवरक्षक सणासुदीच्या तसेच विशेष दिवशी समुद्रकिनाऱ्यावर कामाकरीता तैनात केले जातात.

तसेच, सणासुदीला / पावसाळयात व ४.५ मी. पेक्षा अधिक समुद्री लाटेच्या दिवशी अधिक कुमक म्हणून मुंबई अग्निशमन दलाचे फ्लड ॲण्ड रेस्क्यू टीमचे जवान विमोचन साहित्यासह ठरविलेल्या सहा समुद्र किनारी तैनात केले जातात.

(२) हे खरे नाही.

महानगरपालिकेच्या स्थायी समितीच्या मान्यतेनुसार शारिरीक व शैक्षणिक पात्रता तपासणे तसेच प्रत्येक जीवरक्षकास प्रशिक्षण देणे हे 'दृष्टी' या खाजगी कंपनीमार्फत केले जाते. तसेच 'दृष्टी' या खाजगी कंपनीमार्फत समुद्रकिनारी बुडणाऱ्यांना वाचविण्यासाठी लागणाऱ्या साधन सामुग्रीचे नियोजन केले जाते.

(३) व (४) 'दृष्टी' या खाजगी कंपनीमार्फत त्यांनी जीवरक्षकांना ११ लाइफ जाकेट्स, ५५ रेस्क्यू ट्यूब, ९ रिंग बॉय, ११ सर्फ रेस्क्यू बोर्डस, २५ ते ३५ मीटरचे ६ रेस्क्यू रोप्स, ६ रिचार्जेबल टोर्चेस, २१ वॉकिटॉकी, इत्यादी पुरविण्यात आले आहेत.

मुंबईतील समुद्रकिनारे हे किनारपट्टी नियंत्रण क्षेत्र (सी.आर.झेड.) मध्ये येत असल्यामुळे तेथे जीवरक्षकांसाठी दुर्बिण, जेट्स की, बॅगा ठेवणे, कपडे बदलणे, आंघोळ इत्यादि करीता जागा उपलब्ध करुन मान्यता देण्याकरिता महानगरपालिकेमार्फत किनारपट्टी नियंत्रण क्षेत्र प्राधिकरणाकडे प्रस्ताव सादर करण्यात आला होता.त्यानुषंगाने त्यांनी २ समुद्रकिनाऱ्यांवर लाकडी वॉच टॉवर उभारण्यासाठी मंजुरी दिली आहे. त्यानुसार महानगरपालिकेमार्फत पुढील कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या कार्यरत व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यां पूर्ण करण्याबाबत

**(१०) * ११९१०८ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे, श्री.कपिल पाटील, प्रा.राम शिंदे, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे, श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना गत तीन वर्षांपासून रजा रोखीकरणाची रक्कम, भविष्य निर्वाह निधी व ग्रॅज्यूएटीची रक्कम मिळाली नसून चालक आणि वाहकांच्या रुपये ७५ एवढ्या मुक्कामी बस भत्त्यात वाढ करण्याची मागणी तसेच महामंडळातील कर्मचाऱ्यांच्या पुढील चार वर्षांच्या वेतनासाठी निधी उपलब्ध करून देण्यात येईल असे प्रतिज्ञापत्राद्वारे मा.उच्च न्यायालयात शासनाने नमूद केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाकडून गत दहा महिन्यापासून अपुरा निधी येत असल्याने कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधी तसेच उपदानाची रुपये ८०० कोटींची देणी प्रलंबित असून ११ महिन्यांच्या कालावधीत रुपये १६०० कोटींची तूट आली असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कर्मचाऱ्यांनी सेवेत असताना सादर केलेल्या वैद्यकीय देयकाच्या रक्कमा निवृत्तीनंतरही न मिळणे, निवृत्तीनंतर कर्मचाऱ्याला एका महिन्यात पी.एफ.व ग्रच्युएटी देणे, पी.एफ. रकमेवरील वाढीव व्याजदरातील फरक कर्मचाऱ्यांना न मिळणे इ. देयके प्रलंबित असून निवृत्त कर्मचारी आणि त्यांची पत्नी यांना कायमस्वरुपीचा मोफत पास मिळावा अशी मागणी राज्य मार्ग परिवहन निवृत्त कर्मचारी संघटनेच्या रत्नागिरी विभागाचे अध्यक्ष यांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची प्रलंबित देयके अदा करण्याबाबत तसेच मुक्कामी बस भत्ता वाढविणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) रा.प कर्मचाऱ्याच्या संपादरम्यान राज्य शासनाने मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या त्रिसदस्यीय समितीने आपल्या अहवालात, "महामंडळाची सध्याची आर्थिक स्थिती लक्षात घेता, त्यांच्या कर्मचाऱ्यांना वेळेवर वेतन अदा करण्यासाठी किमान पुढील चार वर्षे शासनाने अर्थसंकल्पाव्दारे महामंडळास आवश्यक तेवढा निधी उपलब्ध करून द्यावा" अशी शिफारस केलेली आहे.
(२) कर्मचारी भविष्य निर्वाह निधीची सुमारे रुपये ४८६ कोटी व उपदानाची सुमारे रुपये २७३ कोटी अशी एकूण सुमारे रुपये ७५९ कोटी देणी रा. प. महामंडळाकडुन विश्वस्त मंडळास जून २०२३ अखेर पर्यंत अदा करणे प्रलंबित आहे.

सन २०२१-२२ च्या अलेखापरिक्षीत प्राथमिक लेखांकंनानुसार रुपये ११०० कोटी इतकी रा.प.महामंडळाची तुट आहे.

(३) व (४) होय.

रा. प. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या वैद्यकीय देयकांची माहे मार्च-२०२३ पर्यंतची रक्कम अदा करण्यात आलेली असून, सद्य:स्थितीत जी देयके प्रलंबित आहेत त्यांची निधीच्या उपलब्धतेनुसार अदायगी करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

निवृत्तीनंतर कर्मचाऱ्यांना पीएफ व ग्रॅज्युएटी एका महिन्याच्या आत प्रदान करण्यात येत आहे.

भनिनि संघटनेने वेळोवेळी जाहीर केलेल्या व्याजदराप्रमाणे रा.प.कर्मचाऱ्यांना भनिनिचा व्याजदर अनुज्ञेय करण्यात आले असल्यामुळे व्याजदरातील फरक मिळण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

निवृत्त कर्मचारी आणि त्यांची पत्नी यांना कायमस्वरुपीचा मोफत प्रवास पास मिळावा, अशा आशयाचे निवेदन प्राप्त झाले आहे.

रा.प.महामंडळाच्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना भनिनि व उपदान वेळेत अदा करण्यात येत आहे. तसेच रजा रोखीकरणाची रक्कम निधी उपलब्धतेनूसार अदा करण्यात येत आहे.

रा.प.महामंडळातील कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्यामध्ये कामगार करारान्वये सुधारणा करण्यात येत असते. कामगार करार सन २०१६-२०२० या करारास अंतिम स्वरुप येत नसल्याने तसेच रा.प.महामंडळ व मान्यताप्राप्त संघटना यामध्ये समेट न झाल्यामुळे कामगार आयुक्तांनी सदर प्रकरण मा.औद्योगिक न्यायाधिकरण, मुंबई यांच्याकडे वर्ग केला असून सदर प्रकरण मा.औद्योगिक न्यायालय, मुंबई येथे प्रलंबित आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भिवंडी निजामपूर महानगरपालिकांतर्गत भिवंडी शहर कार्यक्षेत्रातील लाभार्थ्यांना वैयक्तीक शौचालय अनुदान वितरित करण्याबाबत

**(११) * १९४९० श्रीमती उमा खापरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रामदास आंबटकर, श्री.निलय नाईक, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील भिवंडी निजामपूर महानगरपालिकांतर्गत भिवंडी शहर कार्यक्षेत्रातील अनेक लाभार्थ्यांना वैयक्तीक शौचालय अनुदान वितरण न झाल्याने ही योजना प्रलंबित असल्याची बाब माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भिवंडी महानगरपालिकेमार्फत राबविण्यात येत असलेल्या स्वच्छ सर्वेक्षण कार्यक्रमाची योग्य अंमलबजावणी न होणे तसेच केंद्र शासनाची वैयक्तीक शौचालय ही योजना राबवित असताना कोणत्याही प्रकारचे नियोजन नसल्याने ही योजना देखील यशस्वी झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या योजनेतील पात्र लाभार्थ्यांना केंद्र शासनाकडून रुपये १२ हजार व महानगरपालिकेकडून रुपये ५ हजार असे एकूण रुपये १७ हजारचा लाभ मिळत असतो परंतु, भिवंडी शहरातील अनेक लाभार्थ्यांना गत चार ते पाच वर्षांपासून अनुदानाचा लाभ मिळालेला नाही तसेच काही लाभार्थ्यांना अनुदानाच्या पहिल्या टप्प्यातील रक्कम मिळाली परंतु पुढील टप्प्यातील रक्कम मिळाली नसल्याने शौचालयाचे काम प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पात्र लाभार्थ्यांना वैयक्तीक शौचालय अनुदान वितरण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत

आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) हे अंशत: खरे आहे.

एकूण ४०५५ पात्र लाभार्थ्यांपैकी वैयक्तिक शौचालयाचे बांधकाम पूर्ण झाले आहेत अशा ३५०० लाभार्थ्यांना केंद्र व राज्य शासनाच्या हिस्स्यासहीत मनपा हिस्सा वितरित करण्यात आला आहे. उर्वरित ५५५ लाभार्थ्यांना केंद्र व राज्य हिस्स्याचे रुपये १२०००/- इतके अनुदान वितरीत करण्यात आले असून, शौचालयाचे बांधकाम पूर्ण करुन शौचालयाचा अक्षांश रेखांश असलेला फोटो स्वच्छ भारत अभियान (नागरी) च्या पोर्टलवर अपलोड केल्यावर उर्वरित मनपा हिस्स्याचे रुपये ५०००/- एवढे अनुदान वितरित केले जाणार आहे.
(५) प्रश उद्‌भवत नाही.

-----------------

## पंढरपुर (जि.सोलापूर) शहरातील प्रधानमंत्री आवास योजनेचा प्रकल्प प्रलंबित असल्याबाबत

**(१२) * १९८६३ श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पंढरपुर नगरपालिकेच्या जागेत प्रधानमंत्री आवास योजनेतुन सुमारे २ हजार ९२ घरांचा प्रकल्प उभारण्याचे काम गत तीन वर्षांपासून बंद आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संबंधित गृहनिर्माण प्रकल्प नदीच्या पुररेषेत असून नगरपालिकेची जागा असल्याने घरे खरेदीदाराच्या नावे होत नाहीत तर त्यासाठी करार करावा लागतो या तांत्रिक कारणामुळे बँकेकडून कर्ज मिळताना अडचणी येत असल्याने अनेक लोकांनी घराचे बुकिंग रद्द केले असून ठेकेदारानेही गृहनिर्माण प्रकल्पाचे काम अपूर्ण ठेवले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने लाभार्थ्यांना येणाऱ्या अडचणी दूर करुन प्रधानमंत्री आवास योजनेचे प्रलंबित काम गुणवत्तापुर्वक पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे अंशतः खरे आहे.

या प्रकल्पाचे काम दिनांक ०१ सप्टेंबर, २०२१ पासून बंद आहे.
(२) हे खरे आहे.

महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ९२ नुसार नगरपरिषदेच्या मालकीच्या जागा हस्तांतरीत करण्याकरीता शासनाची मान्यता घेणे आवश्यक आहे.
(३) प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत सदर जागेवर झालेल्या कामाची किंमत रुपये ३७.८६ कोटी असून,

शासनाकडून प्राप्त रुपये ११.२६ निधीतून ठेकेदारास देयके अदा करण्यात आले आहे. कामाचे उर्वरित देयके न मिळाल्याने ठेकेदाराने दिनांक ०१ सप्टेंबर, २०२१ पासून काम बंद केले होते.

त्यानंतर ठेकेदाराने तयारी दर्शविल्याने काम पुन्हा सुरु करण्याकरीता नगरपरिषद निधीतून ठेकेदारास उर्वरित देयकापैकी रुपये ६.०० कोटी अदा करण्यात आले. तथापि, त्यानंतरही ठेकेदाराने काम सुरु केले नाही व नगरपरिषदेस कायदेशीर नोटीस दिली आहे. या अनुषंगाने नगरपरिषद स्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## तारापूर औद्योगिक वसाहत (जि.पालघर) येथील कारखान्यांचे सांडपाणी विनाप्रक्रिया समुद्रात सोडले जात असल्याबाबत

**(१३) * १९६९२ श्री.जयंत पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तारापूर औद्योगिक वसाहत, जि.पालघर ही सर्वात मोठी औद्योगिक वसाहत असून, येथील २०० हून अधिक रासायनिक कारखान्यांमधील रासायनिक सांडपाणी कोणतीही प्रक्रिया न करता थेट किनाऱ्यालगतच्या खाड्यांमध्ये सोडले जात असल्याची बाब माहे एप्रिल, २०२३ च्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कारखान्यांमधील रासायनिक सांडपाणी प्रक्रिया करून पाईपलाईनद्वारे खोल समुद्रात ७ कि.मी. अंतरावर सोडावे असे आदेश असताना, औद्योगिक वसाहतीमार्फत सदर सांडपाण्याकरीता केवळ २०० फूट अंतरावर पाईपलाईन टाकण्याचे काम करण्यात आले असून, प्रत्यक्षात अजून ही पाईपलाईन कार्यान्वित केलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, रासायनिक सांडपाणी खोल समुद्रात सोडताना २०० फूट अंतरावर सोडले जात असल्यामुळे किनारपट्टी नियमन क्षेत्राच्या (सी.आर.झेड.) नियमांचे उल्लंघन होत असून, सागरी जलसंपदा व पर्यावरणाची मोठी हानी होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सागरी जलप्रदुषणामुळे किनारपट्टीलगत वास्तव्यास असणाऱ्या नागरिकांना याचा त्रास होणार असल्याचे तसेच मोठ्या प्रमाणावर मासे मृत्यूमुखी पडल्यामुळे मच्छीमारीवर अवलंबून असलेल्या शेकडो कुटुंबांवर उपासमारीची वेळ येईल अशी भीती महाराष्ट्र मच्छिमार कृती समिती ने व्यक्त केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित दोषींविरोधात किती कालावधीत व कोणती ठोस कारवाई करण्यात आली आहे वा येणार आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.

तारापूर औद्योगिक वसाहतीतील प्रक्रिया केलेले औद्योगिक सांडपाणी नवापूर येथील अरबी समुद्रामध्ये बंद वाहिनीव्दारे ५०० मी. इतक्या अंतरावर सोडण्यात येत आहे. राष्ट्रीय समुद्र विज्ञान संस्थेने

सदर सांडपाणी ७.१ कि.मी अंतरावर सोडण्याची शिफारस केली असून त्यानुषंगाने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत बंद वाहिनी टाकण्याचे काम सुरु आहे.

(३) हे अंशत: खरे आहे.

तथापि, केंद्रीय पर्यावरण व वने व वातावरणीय बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांनी दिनांक १९ मे, २०२१ रोजी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांना प्रक्रिया केलेले औद्योगिक सांडपाणी समुद्रामध्ये पाईपलाईनद्वारे ७.१ कि. मी. अंतरावर सोडण्यासाठी किनारपट्टी नियमन क्षेत्र (सी.आर.झेड) अनुमती देण्यात आली आहे.

(४) व (५) प्रश्नाधिन विषयाबाबतचे निवेदन महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास प्राप्त झाले असून सदर निवेदनाच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत करण्यात आलेल्या पाहणीदरम्यान आढळलेल्या त्रुटींच्या अनुषंगाने टी.ई.पी.एस.-सीइटीपीला दिनांक ०९/०५/२०२३ रोजी प्रस्तावित आदेश देण्यात आले असून टीईपीएस-सीईटीपी संचालक मंडळाला दिनांक १०/०५/२०२३ रोजीच्या निर्देशांन्वये जल प्रदूषण (प्रतिबंध व नियंत्रण) कायदा, १९७४ अंतर्गत खटला का दाखल करण्यात येवू नये याबाबत विचारणा करण्यात आली आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पालघर जिल्ह्यातील समुद्रकिनाऱ्यांवरील जल प्रदूषणामुळे मच्छिमार बांधवांच्या व्यवसायास धोका निर्माण झाल्याबाबत

**(१४) * १९७७५ श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रामदास आंबटकर, श्रीमती उमा खापरे, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.जयंत पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक १७३४४ ला दिनांक १५ मार्च, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वातावरणातील बदलामुळे समुद्रात निर्माण होणारी चक्रीवादळे, वाढते प्रदूषण तसेच समुद्रात सुरू असलेले सेस्मिक सर्वेक्षण, कारखान्यांचे रासायनिक प्रदूषित सांडपाणी इत्यादीमुळे जलप्रदूषण वाढलेले असून सद्य:स्थितीत समुद्रात जाडसर थर असलेला तवंग यामुळे खाडी किनारी सापडणाऱ्या तसेच कमी प्रवाहात जीवन फुलविणाऱ्या छोट्या आकाराच्या माशांच्या जवळजवळ १२५ जातींपैकी ७९ जाती धोक्यात आल्या असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पालघर जिल्ह्यातील एडवण, कोरे, दातिवरे, उसरणी (ता. पालघर) तसेच उत्तन पासून (ता.वसई) ते झाईपर्यंतच्या (ता.तलासरी) समुद्रकिनाऱ्यावर तिवरांच्या मुळावर मेणसदृश्य तेलकट रासायनिक थर साचल्याने मच्छीमार बांधवांच्या व्यवसायास धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून प्रदूषणकारी उद्योगांवर कारवाई करण्यास होत असलेला विलंब तसेच नियमांचे उल्लंघन करुन करण्यात येणारी मासेमारी इत्यादीमुळे मागील दोन वर्षांत मत्स्य उत्पादनात निम्याने घट झालेली असून पालघर जिल्ह्यातील समुद्र किनाऱ्यावरील जल प्रदुषणामुळे मच्छीमार बांधवांच्या व्यवसायास धोका निर्माण झाला असून शेतकऱ्यांप्रमाणे मच्छीमारांना प्रत्येकी दोन लाख रुपयांची नुकसान भरपाई शासन देणार आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नियमांचे उल्लंघन करणाऱ्या प्रदूषणकारी उद्योगावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच शेतकऱ्यांप्रमाणे मच्छीमारांना प्रत्येकी दोन लाख रुपयांची नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) अंशत: खरे आहे.
(३) व (४)महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाद्वारे वेळोवेळी भेट देवून औद्योगिक कारखान्यांची पाहणी करण्यात येते आणि या दरम्यान प्रदूषण नियंत्रण यंत्रणा सुरळीतपणे चालू असल्याची खात्री केली जाते. दोषी आढळल्यावर संबंधित उद्योगांविरुध्द महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत कायदेशीर कार्यवाही केली जाते.
(५) लागू नाही.

-----------------

## उस्मानाबाद नगरपरिषदेंतर्गत बायोमायनिंगच्या कामामध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

**(१५) * १८९९९ श्री.सुरेश धस : तारांकित प्रश्न क्रमांक १५५८० ला दिनांक २८ डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उस्मानाबाद नगरपरिषद अंतर्गत बायोमायनिंगच्या कामामध्ये भ्रष्टाचार झाल्याबाबत मा.मंत्रीमहोदयांनी सभागृहात दिलेल्या आश्वासनाच्या अनुषंगाने नगरपरिषद उस्मानाबाद येथे शासनस्तरावरुन पत्र व्यवहार झालेला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पत्रव्यवहाराच्या अनुषंगाने विद्यमान मुख्याधिकाऱ्यांनी खोटे उत्तर देऊन सभागृहाची दिशाभूल केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बायोमायनिंगमध्ये तयार झालेल्या खताची विक्री करण्यात आलेली नसून त्या खताचा उपयोग नगरपरिषदेच्या उद्यानामध्ये करण्यात आलेला आहे असे विभागीय कार्यालयाने शासनास खोटे कळवून दिशाभुल करुन भ्रष्टाचार करणाऱ्यांकडे जाणीवपुर्वक दुर्लक्ष केले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उस्मानाबाद नगरपरिषद अंतर्गत सद्य:स्थितीत किती उद्याने व केव्हापासून चालु आहेत, या गंभीर प्रकरणी सखोल चौकशी करुन संबंधित दोषींवर फौजदारी स्वरूपाचा गुन्हा दाखल केला आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) हे खरे नाही.
(४) मुख्याधिकारी, उस्मानाबाद नगरपरिषद यांच्या कार्यालयीन अभिलेख्यानुसार शहरात २ उद्यानांच्या नोंदी असून सध्या वापर नाही. सदर प्रकरणी जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांचे कार्यालयाकडून दिनांक २१/०६/२०२३ रोजीच्या पत्रान्वये कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पुणे (C.O.E.P.) यांचेकडे त्रयस्त पक्ष लेखापरिक्षण करण्यासाठी कळविण्यात आले आहे.
(५) लागु नाही.

-----------------

## पुणे शहरातील अनधिकृत होंर्डिंग्ज हटवून होंर्डिग दुर्घटनेतील मृतांच्या नातेवाईकांना आर्थिक मदत देणेबाबत

**(१६) * १९९४७ श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.महादेव जानकर, ॲड.अनिल परब, श्री.अमोल मिटकरी, श्री.अनिकेत तटकरे, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रामदास आंबटकर, ॲड.निरंजन डावखरे, प्रा.राम शिंदे, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुण्यातील पिंपरी परिसरातील रावेत भागामध्ये पावसाच्या आडोशाला उभे असलेल्या प्रवाशांवर जाहिरातीचे होर्डिग कोसळल्याने माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान पाच जणांचा जागीच मृत्यू झाल्याची घटना घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे जिल्ह्यातील देहूरोड - कात्रज बाह्यवळण महामार्गालगत असणाऱ्या किवळे येथे दिनांक १७ एप्रिल, २०२३ रोजी सुमारे ५० ते ६० फुट उंचीचे लोखंडी होर्डिंग वादळामुळे कोसळून त्यामध्ये ५ व्यक्तींचा मृत्यू झाला असून अनेक व्यक्ती जखमी झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या आकाशचिन्ह व परवाना विभागाच्या वतीने शहरातील अनधिकृत होर्डिंग्ज अधिकृत करण्यासाठी व्यावसायिकांना अर्ज करण्यास सांगितल्याप्रमाणे व्यावसायिकांनी अर्ज केले असता पालिकेने संबंधित होर्डिंग्ज पाडण्याचा निर्णय घेतला त्यामुळे निर्माण झालेल्या वादात शहरांमध्ये तब्बल ४३४ धोकादायक अनधिकृत होर्डिंग उभे असल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, आकाशचिन्ह व परवाना विभागाचे वतीने शहरातील अनधिकृत होर्डिंग्ज अधिकृत करण्यासाठी अर्ज मागवले होते मात्र त्यानंतर प्रशासनाने हे होर्डिंग्ज पाडण्याचा निर्णय घेतला त्याविरोधात न्यायालयाने जैसे थे ठेवण्याचे आदेश दिल्यामुळे कारवाई करता आली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या दुर्घटनेत मृत्यूमुखी पडलेल्यांच्या नातेवाईकांना शासनाकडून तीन लाख रुपये मदत करण्याची घोषणा मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिनांक १९ एप्रिल, २०२३ रोजी केली असून आतापर्यंत मृतांच्या नातेवाईकांना आर्थिक मदत देण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शाासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पुणे शहरातील अनधिकृत होर्डिंग्ज हटविणे तसेच दुर्घटनेस जबाबदार असलेल्यांवर कारवाई करणेबाबत व दुर्घटनेतील मृतांच्या नातेवाईकांना आर्थिक मदत देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) हे खरे आहे.

दिनांक १७/०४/२०२३ रोजी सायंकाळी ५.०० च्या दरम्यान अचानक मान्सुनपूर्व वादळीवारे व अवकाळी पाऊस यामुळे मौजे किवळे, बेंगलोर-मुंबई किवळे ओव्हर ब्रिज जवळ, सर्व्हिस रोडलगत शार्वी हॉटेलच्या जवळचा जाहिरात फलक पडून सदरची दुर्देवी घटना घडलेली आहे. त्यामध्ये ५ जणांचा मृत्यू झालेला असून ३ जण जखमी झालेले होते.

(३) महानगरपालिकेच्या जागेवर आकर्षक जाहिरात फलक उभारणेसाठी जाहिरात धारकांना जाहिरात

करण्याची संधी देण्याच्या हेतूने अनधिकृत होर्डिंग्ज काढणे आवश्यक असल्याने, यापूर्वीच्या प्रलंबित अर्जांना व जाहीर प्रकटनाच्या अनुषंगाने प्राप्त झालेल्या अर्जांना नियमितीकरण करता येणार नाही, अशा आशयाचे जाहीर प्रकटन वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात आलेले होते, हे खरे आहे.

(४) हे खरे आहे.

(५) व (६) या दुर्घटनेत मृत्यूमुखी पडलेल्या एकूण ५ व्यक्तींच्या वारसांना अपर तहसिल कार्यालय, पिंपरी चिंचवड, ता.हवेली, जि.पुणे यांचेकडून प्रत्येकी रूपये ३ लाख याप्रमाणे मदत देण्यात आलेली आहे.

सदरहू दुर्घटनेबाबत जबाबदार जाहिरात फलक धारक, संबंधित जागा मालक व जाहिरात फलक चालक यांच्याविरूध्द एफ.आय.आर. क्र.०१८५, दिनांक १८/०४/२०२३ अन्वये रावेत पोलीस स्टेशन या ठिकाणी दाखल करण्यात आलेला आहे.

पिंपरी चिंचवड शहरात घडलेल्या दुर्घटनेच्या अनुषंगाने अनधिकृत होर्डिंग्ज निष्कासनाची कार्यवाही तात्काळ करण्याबाबत तसेच सदरच्या घटनेची पुनरावृत्ती होणार नाही, याची दक्षता घेण्याबाबतच्या सूचना दिनांक ०२/०५/२०२३ रोजीच्या पत्रान्वये सर्व महानगरपालिका आयुक्तांना देण्यात आलेल्या आहेत.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वांद्रे-कुर्ला संकुल (बीकेसी), मुंबई येथे एका राजकीय पक्षाच्या दसरा मेळाव्यासाठी राज्य मार्ग परिवहन महामंडळामार्फत विशेष बस सेवा पुरविण्यात आल्याबाबत

**(१७)** * **१९३२७ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वांद्रे-कुर्ला संकुल (बीकेसी), मुंबई येथे एका राजकीय पक्षाने आयोजित केलेल्या दसरा मेळाव्यासाठी राज्य मार्ग परिवहन महामंडळामार्फत विशेष बस सेवा पुरविण्यात आल्याचे दिनांक ५ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू दसरा मेळाव्यासाठी मा.मुख्यमंत्री, मंत्रिमंडळातील मंत्री व इतर सन्माननीय सदस्य उपस्थित होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राजकीय पक्षाच्या मेळाव्यासाठी मोठ्या प्रमाणात बसेस पुरविण्यात आल्याने विशेष बस सेवेच्या परिपत्रकाचे उल्लंघन झाल्याने नागरिकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, बस सेवेसाठी रुपये ९,९९,४०,५००/- (रुपये नऊ कोटी नव्याण्णव लक्ष चाळीस हजार पाचशे मात्र) इतकी रक्कम रोख स्वरुपात आगार व्यवस्थापन, मुंबई आगार यांचेकडे कोणत्या खाजगी व्यक्ती, संस्था अथवा कंपनीकडून भरण्यात आली आहे, तसेच त्यांनी विशेष बस सेवा पुरविण्यासाठी लागणाऱ्या योग्य त्या कागदपत्रांची पुर्तता केली होती काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुषंगाने बस सेवा पुरविताना विशेष बस सेवेच्या परिपत्रकाचे उल्लंघन करणाऱ्या संबंधित राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय.

(२) या मेळाव्यासाठी उपस्थित सन्माननीय व्यक्तींबाबत माहिती उपलब्ध नाही.

(३) नाही.

(४) रुपये ९,९९,४०,५००/- (रुपये नऊ कोटी नव्याण्णव लक्ष चाळीस हजार पाचशे मात्र),ही रक्कम रोख स्वरुपात आगार व्यवस्थापक मुंबई यांचेकडे एकूण ७९० खाजगी व्यक्ती यांनी भरणा केलेली आहे. व महामंडळाचे विशेष बससेवा पुरविण्याच्या परिपत्रकान्वये तरतुदींचे पूर्णपणे पालन करण्यात आले आहे.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पाथरी (जि.परभणी) येथील श्री साईबाबा तीर्थक्षेत्र विकास आराखड्यास मंजुरी देणेबाबत

**(१८) * १९०९५ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमोल मिटकरी : दिनांक २१ मार्च, २०२३ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ८ मधील प्रश्न क्रमांक १५९४८ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाथरी (जि.परभणी) येथील श्री साईबाबा तीर्थक्षेत्र विकास आराखड्यास वारंवार त्रुटी काढून वेळकाढू धोरण व विलंब करण्यात येत असल्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ०१ नोव्हेंबर,२०२२ रोजी मा.मुख्यमंत्री महोदयांना लेखी निवेदन दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आराखड्यास जिल्हा कार्यकारी समिती व मा.पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समितीची मंजुरी घेऊन जिल्हाधिकारी, परभणी यांनी सदरील सुधारित आराखडा शासनाकडे सादर केला आहे काय,

(३) असल्यास, मुख्यमंत्री कार्यालय, मुख्य सचिव कार्यालय व जिल्हा प्रशासन यांच्या स्तरावरून होत असलेल्या विलंबाची कारणे काय व सदर आराखड्यास मंजुरी देऊन किती मुदतीत तीर्थक्षेत्राचा विकास करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) श्री साईबाबा तीर्थक्षेत्र विकास आराखडा, पाथरी, जि.परभणी या आराखड्याबाबत जिल्हाधिकारी, परभणी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय कार्यकारी समितीची बैठक दिनांक ०६ जानेवारी, २०२३ रोजी संपन्न झाली. सदर बैठकीमध्ये जिल्हाधिकारी यांनी पाथरी नगरपरिषदेस रुपये ८० कोटींचा आराखडा तयार करुन जिल्हास्तरीय कार्यकारी समिती व मा.पालकमंत्री यांच्या शिफारशीसह सादर करण्याबाबत निर्देश दिले आहेत. त्यानुषंगाने, सुधारित प्रस्ताव तयार करण्याची कार्यवाही नगरपरिषद स्तरावर सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना व्यावसायिक अभ्यासक्रमासाठीची दुसऱ्या टप्प्यातील शिष्यवृत्ती मिळण्याबाबत

**(१९) * १९३६८ श्री.रामदास आंबटकर, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मागासवर्गीय घटकातील विद्यार्थ्यांना समाजकल्याण विभागाकडून व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी शिष्यवृत्ती देण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या सन-२०२२ मध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची दुसऱ्या टप्प्यातील रक्कम खात्यात जमा न झाल्याने महाविद्यालयाकडून विद्यार्थ्यांची कागदपत्राकरीता अडवणूक होत असल्याने पुढील प्रवेशासाठी विद्यार्थ्यांची गैरसोय होत असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने व्यावसायिक अभ्यासक्रमासाठीची दुसऱ्या टप्प्यातील शिष्यवृत्ती लवकरात लवकर वितरित करणेबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाच्या सदस्यपदी अनुसूचित जमातीच्या प्रतिनिधींची नियुक्ती करण्याबाबत

**(२०) * १९९८० श्री.आमश्या पाडवी :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाची स्थापना सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने सन २००५-२००६ मध्ये केली असून सदर आयोगाची संरचना करताना एकूण ०५ सदस्यांपैकी ०२ सदस्य हे अनुसूचित जाती व ०२ सदस्य हे अनुसूचित जमाती प्रवर्गातून असावे असा नियम ठेवण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आयोगाच्या स्थापनेपासून आजपर्यंत श्री.आर. टी. वळवी यांचे व्यतिरिक्त कोणत्याही आदिवासी समाजाच्या प्रतिनिधीस आयोगावर प्रतिनिधित्व करण्याची संधी प्राप्त झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, समिती संरचना करताना अस्तित्वात असलेले नियमाचे उल्लंघन होत असून, आयोगाकडे अनुसूचित जमातीच्या नागरिकांच्या तक्रारी सादर होण्याचे प्रमाण देखील खूप कमी आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अनुसूचित जाती जमाती आयोगामध्ये अनुसूचित जमातीच्या सदस्यांची नियुक्ती करणेबाबत कोणती कार्यवाही केली

वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्काराचे गत पाच वर्षापासून वितरण केले नसल्याबाबत

**(२१) * १९६६८ प्रा.राम शिंदे, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.रामदास आंबटकर, श्री.निलय नाईक :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सामाजिक न्याय विभागाद्वारा दिला जाणारा प्रतिष्ठेचा "डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण" पुरस्कार गत पाच वर्षांपासून म्हणजेच सन २०१७- २०१८ पासून जाहीर केला नसल्याची बाब माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती भटक्या जाती व इतर मागासवर्गीय यांच्यासाठी तसेच शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या अपंग, कुष्ठरोगी, पिडित, दुर्लक्षित या गरजूंची निष्ठेने सेवा करून सामाजिक क्षेत्रात मौलिक कार्य करणाऱ्या सेवाभावी व्यक्ती व सामाजिक संस्थांचा त्यांनी केलेल्या कामाचा यथोचित गौरव व्हावा व त्यांनी केलेल्या कामाची दखल घेण्यात यावी यासाठी सन १९७१ - १९७२ पासून हा पुरस्कार देण्याची योजना कार्यान्वित केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन १९८९ पासून संस्थांना पुरस्कार देण्याचा निर्णय घेण्यात येऊन डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्काराची घोषणा दरवर्षीच्या १४ एप्रिल रोजी करण्यात येते परंतु, गत पाच वर्षांपासून सदर पुरस्काराचे वितरणही करण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने गत पाच वर्षांपासून प्रलंबित असलेल्या पुरस्काराचे वितरण लवकरात लवकर करण्यासाठी तसेच यापुढे दरवर्षी विहित दिवशी सदर पुरस्काराचे वितरण करण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे,

सन २०१९-२०२० पासून पुरस्कार जाहीर करण्यात आलेले नाहीत.

(२) होय, हे खरे आहे.

(३) हे अंशत: खरे आहे,

सन २०१९-२०२० पासून पुरस्कार जाहीर करण्यात आलेले नाहीत.

(४) प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे (बार्टी) या संस्थेस अधिछात्रवृत्तीकरिता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(२२) * १९१६९ श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे (बार्टी) या संस्थेकडे अतिरिक्त निधी नसल्यामुळे सन २०२१ मध्ये संशोधन अधिछात्रवृत्तीसाठी पात्र ठरलेल्या अनुसूचित जाती प्रवर्गाच्या ८६१ विद्यार्थ्यांना दोन वर्षांपासून अधिछात्रवृत्ती मिळाली नसल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनुसूचित जाती प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांनी अधिछात्रवृत्ती मिळावी म्हणून मुंबई येथील आझाद मैदानावर माहे मार्च, २०२३ मध्ये आंदोलन केले होते त्यानुषंगाने विद्यार्थ्याचे शैक्षणिक भवितव्य लक्षात घेऊन निधीची तरतूद करुन बार्टीच्या संशोधकांना अधिछात्रवृत्ती देणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बार्टी या संस्थेस निधी उपलब्ध करुन अनुसूचित जाती प्रवर्गाच्या ८६१ विद्यार्थ्यांना अधिछात्रवृत्ती देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२) व (३) सामाजिक न्याय विभागाच्या दिनांक १२/०४/२०२३ पत्रान्वये एकूण ८६१ विद्यार्थाना फेलोशिप देण्याकरिता मान्यता देण्यात आली आहे. अधिछात्रवृत्तीचा लाभ देताना UGC मार्गदर्शक तत्वानुसार कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेने लेप्टोस्पायरोसिस या संसर्गजन्य आजारा वर नियंत्रण ठेवण्याकरिता उपाययोजना करण्याबाबत

**(२३) * १९४३२ श्री.सचिन अहिर, श्री.आमश्या पाडवी, ॲड.अनिल परब, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेने पावसाळा जवळ आल्याने लेप्टोस्पायरोसिस हा संसर्गजन्य आजार रोखण्यासाठी माहे जानेवारी ते एप्रिल,२०२३ या कालावधीत प्रत्येकी २२ रुपया प्रमाणे सुमारे १,८५,२७०

इतके उंदीर मारण्यात आल्याची बाब दिनांक ५ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी महानगरपालिकेकडून निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती काय, एकूण किती निविदा प्राप्त झाल्या, कोणत्या कंपनीची निविदा मंजूर करण्यात आली आहे,

(३) असल्यास, निविदा प्रक्रिया राबविण्यात आली नसल्यास, शासनाने चौकशी करुन काय कार्यवाही केली आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) मुषकांमुळे होणाऱ्या आजारांवर नियंत्रण ठेवण्याकरिता माहे जानेवारी ते एप्रिल,२०२३ या कालावधीत बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत एकूण १,८५,२७० इतके मूषक विविध पध्दतीने मारण्यात आले आहेत. त्यापैकी १,५८,९०९ इतके मूषक बाह्यस्त्रोतांद्वारे नेमण्यात आलेल्या संस्थांतर्फे "रात्रपाळी मूषक संहारण" पध्दतीने मारण्यात आले आहेत.

सदर पध्दतीने मारण्यात आलेल्या मूषकांकरीता प्रति मूषक रुपये २३/- प्रमाणे अधिदान करण्यात आले आहे.

(२) याकरिता महानगरपालिकेमार्फत निविदा मागविण्यात आल्या नाहीत.

बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात बाह्यस्त्रोतांद्वारे मुषक संहारण मोहिम राबविण्यासाठी सार्वजनिक जाहिरातीद्वारे महानगरपालिकेमध्ये नोंदणीकृत "स्वच्छ मुंबई प्रबोधन अभियान" अंतर्गत कार्यरत संस्थांकडून स्वारस्याची अभिव्यक्ती (Expression of Interest) मागवून सोडत काढून विभागवार नेमणूक करण्यासाठी महानगरपालिका आयुक्त यांनी दिनांक २३/१०/२०१५ रोजी मान्यता दिली.

त्यानुसार, सध्या उप आयुक्त (सार्वजनिक आरोग्य) यांच्या मंजूरीने स्वच्छ मुंबई प्रबोधन अभियान अंतर्गत काम करणाऱ्या संस्था, बेरोजगार, सहकारी व सेवाभावी संस्था यांच्याकडून सार्वजनिक जाहिरातीद्वारे अर्ज मागविण्यात आले होते. सदर प्रक्रियेमध्ये ४७ अर्ज प्राप्त झाले होते. त्यापैकी सोडत पध्दतीने महानगरपालिकेच्या १७ विभागांमध्ये १० संस्थांची निवड करण्यात आली आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आंबेगाव कात्रज (जि.पुणे) येथील मागासवर्गीय मुलींच्या शासकीय वसतीगृहात सोयीसुविधांचा अभाव असल्याबाबत

**(२४) * १९५१२ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.आमश्या पाडवी, श्री.सुनिल शिंदे, श्री.सचिन अहिर, श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आंबेगाव कात्रज (जि.पुणे) येथील मागासवर्गीय मुलींच्या शासकीय वसतीगृहात मुलींची राहण्याची व जेवणाची अत्यंत दयनीय अवस्था झाली असल्याची बाब माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागासवर्गीय वसतीगृहातील विद्यार्थ्यांना प्रत्येकी जेवणासाठी दरमहा रुपये ४,८०० दिले जात असतानाही जेवणाचा दर्जा अत्यंत निकृष्ठ आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर वसतीगृहात

सोयी-सुविधेचा अभाव व निकृष्ट दर्जाचे जेवण देणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२) व (३) सदर शासकीय वसतीगृहासाठी भोजन पुरवठादार संस्थेस रुपये ४९८५/-प्रतिमहा प्रतिविद्यार्थी या दराने भोजन पुरवठ्याचे आदेश देण्यात आलेले असून, प्रवेशित विद्यार्थ्यांना नियमानुसार भोजन पुरवठा करण्यात येत आहे. वसतिगृहातील भोजनासंदर्भात प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने जिल्हा स्तरावर चौकशी समिती स्थापन करण्यात आली असून, समितीमार्फत प्रकरणी चौकशी करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई उपनगरातील बोरिवली नजीकच्या गोराई, कुलवेम, उत्तन, मनोरी या परिसरातील नागरिकांना सोयीसुविधा उपलब्ध करुन देणेबाबत

**(२५) * १९०१६ श्री.प्रसाद लाड, श्री.राजहंस सिंह, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई उपनगरातील गोराई, कुलवेम, उत्तन, मनोरी यासह विविध भाग मुंबईत असूनही अनेक नागरिक पिण्याचे पाणी, रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्र, महानगरपालिका मार्केट, खेळाचे मैदान, उद्यान, फायर स्टेशन, प्रसुतिगृह यांसारख्या सुविधापासून वंचित असल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या भागाकरिता विशेष पॅकेज पालिकेने जाहीर करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुंबई शहर व उपनगरातील उद्यान, मनोरंजन मैदान व मोकळ्या जागेची देखभाल करण्याकरिता महानगरपालिकेने तब्बल १३८ कोटी रुपयांच्या खर्चाचे अंदाजपत्र तयार करुन काही कंत्राटदारांनी महानगरपालिका अधिकाऱ्यांशी संगनमत करून ३० ते ४१ टक्के इतक्या कमी दराने काम करण्याची तयारी दर्शविल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मुंबईतील उद्यानांचा दर्जा खालावणार असून फसवणूक करणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर शासन कोणती कारवाई करणार आहे,
(५) असल्यास, मुंबई उपनगरातील गोराई, कुलवेम, उत्तन, मनोरी यासह मुंबईतील विविध भागातील मूलभूत सुविधांसाठी विशेष पॅकेज देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) गोराई, कुलवेम व मनोरी या भागात पिण्याचे पाणी, रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्र व प्रसुतीगृह यांसारख्या सुविधा बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत पुरविल्या जातात.

गोराई भागामध्ये २ व मनोरी भागामध्ये २ ठिकाणी विकास नियोजन आराखडा २०३४ नुसार किरकोळ मंडईचे आरक्षण असून, सदर आरक्षित भूखंड बृहन्मुंबई महानगरपालिकेस हस्तांतरीत झाल्यानंतर त्याठिकाणी मंडई विकसित करणे शक्य होणार आहे.

गोराई व मनोरी या भागात सद्य:स्थितीत अग्निशमन केंद्र अस्तित्वात नाही. तथापि, मौजे गोराई, ता.बोरीवली येथील सर्वे नं.५९/०१, न.भू.क्र.९८, येथील २००० चौ.मी. जमीन मिनी फायर स्टेशनकरिता अग्निशामन दल, मुंबई महानगरपालिका यांना हस्तांतरण करण्याबाबत महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या संचालक मंडळाने दिनांक ११/०६/२०२१ रोजीच्या बैठकीत ठराव पारित केला आहे.

उत्तन या भागात मिरा-भाईंदर महानगरपालिकेमार्फत पाणीपुरवठा करण्यात येत असून सदर ठिकाणी पाणीपुरवठा सुरळीत सुरु आहे. तसेच ज्या ठिकाणी महानगरपालिकेमार्फत जलवाहिनी टाकणे शक्य नाही त्या परिसरातील नागरिकांना विंधन विहिर व टँकरमार्फत पाणीपुरवठा करण्यात येत असून सदर ठिकाणी महानगरपालिका मार्केट, उद्यान, फायर स्टेशन इ. सेवा उपलब्ध आहेत. उत्तन कार्यक्षेत्रात मिरा-भाईंदर महानगरपालिकेचे १ नागरी आरोग्य केंद्र व मुर्धा व मोर्वा अशी २ उपकेंद्रे कार्यरत आहेत. सदर नागरी आरोग्य केंद्र व उपकेंद्रांमार्फत महिला व नागरिकांसाठी भाईंदर येथे २०० खाटांचे पंडित भीमसेन जोशी सामान्य रुग्णालय हे शासकीय रुग्णालय उपलब्ध आहे. सदर ठिकाणी प्रसूती सेवा तसेच मेडिकल, सर्जिकल व निदानात्मक वैद्यकीय सुविधा उपलब्ध आहेत. गरोदर माता व इतर रुग्णांना रुग्णालयात जाण्याकरीता मनपाच्या रुग्णवाहिका तसेच १०८ क्रमांकाची रुग्णवाहिका उपलब्ध आहेत. तसेच उत्तन कार्यक्षेत्रात चौक येथे १५ व्या वित्त आयोगांतर्गत आरोग्य वर्धिनी केंद्र मंजूर करण्यात आले असून ते लवकरच सुरु करण्यात येणार आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) मुंबई शहर आणि उपनगरातील उद्याने, मनोरंजन मैदाने, मोकळ्या जागा, वाहतूक बेटे व रस्ता दुभाजक इ. सुमारे १११६ भूभागांचे परिरक्षण करण्याकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत माहे जानेवारी, २०२३ ते एप्रिल, २०२३ दरम्यान निविदा मागवून रुपये १४९ कोटी इतक्या रकमेच्या परिरक्षण कामाकरीता कंत्राटदारांची ०१ वर्ष ०६ महिने इतक्या कालावधीकरीता विभागनिहाय नेमणुक करण्यात आली आहे.

सदर निविदेमध्ये कंत्राटदारांनी कमाल उणे १४% ते किमान उणे ४१.२०% व सरासरी उणे ३०.०८% इतक्या दराने काम घेतले आहे. याबाबत सदर नियुक्त कंत्राटदारांनी त्यांच्याकडील उपलब्ध असलेल्या संसाधनेच्या अनुषंगाने विश्लेषण दरसूची सादर केली असून, महानगरपालिकेच्या अटी व शर्तीनुसार परिरक्षणाची कामे करुन घेण्यात येत आहेत. सबब मुंबईतील उद्यानांचा दर्जा खालावणार नाही याची दक्षता बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत घेण्यात येत आहे.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मागासवर्गीय विद्यार्थ्यांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेंतर्गत निधीची तरतूद करणेबाबत

**(२६) * १८८७५ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रसाद लाड, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अनुसूचित जाती व नवबौध्द विद्यार्थ्यांना इयत्ता अकरावी, बारावी आणि त्यानंतरच्या व्यावसायिक, तसेच बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश मिळालेल्या, परंतु क्षमतेअभावी शासकीय किंवा महाविद्यालयाच्या वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांना भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना सन २०१६-१७ पासून सामाजिक न्याय विभागांतर्गत राबविण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर स्वाधार योजेनेतून गेल्या ७ वर्षांपासून रोख मदत दिली जात आहे, परंतु गत ५ वर्षांपासून किती विद्यार्थांना मदत करावी याचे उद्दिष्ट समाजकल्याण आयुक्तालयाने ठरवले नसल्याची बाब माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सन २०२२-२०२३ मधील निधीची निम्मी तरतूद उपलब्ध होणार असल्याने हजारो गरीब विद्यार्थी लाभापासून वंचित राहणार असून याबाबत आयुक्तालयाकडे माहिती मागितली असता अशी एकत्रित माहिती आयुक्तालय स्तरावर उपलब्ध नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, गत दोन वर्षांत समाज कल्याण विभागाकडे आलेला साडेतीन कोटी रूपयांचा निधी परत गेला आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मागसवर्गीय विद्यार्थ्यांसाठी स्वाधार योजनेसाठी नियोजनबध्द कार्यवाही करुन जास्तीत जास्त निधीची तरतूद करण्याबाबत तसेच या योजनेच्या प्रसाराबरोबरच अटी शिथील करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय.

शासकीय वसतिगृहात प्रवेश घेण्यास पात्र असलेल्या परंतु शासकीय वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्गातील विद्यार्थ्यांना भोजन, निवास, शैक्षणिक साहित्य, निर्वाह भत्ता व इतर आवश्यक सुविधा स्वत: उपलब्ध करून घेण्यासाठी सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षापासून भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना राबविण्यात येत आहे.
(२) सदर योजनेंतर्गत सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षात १५००० विद्यार्थ्यांना लाभ देण्याचे निश्चित करण्यात आले असून, सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षामध्ये त्यामध्ये १०००० इतकी संभाव्य वाढ विचारात घेऊन २५००० विद्यार्थ्यांना योजनेचा लाभ देण्याचे निश्चित करण्यात आले होते. तसेच, शासन निर्णय, दिनांक १३ जून, २०१८ अन्वये आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांनी सर्व प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण यांना त्यांच्या विभागाचे उदिष्ट निश्चित करून अर्जाच्या उपलब्धतेनुसार त्यांच्या विभागातील सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण यांना उदिष्ट ठरवून देण्याबाबत सूचित केलेले आहे.
(३) व (४) भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेची मागील तीन वर्षातील तरतूद व खर्च याबाबतचा तपशील खालीलप्रमाणे आहे :-

(रूपये कोटीमध्ये)

| अ. क्र. | वर्ष | प्राप्त तरतूद | वितरित तरतूद | खर्च |
|---|---|---|---|---|
| १. | २०२०-२१ | ७५.०० | ७५.०० | ७४.९६ |
| २. | २०२१-२२ | १००.०० | १००.०० | ८९.९९ |

(५) सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षासाठी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर योजनेंतर्गत रुपये १५० कोटी इतकी तरतूद करण्यात आली असून, आतापर्यंत या योजनेंतर्गत रुपये ७५ कोटी इतका निधी वितरित करण्यात आलेला आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## माथेरान येथील अवकाशगृह प्रकल्पाची दुरवस्था झाल्याबाबत

**(२७)** * **१९९६२ श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जागतिक दर्जाचे पर्यटन स्थळ व प्रदूषण मुक्त असणाऱ्या माथेरानमध्ये विरंगुळयातून अभ्यासासाठी आकाशातील तारे, ग्रह, धुमकेतू, उल्का यांमध्ये होणारे बदल पाहता यावेत याकरीता माथेरान नगरपालिकेच्या माध्यमातून जवळपास दीड कोटी रूपये खर्च करून अवकाशगृह प्रकल्पाची निर्मिती करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू प्रकल्पांतर्गत या ठिकाणी वातानुकुलित थिएटरची निर्मिती करण्यात येऊन या थिएटरमधून पर्यटकांना खगोलीय माहितीपट दाखविणे, टेरेसवरील मोठमोठ्या टेलिस्कोपमधून अवकाशातील तारे, ग्रह तसेच इतर खगोलीय घटना पर्यटकांना पहावयास मिळत होत्या, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पर्यटकांचा भरघोस प्रतिसाद लाभत असतानाही गत तीन वर्षांपासून सदरहू केंद्र बंद असल्याने या ठिकाणी असलेली महागडी टेलिस्कोप, थिएटरमधील यंत्रणा, अन्य इलेक्ट्रॉनिक उपकरणे अशी विविध संसाधने वापराविना असून या ठिकाणी पसरलेले दुर्गंधीचे साम्राज्य, तुटलेल्या रेलिंग, गंजलेले दरवाजे यामुळे या अवकाशगृहाची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू प्रकल्प कार्यान्वित करण्याबाबत खगोलप्रेमी व अभ्यासकांकडून शासनाकडे वारंवार मागणी करण्यात येऊनही शासनाकडून कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदरहू अवकाशगृह तातडीने पूर्ववत अद्ययावत सुविधांसह सुरू करून पर्यटकांना व खगोल अभ्यासक यांना देण्यात येणाऱ्या सुविधा तातडीने सुरू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) माथेरान हे पर्यटन स्थळ असून पर्यटकांच्या मनोरंजनासाठी नगरपरिषदेने नाविन्यपूर्ण योजना अंतर्गत प्राप्त झालेल्या रुपये ६५ लक्ष इतक्या अनुदानातून अवकाशगृह प्रकल्प उभारण्यात आला आहे, ही वस्तुस्थिती आहे.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) खराब झालेल्या रेलिंग व दरवाज्यांची दुरुस्ती नगरपरिषदेकडून करण्यात येत असून स्वच्छतेबाबत देखील वेळोवेळी उपाययोजना करण्यात येत आहेत.
(५) सदर प्रकल्पाच्या ठिकाणी असलेले थ्री.डी. थिएटर चालविणे, आधुनिक दुर्बिणचा वापर करणे, येणाऱ्या पर्यटकांना अवकाशगृहाची माहिती देणे इ.करीता माहितीगार व तज्ञाची नेमणूक करण्यासाठी

नगरपरिषदेने दोन ते तीन वेळा निविदा मागविल्या असता त्यास अपेक्षित प्रतिसाद मिळाला नाही. दरम्यानच्या कालावधीत माहे मार्च, २०२० पासून कोविड-१९ या संसर्गजन्य साथीचा मोठ्या प्रमाणात प्रादुर्भाव झाल्यामुळे अत्यावश्यक सेवा वगळता अन्य सर्व सुविधा या कालावधीत बंद करण्यात आल्या होत्या. सदरचा प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठी योग्य ती उपाययोजना करण्याचे नगरपरिषदेचे नियोजन आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर जिल्ह्यातील दिव्यांग विद्यार्थ्यांना तांत्रिक साधने उपलब्ध करुन देणेबाबत

**(२८) * १९७४४ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.राजेश राठोड, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दिव्यांग विद्यार्थ्यांना सक्षम बनविण्यासाठी विविध तांत्रिक सुविधांचा वापर दिव्यांग शिक्षणात केला जातो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोल्हापूर जिल्ह्यात दिव्यांगांना अशा तांत्रिक सुविधा उपलब्ध करुन देण्यास दिरंगाई होत असून काही शाळांना ही साधनसामुग्री अपुरी मिळाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दिव्यांगांना द्यावयाची तांत्रिक साधने उपलब्ध करुन देण्यासाठी नवीन शैक्षणिक वर्षात दिव्यांग कल्याण निधीची तरतूद करणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दिव्यांग कल्याण निधीतून कोल्हापूर जिल्ह्यातील शाळांना व विद्यार्थ्यांना सक्षम करण्यासाठी तांत्रिक सुविधा उपलब्ध करुन देणेबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) तांत्रिक सुविधा उपलब्ध करून देण्याची जबाबदारी संबंधित संस्थेची आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील सर्व शाळांमध्ये तांत्रिक सुविधा उपलब्ध करुन दिलेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) संबंधित संस्थेद्वारे शाळेस आवश्यक तांत्रिक सुविधा उपलब्ध करून दिलेल्या आहेत. तरीही जिल्हा परिषद कोल्हापूरने जिल्हास्तरीय दिव्यांग कल्याण निधीतुन सन २०२१-२२ मध्ये एकूण ३९,८९,८४५/- रुपये व सन २०२२-२३ मध्ये १४,४६,५००/- इतक्या रक्कमेचे साहित्य उपलब्ध करून देण्यात आले आहे. सन २०२३-२४ मध्ये ५० लाख एवढी तरतुद उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## खेड (जि.रत्नागिरी) येथील पोसरे बौध्दवाडीमधील कुटुंबांचे पुनर्वसन करण्याबाबत

**(२९) * १९५६४ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पोसरे बौध्दवाडी (ता.खेड, जि.रत्नागिरी) येथे दिनांक २२ जुलै, २०२१ रोजी दरड कोसळून १६ जणांचा मृत्यू व ९ कुटुंबे बेघर झाली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कुटुंबांचे पुनर्वसन करण्याच्या आश्वासनास दोन वर्षे पूर्ण होऊनही अद्यापी त्यांचे पुनर्वसन करण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बेघर कुटुंबांचे पुनर्वसन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल पाटील :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) मौजे पोसरे बौध्दवाडी ता.खेड येथे दिनांक २२/०७/२०२१ रोजी दरड कोसळून बाधित झालेल्या ९ कुटुंबाचे तात्पुरते पुनर्वसन अलोरे ता.चिपळूण येथील शासकीय वसाहतीमध्ये करण्यात आले असून उक्त कुटुंबे सध्या त्या ठिकाणी वास्तव्यास आहेत.

उक्त बाधित कुटुंबाचे तथा ग्रामस्थांचे पुनर्वसन मौजे खोपी ता.खेड येथील गट नं. ४६७ क्षेत्र येथे करण्याचे प्रस्तावित करण्यात आले असता सदर ठिकाणी पुनर्वसन करण्यास ग्रामस्थांनी विरोध दर्शविल्याने उप विभागीय अधिकारी, खेड यांनी मौजे पोसरे बौध्दवाडी येथील एकूण २३ स.नं. च्या जागा पुनर्वसनासाठी सुचविल्या होत्या. परंतु, सदर मिळकतीच्या सहहिस्सेदारांनी संमती न दिल्याने उक्त जागेवर बाधित कुटबांचे पुनर्वसन होऊ शकले नाही. तदनंतर मौजे असगणी ता.खेड येथील सं.नं. ५०५/अ/१ येथील क्षेत्रावर पुनर्वसन करण्याबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांच्या स्तरावर विचाराधीन असून उक्त जागा उपलब्ध करून देण्याबाबत त्यांनी शासनास विनंती केली असता दिनांक १४/१०/२०२२ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार पुनर्वसन करावयाच्या बाधित कुटुंबाची संख्या १५ किंवा कमी असल्यास अशा प्रकरणी सर्वसाधारणपणे त्यांचे पुनर्वसन त्यांनी स्वत: करण्याबाबत संबंधित बाधित कुटुंबियांशी तहसिलदार, खेड यांच्यासमवेत दिनांक २६/०६/२०२३ रोजी झालेल्या बैठकीत विचारणा केली असता उक्त कुटुंबीयांनी ते स्वेच्छा पुनर्वसनास तयार नसल्याचे लेखी कळविले आहे.

मौजे पोसरे बौध्दवाडी येथे दरड कोसळून बाधित झालेल्या कुटुबांचे पुनर्वसन करण्याच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांनी कळविल्यानुसार वरीलप्रमाणे कार्यवाही शासनाकडून करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

## सोलापूर महानगरपालिकेस रमाई आवास योजनेंतर्गत प्रलंबित निधी वितरित करण्याबाबत

**(३०) * १८८५० श्री.अरुण लाड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुसूचित जाती व नवबौध्द समाजातील कुटुंबियांसाठी रमाई आवास योजना राबविली जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सोलापूर शहर परिसरात सामाजिक न्याय विभाग व सोलापूर महानगरपालिकेच्यावतीने सोलापूर महानगरपालिका क्षेत्रात सदर योजना राबविली जात असून कोरोना काळानंतर दोन वर्षे होऊनदेखील या योजनेसाठी शासनाकडून अद्याप निधीच उपलब्ध करुन देण्यात आला नसल्याची बाब दिनांक २४ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर योजनेंतर्गत सोलापूर जिल्ह्यामधील पात्र लाभार्थ्यांसाठी शासनाकडून रुपये १०० कोटी इतक्या निधीची आवश्यकता असतानाही शासनाने सोलापूरसह पुणे महसूल विभागासाठी रुपये २१ कोटी इतका निधी वितरित केला असल्याचेही दिनांक २१ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सोलापूर जिल्ह्यातील अनुसूचित जाती व नवबौध्द समाजातील कुटुंबियांसाठी सोलापूर महानगरपालिकेस रमाई आवास योजनेंतर्गत प्रलंबित निधी वितरित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.
(२), (३) व (४) हे खरे नाही.

सोलापूर महानगरपालिकेअंतर्गत रमाई आवास योजना मध्ये ६६९० इतके उद्दीष्ट मंजूर करण्यात आले असून यापैकी ३३७५ घरकुले मंजूर करण्यात आली आहेत. तसेच या योजनेंतर्गत रुपये ९९.११ कोटी इतका निधी उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. तसेच संबंधित कार्यान्वयीन यंत्रणेला वेळोवेळी निधी वितरित करण्यात आलेला आहे. सद्य:स्थितीत निधीअभावी कोणतेही घरकुलाचे बांधकाम प्रलंबित नाही तसेच सोलापूर महानगरपालिका यांच्याकडून लाभार्थ्यांच्या घरकुल बांधकामाचे अनुदानबाबत कोणतीही मागणी प्रलंबित नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात कापसाच्या दरात घट झाल्याबाबत

**(३१) * ११९७५ डॉ.प्रज्ञा सातव, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले : तारांकित प्रश्न क्रमांक १२८१९ ला दिनांक १७ मार्च, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात कापसाच्या दरामध्ये क्विंटलमागे ५०० रुपयांनी घट झाली असल्याचे माहे मार्च,२०२३ च्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सरकीच्या दरात झालेल्या घसरणीमुळे कापूस उत्पादक शेतकरी निराश झाले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने माहिती व निर्णय घेऊन कापूस उत्पादकांना उत्पादन खर्चावर आधारीत हमीभाव देऊन त्यांचा कापूस खरेदी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अब्दुल सत्तार :** (१) व (२) कापूस हंगाम २०२२-२३ करिता केंद्र शासनाने लांब धाग्याच्या कापसासाठी रुपये ६,३८०/- प्रति क्विंटल व मध्यम धाग्याच्या कापसासाठी रुपये ६,०८०/- प्रति क्विंटल इतका हमी दर जाहीर केलेला आहे. कापसाच्या गुणवत्तेनुसार व मागणीनुसार खुल्या बाजारात कापसाला दर प्राप्त होतात. माहे मार्च, २०२३ च्या दरम्यान सरकीच्या व रुईच्या दरातील चढ-उतारानुसार कापसाच्या दरात अंदाजे रुपये ३००/- ते रुपये ५००/- प्रती क्विंटल दरम्यान घट झाल्याचे निदर्शनास आले आहे.
(३) राज्यात सध्या खुल्या बाजारपेठेत कापसाचे दर प्रति क्विंटल रुपये ६,९००/- ते रुपये ७,२५०/- इतके असून, सदर दर हे केंद्र शासनाने निश्चित केलेल्या किमान आधारभूत किंमतीपेक्षा जास्त असल्याने महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघ यांच्याकडून हमी दराने कापूस खरेदी करण्यात येत नाही. केंद्र शासनाचे मुख्य अभिकर्ता भारतीय कपास निगम मर्या. (सीसीआय) व त्यांचे उपअभिकर्ता (सबएजंट) म्हणून महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघ यांनी हमी दराने कापूस खरेदीचे नियोजन केले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील संजय गांधी निराधार, श्रावणबाळ योजनेसह अन्य योजनांकरिता लाभार्थ्यांची उत्पन्न मर्यादा वाढविण्याबाबत

**(३२) * १९२६८ श्री.एकनाथराव खडसे : तारांकित प्रश्न क्रमांक १७३३५ ला दिनांक १ मार्च, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील संजय गांधी निराधार योजना, श्रावण बाळ निवृत्ती वेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा वेतन योजना, कुटुंब अर्थसहाय्य योजनेंतर्गत ६५ वा ६५ वर्षावरील अपंग, वृध्द, विधवा, अनाथ, दुर्लक्षित गरजू घटकांना आर्थिक मदत दिली जात आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजनेसाठी उत्पन्न मर्यादा रुपये २१०००/- एवढी असून उत्पन्न दाखल्यासाठी बराच कालावधी लागत असल्यामुळे अर्जदार लाभार्थ्यास आर्थिक, मानसिक त्रासास सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर योजनेसाठी उत्पन्नाचे दाखले देताना तहसिलदार यांचेकडून टाळाटाळ अथवा दुर्लक्ष केले जात असल्यामुळे गरजू लाभार्थ्यांना या योजनेच्या लाभापासून वंचित राहावे लागत असल्यामुळे उत्पन्न मर्यादा वाढविणेबाबतचा पत्रव्यवहार मा.मुख्यमंत्री यांचेकडे लोकप्रतिनिधींनी दिनांक २५ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास केला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर योजनेंतर्गत लाभार्थ्यांची उत्पन्न मर्यादा वाढविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे आहे, अशा स्वरुपाची निवेदने प्राप्त झाली आहेत.

(४) व (५) विशेष सहाय्य योजनेकरिता असलेली वार्षिक उत्पन्न मर्यादा वाढविण्यात आली नसून विभागाच्या दिनांक ०५/०७/२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये योजनेतील लाभार्थ्यांच्या अर्थसहाय्यात दरमहा रुपये १००० वरुन रुपये १५०० इतकी वाढ करण्यात आली आहे.

-----------------

## मुंबई-नागपूर समृध्दी महामार्गाला लागून असलेल्या शेतकऱ्यांना जाण्या-येण्याकरिता पर्यायी रस्ते उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३३) * १९२५२ श्री.धीरज लिंगाडे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-नागपूर समृध्दी महामार्गाला लागून असलेल्या शेतकऱ्यांना जाण्या-येण्यासाठी पाणंद अथवा पर्यायी रस्ते नसल्याने तसेच समृध्दी महामार्गाची कामे करत असताना जड वाहनांमुळे गाव खेड्यातील रस्ते अतिशय खराब झाल्यामुळे स्थानिक नागरिकांची गैरसोय होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, समृध्दी महामार्गाला लागून असलेल्या परिसरातील गावांना पाणंद अथवा पर्यायी रस्ते बांधण्यासाठी निधीची तरतूद केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन समृध्दी महामार्ग परिसरातील स्थानिकांना पर्यायी रस्ते उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) हे खरे नाही.

नागपूर-मुंबई समृध्दी महामार्गाला लागून असलेल्या शेतकऱ्यांसाठी वाहतूक व दळणवळण अबाधित ठेवण्यासाठी ग्रामीण मार्ग, इतर जिल्हा मार्ग, प्रमुख जिल्हा मार्ग व राज्यमार्गावर अंडरपास (VUP/VOP/PUP/LVUP) व स्वतंत्र सेवा मार्ग देण्यात आले आहेत.

समृध्दी महामार्गाचे काम चालू असताना ठेकेदाराने वापरलेल्या रस्त्यांची दुरुस्ती ठेकेदाराकडून वेळोवेळी करण्यात येऊन सदर रस्ते वाहतुकीसाठी सुरक्षित ठेवण्यात आले आहेत.

(२) व (३) हे खरे नाही.

समृध्दी महामार्गाच्या परिसरातील लोकांच्या वहीवाटीसाठी आवश्यकतेप्रमाणे अंडरपासेस (VUP/ VOC/PUP/LVUP) व सेवा रस्ते (Service Road व Cart Track) देण्यात आलेले आहेत व समृध्दी महामार्गाच्या ईपीसी करारनाम्यामध्ये आवश्यकतेप्रमाणे सध्या वाहतूक सुरू असलेल्या नागपूर ते भरवीरच्या ६०० किमीमध्ये त्यांचे बांधकाम करण्यात आलेले आहे व उर्वरित भरवीर ते ठाणे (भिवंडी) दरम्यानच्या १०१ कि.मी. मध्ये बांधकामे सुरू आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर जिल्ह्यातील लखमापूर नाला प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या क्षेत्रातील पिपळधरा गावाचे पुनर्वसन करण्याबाबत

**(३४) * १९३१५ श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्ह्यातील हिंगणा - कान्होलीबारा मार्गावरील पिपळधरा हे गाव लखमापुर नाला प्रकल्पामुळे बुडीत क्षेत्रात जाणार असल्याने या गावातील २१२ घरांचे व अंदाजे ६०० लोकसंख्या असलेल्यां घरांचे पुनर्वसन २० वर्षापासून प्रतिक्षेत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१८-१९ च्या दरम्यान या गावानजीकच्या कान्होलीबारा मार्गावरील जागेवर गावातील नागरिकांच्या पुनर्वसनाच्या कामाला सुरवात करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुनर्वसन जागेतील भुखंडाचे लाभार्थ्यांना अद्यापी वाटप न केल्यामुळे नागरिकांना जीर्ण झालेल्या घरामध्ये राहावे लागत असून त्यांना नविन पुनर्वसित जागेवर घर बांधकामासाठी आर्थिक मदत उपलब्ध केली जाणार होती, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, संपूर्ण गांव बुडीत क्षेत्रात जाणार असून लघु - पाटबंधारे विभागाचे याकडे दुर्लक्ष होत असल्याने पुनर्वसनाची कामे अतिशय संथ गतीने सुरू आहेत. पुनर्वसन प्रकल्प प्रलंबित राहण्याची कारणे काय आहेत, याबाबत तातडीने संबंधित अधिकारी व कंत्राटदारावर आवश्यक ती कारवाई करणार काय,

(५) असल्यास,संपूर्ण गावाचे पुनर्वसन होण्यास किती कालावधी लागेल, याबाबत शासनाने चौकशी केलीआहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने पुनर्वसन विलंब केल्याप्रकरणी संबंधितांवर काय कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री.अनिल पाटील :** (१) होय, हे खरे आहे. सदर प्रकल्पाची पुनर्वसन अधिनियम, १९९९ च्या कलम ११(१) व १३(१) ची अधिसूचना दि १४/०३/२०१९ व दि १९/०३/२०२० रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. त्यामुळे २० वर्षांपासून बाधित कुटुंब पुनर्वसनाच्या प्रतिक्षेत आहे, ही बाब वस्तुस्थितीवर आधारीत नाही. लखमापूर लघु पाटबंधारे प्रकल्प ता.हिंगना, जि.नागपूर अंतर्गत मौजा-पिंपळधरा बाधित झाले असून बाधित गावातील २१३ कुटुंब व ८१० लोकसंख्या बाधित आहे व पुनर्वसित गावठाणाकरिता १७.१४ हे. आर जमीन संपादित करण्यात आली आहे. धरणाचे काम २००७ पासून भूसंपादनाच्या अडचणीमुळे व भरावाकरिता बुडीत क्षेत्रामध्ये उदग्रहण क्षेत्र उपलब्ध न झाल्यामुळे व न्यायालयीन प्रकरणामुळे सन २०१५ पर्यंत बंद होते.

(२) होय, हे खरे आहे. सदर प्रकल्पाच्या पुनर्वसन आराखड्यास दिनांक ३१/१०/२०१८ रोजी महाराष्ट्र राज्य पुनर्वसन प्राधिकरण तथा राज्य पुनर्वसन व पुनर्स्थापना संनियंत्रण समितीने मान्यता प्रदान केली असून सदर कामाचे नागरी सुविधांचे अंदाजपत्रक तयार करुन निविदा ३ वेळा प्रकाशित करुन एकही अभिसरण प्राप्त न झाल्यामुळे तसेच दरम्यान कोरोना प्रादुर्भाव व दरसुची बदलामुळे नव्याने अंदाजपत्रक तयार करुन पुनश्चः निविदा काढण्यात आले व सदर कामाचा कार्यारंभ आदेश दिनांक २८/०७/२०२१ रोजी निर्गमित केला असून नागरी सुविधांची कामे प्रगतीपथावर आहे.

(३) सदर बाधित गावठाणाचे घराच्या मुल्यांकनाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले असून तांत्रिक मंजुरीक प्रदान करण्याची कार्यावाही सुरु आहे. तसेच गावठाणाच्या घरांच्या निवाड्याची कार्यवाही महसूल विभागामार्फत प्रगतीपथावर आहे.

(४) पुनर्वसन गावठाणातील नागरी सुविधांची कामे २० टक्के पूर्ण झाली असून उर्वरीत कामे प्रगतीपथावर आहेत. सदर कामे माहे जुन २४ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन असून त्यानुषंगाने कार्यवाही प्रगतीपथावर आहे.
(५) जुन २०२५ पर्यंत प्रकल्प पूर्ण करण्याचे नियोजीत असून पुनर्वसन प्रक्रिया नियमितपणे सुरु असल्याने चौकशीचा प्रश्न उदभवत नाही.

-----------------

## ठाणे येथील वागळे इस्टेट परिसरातील नो बोअरवेल झोनमध्ये बेकायदेशीरपणे बोअरवेल खोदल्याबाबत

**(३५) * १९६०९ ॲड.अनिल परब, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या महानगरपालिकेच्या जलवाहिनीला ठाणे येथील वागळे इस्टेट परिसर नो बोअरवेल झोन म्हणून ठाणे महानगरपालिकेने जाहीर करुनही एका विकासकाने उपरोक्त ठिकाणी बेकायदेशीरपणे बोअरवेल खोदण्याच्या कामात महानगरपालिकेच्या १०० मीटर खोल असलेल्या जलवाहिनीला धक्का लागल्यामुळे मुंबईमध्ये सुमारे १५% पाणीकपात करण्यात आली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या गळतीसाठी कारणीभूत ठरलेल्या बांधकाम विकासकांकडून पाण्याची नासाडी आणि दंड अशा रुपये ७५ कोटीच्या वसुलीला महानगरपालिकेला अपयश आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यांसदर्भात महानगरपालिकेने एमआयडीसीला पत्र पाठवून केवळ माहिती दिली आहे परंतु कारवाई झाली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बेकायदेशीर बोअरवेल खोदणाऱ्या तसेच दंडाची रक्कम विकासकाकडून वसुल करण्यासंदर्भात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) वागळे इस्टेट, ठाणे येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ नियोजन प्राधिकरण असलेल्या परिसरातील प्लॉट क्र. सी-३० मध्ये विकासक बेकायदेशीर बोअरवेल खोदत असताना बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या १०० मीटर खोल असलेल्या जलबोगद्याला हानी पोहोचली. सदर बाब दिनांक ०८/११/२०२२ रोजी महानगरपालिकेच्या निदर्शनास आली. सदर जलबोगदा दुरुस्ती कालावधीदरम्यान दिनांक ३१ मार्च, २०२३ पासून ३० दिवसांकरिता मुंबईमध्ये सुमारे १५% पाणी कपात करण्यात आली होती.
(२), (३) व (४) जलबोगद्याला तडा गेल्यामुळे वाया गेलेले पाणी व जलबोगदा दुरुस्ती खर्च असे एकूण रुपये १४,८९,८६,१००/- आणि त्यावरील ४००% दंडात्मक रक्कम अशी एकूण रुपये ७४,४९,३०,५००/- एवढी रक्कम विकासकाकडून वसूल करणेबाबत महानगरपालिकेमार्फत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाला दिनांक ०५/०४/२०२३ व ०६/०६/२०२३ रोजी कळविण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सिडको वाळुंज महानगर (औरंगाबाद) परिसरातील देवगिरी नदीवरील पूल वाहून गेल्याबाबत

**(३६) * १८८२७ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिडको वाळुंज महानगर (औरंगाबाद) तिसगाव परिसरातील देवगिरी नदीवर सन २०१८ ला सिडको प्रशासनाने लाखो रुपये खर्च करुन पुलाचे बांधकाम केले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पुलाचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे होत असल्याने ग्रामस्थांनी सिडको प्रशासनाकडे तक्रारी करुनही सिडकोच्या संबंधित अधिकाऱ्यांनी कामांचा दर्जा सुधारण्याबाबतीत दुर्लक्ष केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पुलाचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाले असल्याने सन २०१९ च्या पहिल्या पावसामध्ये हा पुल वाहून गेला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, गत ४ वर्षांपासून सदर ठिकाणी पुलाचे काम न झाल्याने नागरिकांच्या दळणवळणाचा प्रश्न निर्माण झाला असून विद्यार्थी, कामगार, ग्रामस्थांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर पुलाचे बांधकाम करणाऱ्या ठेकेदारासह संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करुन पुलाचे बांधकाम तात्काळ सुरु करणेबाबत सिडकोने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२) व (३) सिडकोच्या वाळूज प्रकल्पांतर्गत महानगर-१ येथील देवगिरी नदीच्या दोन्ही बाजूचे १८ मी. रस्ते २०१७ मध्ये तयार केले. नदी पात्रामधील पूल बांधण्याचे प्रस्तावित होते. परंतु दरम्यानच्या काळात रस्त्यांची अखंडता स्थापन करण्यासाठी नदी पात्रामध्ये प्रवाहासाठी सिमेंटचे पाईप टाकून त्यावर मातीचा भराव व खडीकरण करून नागरिकांना केवळ तात्पुरत्या स्वरूपाचा रस्ता वाहतुकीस तयार करण्यात आला होता.

सदर तात्पुरता रस्ता अतिवृष्टीमुळे वाहून गेला ही वस्तुस्थिती आहे.

(४) व (५) सन २०१९ मध्ये कायमस्वरूपी पुल उभारण्यासाठी संकल्पचित्र तयार करणे व स्ट्रक्चरल डिझाईन बनविण्याकरिता तज्ञ सल्लागाराची नेमणूक करण्यात आली.

सद्य:स्थितीत, सदर पुलाच्या कामास दिनांक २१/०३/२०२३ रोजी प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली असून प्रकल्पाची निविदा प्रक्रिया सुरू आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अमरावती शहरात पाण्याची नवीन पाईपलाईन करण्याबाबत

**(३७) * १९५०२ श्री.प्रविण पोटे-पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक १७८२९ ला दिनांक ८ मार्च, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती शहरात पाणीपुरवठा करणारी अप्पर वर्धा धरण येथून येणारी मुख्य पाईपलाईन जीर्ण झाल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अमरावती शहरातील भविष्यातील पाणीपुरवठा प्रकल्पाची आवश्यकता लक्षात घेऊन महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत अमृत- २ अभियानांतर्गत प्रस्ताव करुन सदर माहिती केंद्र शासनाच्या पोर्टलवर भरण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, स्थानिक प्रशासनाने अंदाजे रुपये ९५० कोटी रुपयांची नवीन पाईपलाईन टाकण्याचा प्रस्ताव शासनास पाठविला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शासनाकडे पाठविलेला प्रस्ताव मंजूर करुन अमरावती शहरात नवीन पाईपलाईन टाकण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

मूळ योजनेतील कॉंक्रिट (PSC) गुरुत्ववाहिनीचे ३० वर्षाचे आयुष्मान सन २०२४ मध्ये संपत असल्यामुळे सद्य:स्थितीस मुख्य पाईपलाईन कमकुवत झालेली आहे.
(२), (३), (४) व (५) अमरावती शहरातील भविष्यातील पाणीपुरवठा प्रकल्पाची आवश्यकता लक्षात घेता महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत अमृत २.० अभियानांतर्गत अमरावती शहर पाणीपुरवठा प्रकल्पाचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे व त्याची माहिती केंद्र शासनाच्या अमृत २.० च्या पोर्टलवर भरण्यात आलेली असून सदर पाणीपुरवठा प्रकल्प अमृत २.० अभियानांतर्गत किंवा महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियानांतर्गत विचारात घेण्यात येईल.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून अग्निशमन केंद्र उभारणीस विलंब होत असल्याबाबत

**(३८) * २०३९२ श्री.राजहंस सिंह : तारांकित प्रश्न क्रमांक १२७२४ ला दिनांक ९ मार्च, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेने सन २०२३-२०२४ या वर्षात ५ नवीन अग्निशमन केंद्र उभारण्याची घोषणा केली असून त्यापैकी ठाकूर गावामधील (कांदिवली) अग्निशमन केंद्र या वर्षाच्या माहे डिसेंबरपर्यंत कार्यन्वित होणार असून उर्वरित चेंबूर, कांजूरमार्ग, सांताक्रुज आणि अंधेरी येथील प्रस्तावित अग्निशमन केंद्रे पूर्णपणे कार्यान्वित होण्यासाठी पुढील २ ते ३ वर्ष लागण्याची शक्यता असून यामधील तीन अग्निशमन केंद्रांना अद्याप परवानगी मिळालेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कांदिवली येथील ठाकूर विलेजमधील मोठे व सुसज्ज अग्निशमन केंद्र उभारण्याबाबत तसेच उर्वरित चेंबूर कांजूरमार्ग, सांताक्रुज आणि अंधेरी येथील अग्निशमन केंद्र उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) बृहन्मुंबई महानगरपालिकेने सन २०२३-२०२४ या वर्षात ५ नवीन अग्निशमन केंद्रे उभारण्याची घोषणा केली असून त्यांची सद्य:स्थिती खालीलप्रमाणे आहे :-

१. ठाकूर व्हिलेज अग्निशमन केंद्र

ठाकूर व्हिलेज कांदिवली पूर्व येथे नवीन व सुसज्ज अग्निशमन केंद्र बांधण्याचे काम महानगरपालिकेमार्फत प्रगतीपथावर असून आजमितीस ७५% काम पूर्ण झाले आहे. सदर अग्निशमन केंद्र दिनांक २७/०१/२०२४ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे.

२. चेंबुर(माहुल)अग्निशमन केंद्र

सदर प्रस्तावित अग्निशमन केंद्र विकसीत करण्याकरीता महानगरपालिकेमार्फत प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची नेमणुक करण्यात आली आहे. प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारामार्फत अग्निशमन केंद्राच्या इमारतीचे नकाशे तयार करण्यात आले आहेत. परंतु निवड झालेल्या जागेत झाडांची संख्या जास्त असल्याने प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारामार्फत पर्यायी जागेचा शोध घेण्याचे काम सुरु आहे.

३. कांजूरमार्ग अग्निशमन केंद्र

लाल बहादूर शास्त्री मार्ग, कांजूरगांव येथील नगर भूमापन क्र. ५९१/ए/५ येथे सुविधा जागेवर अग्निशमन केंद्र व तत्संबंधित उपक्रमाची उभारणी करण्याचे काम माहे फेब्रुवारी, २०२३ पासून सुरु करण्यात आले आहे.

४. सांताक्रुझ अग्निशमन केंद्र

सदर प्रस्तावित अग्निशमन केंद्राच्या इमारतीचे नकाशे महानगरपालिकेच्या वास्तुविशारद यांनी तयार केले आहेत. तसेच प्लॉट मधून जाणाऱ्या नाल्याच्या कव्हरींगचे काम करण्यासाठी महानगरपालिकेच्या सक्षम प्राधिकाऱ्यांची परवानगी प्राप्त झाली आहे. माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये नाला कव्हरिंगचे काम सुरु करण्याचे प्रस्तावित आहे.

५. अंधेरी/आंबोली अग्निशमन केंद्र

सदर प्रस्तावित अग्निशमन केंद्राची जागा निवास आरक्षण धोरण (Accommodation Reservation Policy) अंतर्गत विकास कामाकरिता मे. शहा कंस्ट्रक्शन यांना देण्यात आली आहे. या धोरणांतर्गत सदर अग्निशमन केंद्र मे.शहा कंस्ट्रक्शन यांच्यामार्फत विनामुल्य विकसित करण्याचा प्रस्ताव आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी मंजूर केला आहे.

मे. शहा कंस्ट्रक्शन यांनी प्रस्तावित अग्निशमन केंद्र बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र मिळाल्यापासून १८ महिन्यात पूर्ण करुन ते महानगरपालिकेस हस्तांतरीत करण्याचे मान्य केले आहे. सद्य:स्थितीत आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता करुन बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र प्राप्त करण्याची कार्यवाही मे.शहा कंस्ट्रक्शन यांच्यामार्फत सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या सर्वसाधारण सभेतील प्रलंबित निर्णयाबाबत

**(३९)** * **२०४४ श्री.अनिकेत तटकरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य परिवहन महामंडळाची ३०२ वी सर्वसाधारण सभा महामंडळाचे अध्यक्ष तथा राज्याचे मुख्यमंत्री यांचे अध्यक्षतेखाली २९ नोव्हेंबर, २०२२ रोजी पार पडली असून बैठकीत जवळपास ५७ ठरावांना मंजूरी

देण्यात आली असून, ठरावात ५१५० इलेक्ट्रीक बस भाडेतत्वावर घेणे, एसटी महामंडळाच्या कर्मचाऱ्यांना सुधारीत वेतनश्रेणी देणे, कर्मचाऱ्यांचे गणवेश भत्ते व इतर महत्वाचे विषय अंतर्भुत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ठरावावर मंजुरीसाठी एसटी महामंडळाचे अध्यक्ष या नात्याने राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी स्वाक्षरी केली नसल्याची बाब एसटी महामंडळाचे अमृत महोत्सवाच्या कार्यक्रमाच्या पार्श्वभूमिवर निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ठरावात ५१५० इलेक्ट्रीक बस भाडेतत्वावर घेणे, एसटी महामंडळाच्या कर्मचाऱ्यांना सुधारीत वेतनश्रेणी देणे, कर्मचाऱ्यांचे गणवेश भत्ते व इतर महत्वाचे विषयाबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केल्या आहेत वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) राज्य परिवहन महामंडळाची ३०२ वी संचालक मंडळाची बैठक महामंडळाचे अध्यक्ष तथा मुख्यमंत्री (परिवहन) यांचे अध्यक्षतेखाली दिनांक १८ नोव्हेंबर, २०२२ रोजी पार पडली. सदर बैठकीत ५१५० इलेट्रिक बसेस भाडेतत्वावर घेणे, अधिकाऱ्यांना सुधारित वेतनश्रेणी देणे इत्यादी एकूण ३२ ठरावांवर चर्चा करण्यात आली.
(२) व (३) मा.मुख्यमंत्री यांनी संचालक मंडळाच्या ३०२ व्या बैठकीच्या इतिवृत्तास मंजूरी दिली आहे. त्यानुसार पुढील कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आचोळे (नालासोपारा) अलकापुरी येथे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत नव्याने रेल्वे उड्डाणपूल विकसित करण्याबाबत

**(४०) * १८९१७ श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आचोळे (नालासोपारा) येथील अलकापुरी येथे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत नव्याने रेल्वे फ्लायओव्हर ब्रिज विकसित करण्याबाबतची मागणी लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे दिनांक ५ एप्रिल, २०२३ रोजीच्या लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने नालासोपारा, आचोळे येथील अलकापुरी येथे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत नव्याने रेल्वे फ्लायओव्हर ब्रिज विकसित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, तेथील सतत होणारी वाहतूक कोंडी व गर्दी कमी होण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात आली आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय खरे आहे.

(२), (३) व (४) सदर मागणीच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्याकरिता आयुक्त, वसई विरार महानगरपालिका यांच्याकडून महासभेचा ठराव, जागा उपलब्धतेचा दाखला, अंदाजित ढोबळ किंमत व

पूलाची लांबी, रुंदी व इतर दाखल्यासह सविस्तर प्रस्ताव प्राधिकरणास सादर करण्याबाबत आयुक्त, वसई विरार महानगरपालिका यांना दिनांक ०१/०६/२०२३ रोजी पत्राद्वारे प्राधिकरणामार्फत कळविण्यात आले आहे. प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्याचे प्रस्तावित आहे.

-----------------

## अकोला महानगरपालिकेच्या दक्षिण विभागातील नाल्यांची साफसफाई करणेबाबत

**(४१)** * **१८९५८ श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला महानगरपालिकेच्या दक्षिण विभागातील गायत्री नगर, उदय कॉलनी परिसरातील नागरिकाने स्वतःच्या घर बांधकामासाठी एक ट्रक काळी माती सर्विस गल्लीतील नाल्यात टाकली असून, मान्सूनपूर्व नालेसफाईकडे अकोला महानगरपालिका प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घराच्या जवळून आरोग्य कॉलनी भागात फार मोठा नाला वाहत असून सदर नाल्याची वर्षानुवर्षे सफाई होत नसल्यामुळे सर्विस गल्लीसह नाल्यावर अतिक्रमण झाल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अकोला महानगरपालिकेच्या दक्षिण विभागातील नाल्यांच्या स्वच्छतेबाबत महानगरपालिका प्रशासन, स्वच्छता विभाग आणि आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांकडून दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अकोला महानगरपालिकेंतर्गत सर्व विभागांतील नाल्यांच्या स्वच्छतेबाबत दुर्लक्ष करणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) अंशत: खरे आहे.

सदर बाब निदर्शनास आल्यानंतर उदय कॉलनीतील संबंधित नागरिक श्री.जयंत तांदुळकर यांना स्वच्छता निरीक्षक यांचेमार्फत दिनांक २९/०५/२०२३ रोजी मौखिक सुचना देण्यात आल्या असून नाल्याची साफसफाई करण्यात आली आहे. तसेच दरवर्षीप्रमाणे मान्सुनपूर्व नाल्यांची साफसफाई करण्यात आली आहे.

(२) अंशत: खरे आहे.

आरोग्य कॉलनी भागात असलेल्या नाल्याची दरवर्षीप्रमाणे मान्सुनपूर्व साफसफाई करण्यात आली आहे. नाल्याच्या सांडपाण्याच्या प्रवाहाला कुठलाही अडथळा नाही. नाल्याच्या कडेवर तेथील रहिवाशी यांनी आवारभिंतीचे व काही प्रमाणात पक्क्या स्वरुपाचे बांधकाम केले असल्याने आढळून आले आहे. संबंधित बांधकाम धारकांस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २३०, २३१ अन्वये सदर बांधकाम काढून घेण्याबाबत दिनांक ०४/०७/२०२३ अन्वये सूचना देण्यात आली आहे. तसेच क्षेत्रिय दक्षिण कार्यालय यांचेमार्फत अतिक्रमण निष्कासनाची कार्यवाही सुरू आहे.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर महानगरपालिकेस जी-२० कार्यक्रमांतर्गत सजावटीसाठी मिळालेल्या अनुदानाच्या रक्कमेबाबत

**(४२) * १९०७३ श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर महानगरपालिकेने जी-२० कार्यक्रमांतर्गत नागपूर विमानतळ ते टी-पॉइंट दरम्यान रस्त्यांवर, फ्लायओव्हरखाली सिव्हील लाईन भागात व्हीआयपी रोडवर आणि इतर महत्वाच्या ठिकाणी सजावटीकरीता केंद्र शासनाकडून व जी-२० कार्यक्रमांतर्गत मिळालेल्या अनुदानाची रक्कम वापरण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जी-२० कार्यक्रमादरम्यान सजावट करण्यासाठी कंत्राटदारांच्या माध्यमातून नागपूर शहरामध्ये एकूण किती वृक्ष लागवड करण्यात येऊन सदर लागवडीस एकूण किती खर्च करण्यात आला तसेच जी-२० चा कार्यक्रम संपल्यानंतर या सर्व वृक्षांची विल्हेवाट लावण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने जी-२० परिषदेकरीता नागपूर महानगरपालिकेने केलेल्या वृक्ष लागवडीची विल्हेवाट लावण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही, जी-२० कार्यक्रमांतर्गत सौंदर्यीकरणाच्या कामासाठी राज्य शासनाने नागपूर मनपास निधी उपलब्ध करुन दिला आहे.

(२) जी-२० कार्यक्रमाअंतर्गत नागपूर शहरात सजावटी करीता कंत्राटदाराच्या माध्यमातून निविदा प्रक्रिया राबवून १४३७ इतक्या वृक्षांची स्थायी लागवड करण्यात आली व याकरिता रुपये ३६.४० लक्ष इतका खर्च झालेला आहे.

तसेच लावण्यात आलेले वृक्ष हे स्थायी स्वरुपात लावण्यात आल्याने जी-२० चा कार्यक्रम संपल्यानंतर या सर्व वृक्षांची विल्हेवाट लावण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही.

(३) व (४) प्रश्नच उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील स्वमग्न (ऑटिझम) मुलांच्या उपचारासाठी थेरपी केंद्र व शिक्षणासाठी विशेष शाळा राज्यात नसल्याबाबत

**(४३) * २००४९ श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दिव्यांगाच्या यादीत समावेश झालेल्या “स्वमग्नता” (ऑटिझम)असलेल्या मुलांची संख्या हजारोंच्या पटीत असून, या “स्वमग्न” (ऑटिझम) मुलांच्या उपचारासाठी मुंबईखेरीज राज्यात अन्यत्र कुठेही शासकीय थेरपी सेंटर नसल्याचे व कोरोना काळानंतर त्यावर उपचार करणाऱ्या स्वंयसेवी संस्थाही बंद झाल्याचे तसेंच या मुलांच्या शिक्षणासाठी राज्यात एकही सरकारी विशेष शाळा नसल्याचे दिनांक १ एप्रिल,२०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या "स्वमग्न" मुलांमधील बौध्दिकगती व कौशल्याचा विकास होण्यासाठी त्याचे उपचारासाठी शासकीय थेरपी सेंटर्स,शिक्षणासाठी विशेष शाळा, "स्वमग्न" तसेंच इतर दिव्यांग प्रकारासाठी प्रशिक्षक तयार करुन अभ्यासक्रम तयार करण्याची व या मुलांच्या स्वमग्नतेचे प्रमाणपत्र देताना शासकीय पातळीवर आरोग्य, मानसिक आणि शैक्षणिक पातळीवर सर्वसमावेक्षक समिती तयार करण्यात यावी, अशा स्वरुपाच्या मागण्या त्यांचे पालकांनी शासनाकडे केल्या असल्याचेही दिनांक १ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने त्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली आहे अथवा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

तथापि, बौध्दिक अक्षम मुलांसाठी २९७ विशेष शाळा असून १४,५४० इतके प्रवेशित शिक्षण व प्रशिक्षण घेत आहेत. तसेच सदर प्रवेशितांना थेरपी सुविधा पुरविल्या जातात.
(२) हे खरे नाही.
(३) लागू नाही.
(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## राज्यातील दिव्यांगांच्या विशेष शाळा कार्यशाळेतील कर्मचाऱ्यांच्या वेतनाबाबत

**(४४)** * **१९३३२ श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दिव्यांगांच्या विशेष शाळा/कार्यशाळेतील कर्मचाऱ्यांचे वेतन लेखाशीर्ष समाजसेवार्थ प्रणालीऐवजी सेवार्थ प्रणालीद्वारे ई.सी.एस. पध्दतीने किंवा वर्षभराच्या वेतन निधीसाठी बांधील खर्चाची एकरकमी तरतूद करण्यासाठी आणि सातव्या वेतन आयोगाच्या माहे जानेवारी २०१९ ते डिसेंबर २०२१ पर्यंतच्या फरकाच्या रकमेसाठी निधी उपलब्ध करण्यात आलेला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील दिव्यांगाच्या विशेष शाळा/कार्यशाळेतील कर्मचाऱ्यांना देय असलेल्या सातव्या वेतन आयोगाच्या पाच हप्त्यापैकी उर्वरित चार हप्ते प्रदान होण्यासाठी निधी व आदेश निर्गमित करण्याबाबत तसेच अन्य मागण्या शिक्षक भारतीने केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी विशेष शाळा/कार्यशाळेतील कर्मचाऱ्यांचे वेतन लेखाशीर्ष समाजसेवार्थ प्रणाली ऐवजी सेवार्थ प्रणालीद्वारे ई.सी.एस. पध्दतीने किंवा वर्षभराच्या वेतन निधीसाठी बांधील खर्चाची एकरकमी तरतूद करणेबाबत तसेच राज्यातील दिव्यांग शाळांना सातव्या वेतन आयोगाचे उर्वरीत हप्ते अदा करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) अंशत: खरे आहे.

राज्य शासकीय कर्मचाऱ्यांचे वेतन हे सेवार्थ प्रणालीद्वारे अदा करण्यात येते. अशासकीय दिव्यांगांच्या अशासकीय अनुदानित विशेष शाळा / कार्यशाळा मतिमंद बालगृह यामधील मान्यता प्राप्त कर्मचाऱ्यांचे वेतन शासनाने लागू केलेल्या समाज सेवार्थ प्रणालीद्वारे ऑनलाईन पध्दतीने संबंधित

कर्मचाऱ्यांच्या बँक खात्यामध्ये अदा करण्यात येते. शाळा/कर्मशाळेतील कर्मचाऱ्यांना रुपये ८०.८० कोटी इतकी रक्कम सातव्या वेतन आयोगाच्या फरकासाठी अदा करण्यात आली आहे. उर्वरित रकमा अदा करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(२) हे खरे आहे.
(३) शासनाने अनुदानित दिव्यांगांच्या शाळा /कर्मशाळांकरीता वेतन वितरणाकरिता समाज सेवार्थ प्रणाली लागू केली आहे. राज्यातील दिव्यांग शाळा / कर्मशाळांना सतवा वेतन आयोगाच्या फरकाची रक्कम अदा करण्याची कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## हज यात्रेसाठी आकारण्यात येणाऱ्या वाढीव अतिरिक्त शुल्कात सवलत देण्याबाबत

**(४५) * १९६४० श्री.सत्यजीत तांबे, श्री.अनिकेत तटकरे :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्यातून हज यात्रेसाठी जाणाऱ्या यात्रेकरुंकडून रुपये ६३ हजारांचे अतिरिक्त शुल्क आकारण्यात येत असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, हज यात्रेसाठी मुंबईमधून गेलेल्या यात्रेकरुंना वेगळा व नागपूरमधून जाण्याचा पर्याय निवडलेल्या यात्रेकरुना रुपये ६३ हजार अतिरिक्त रक्कम द्यावी लागत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वाढीव अतिरिक्त शुल्कात सवलत देण्याची मागणी हज यात्रेकरू व मा.लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने हज यात्रेसाठी आकारण्यात येणाऱ्या वाढीव अतिरिक्त शुल्कात सवलत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अब्दुल सत्तार :** (१), (२) व (३) सर्वच हज यात्रेकरुंकडून अतिरिक्त शुल्क आकारण्यात आल्याची बाब खरी नाही.
(४) हज यात्रेसाठी इंबारकेशन पॉईंट ठरविणे व सदर इंबारकेशन पॉईन्टसनुसार शुल्क आकारणे इ.बाबी केंद्रीय हज समितीमार्फत ठरविल्या जातात. त्याची अंमलबजावणी राज्य हज समितीमार्फत केली जाते. हज २०२३ करीता महाराष्ट्रातून हजयात्रेला जाणाऱ्या हज यात्रेकरुंसाठी केंद्रीय हज समितीकडून मुंबई, नागपूर व औरंगाबाद असे ३ इम्बारकेशन पॉइंट दिलेले होते. ऑनलाईज अर्ज सादर करतेवेळी इम्बारकेशन पॉइंट निवडणे आवश्यक होते. एकदा निवडलेला पर्याय तद्नंतर बदलण्याचा पर्याय उपलब्ध नव्हता. तदनंतर केंद्रीय हज समितीकडून मुंबई इम्बारकेशन पॉइंट वरुन यात्रा करणाऱ्या यात्रेकरुंकडून रुपये ३,०४,८४३/, नागपूर इम्बारकेशन पॉइंट वरुन यात्रा करणाऱ्या यात्रेकरुंकडून रुपये ३,६७,०४४/-व औरंगाबाद इम्बारकेशन पॉइंट वरुन यात्रा करणाऱ्या यात्रेकरुंकडून रुपये ३,९२,७३८/- असे शुल्क आकारण्यात आले होते. सदरचे आकारण्यात आलेले शुल्क हे मुंबई इम्बारकेशन पॉइंट पेक्षा नागपूर इम्बारकेशन पॉइंट करिता रुपये

६२,२०१/- तर औरंगाबाद इम्बारकेशन पॉइंट करीता रुपये ८७,८९५/- इतके अधिक होते. त्यामुळे अतिरिक्त शुल्क कमी करणे किंवा एम्बारकेशन पॉइंट बदलून देणे अशी मागणी हजयात्रेकरुंकडून तसेच लोकप्रतिनिधींकडून करण्यात येत होती. या विषयाच्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद व नागपूर खंडपीठ येथे याचिकाही दाखल करण्यात आल्या होत्या. सदर यांचिकांची मा.न्यायालयात सुनावणी होवून मा.न्यायालयाने इम्बारकेशन पॉइंट बदलून देण्याबाबत केंद्रीय हज समितीने निर्णय घ्यावा किंवा मुंबई इम्बारकेशन पॉइंटच्या तुलनेत औरंगाबाद इम्बारकेशन पॉइंटकरीता आकारलेले अतिरिक्त शुल्क परत करावे असे आदेश पारित करुन न्यायालयीन प्रकरणे निकाली काढली आहेत.

(५) लागू नाही.

-----------------

## हाजी अली (मुंबई) येथील खेळाच्या मैदानावर बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांकरिता क्लब हाऊस बांधणेबाबत

**(४६) * १८९४६ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरात खेळांची मैदाने कमी असताना नायर रुग्णालयात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी असलेली हाजी अली येथील मैदानाची जागा बृहन्मुंबई महानगरपालिकेतील अधिकाऱ्यांसाठी क्लब हाऊस बांधण्यासाठी प्रस्तावित करण्यात आल्याची बाब दिनांक ११ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हाजी अली येथील मैदानावर विद्यार्थ्यांचे सांस्कृतिक कार्यक्रम व विविध खेळांच्या स्पर्धांचे आयोजन करण्यात येते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे, चौकशीच्या अनुषंगाने नायर रुग्णालयात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची हाजी अली येथील मैदानाची जागा सुरक्षित ठेवण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हाजी अली, मुंबई येथील सी.एस.नं. ४७/६(भाग) हा एकूण २४,३७८.११ चौ.मी. क्षेत्रफळाचा भूखंड आहे. त्यापैकी ६६५६.४४ चौ.मी. क्षेत्रफळाच्या भूखंडावर वसतिगृह असून उर्वरित १९,६५१.०७ चौ.मी. भूखंडावर खेळाचे मैदान आहे. या १९,६५१.०७ चौ.मी. खेळाच्या मैदानापैकी ११,४७२.८५ चौ.मी. क्षेत्रफळाचा भूखंड विभाजित करुन, महानगरपालिका ठराव क्रमांक ३९३ दिनांक ३१/०७/२०१७ अन्वये क्लब व जिमखानाकरिता आरक्षित करण्यात आला.

शासनाच्या दिनांक १७/०९/२०१९ च्या अधिसूचनेन्वये सदर ११,४७२.८५ चौ.मी. क्षेत्रफळाच्या भूखंडावरील मैदानाचे नामनिर्देशन बदलून क्लब व जिमखाना असे आरक्षण करण्यात आले.

त्यानुसार क्लब व जिमखाना याकरीताचे आराखडे तयार करण्यात आले असून त्यास दिनांक ११/०६/२०२१ रोजी सागरी किनारा नियंत्रण प्राधिकरण (सी.आर.झेड.) ची मान्यता प्राप्त झाली आहे.

सद्य:स्थितीत सदर प्रस्ताव महानगरपालिका स्तरावर सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेकरीता प्रगतीपथावर आहे.

(२) हे खरे आहे.
(३) राष्ट्रीय वैद्यकीय आयोग (एन.एम.सी) यांच्या निकषानुसार वैद्यकिय विद्यार्थ्यांकरिता खेळाचे मैदान असणे आवश्यक आहे. तथापि, सदर निकषांमध्ये मैदानाच्या क्षेत्रफळाचा उल्लेख नाही.

सद्य:स्थितीत, बा.य.ल.नायर रुग्णालयामध्ये शिकणाऱ्या वैद्यकीय विद्यार्थ्यांकरिता हाजी अली येथे ८१७८.०० चौ.मी. क्षेत्रफळाचे खेळाचे मैदान उपलब्ध आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या स्व.माँसाहेब मीनाताई ठाकरे प्रसुतीगृहांमध्ये वैद्यकीय सुविधांचा अभाव असल्याबाबत

**(४७) * १९१२२ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या चुनाभट्टी व कुर्ला परिसरातील स्व.माँसाहेब मीनाताई ठाकरे प्रसुतीगृहामध्ये वैद्यकीय सुविधांचा अभाव असल्याची बाब माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चुनाभट्टी व कुर्ला परिसरातील नागरिकांना उपचार व प्रसुतीकरीता सायन, राजवाडी व कुर्ला पश्चिम येथील भाभा रुग्णालयात जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर प्रसुतीगृहांस आवश्यक सोई-सुविधा व वैद्यकीय सेवा पुरविण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या चुनाभट्टी व कुर्ला परिसरातील स्व.माँसाहेब मीनाताई ठाकरे प्रसुतीगृहामध्ये स्त्रीरोग तज्ञ, बालरोग तज्ञ उपलब्ध आहेत. सदर प्रसुतीगृहामध्ये गरोदर स्त्रियांची तपासणी, सोनोग्राफी, रक्त तपासणी व लैंगिक संसर्गजन्य आजारांची तपासणी केली जाते. तसेच गरोदर मातांना लागणारे औषधोपचार, लोहयुक्त व कॅल्शियमच्या गोळ्या देण्यात येतात, त्यांचे संपूर्ण लसिकरण केले जाते. प्रसुतीगृहामध्ये प्रधानमंत्री मातृत्व वंदना योजना, जननी सुरक्षा योजना यासाठी गरोदर मातांची नोंदणी केली जात असून सदर योजनेचा लाभ दिला जातो. तसेच कुटुंब नियोजन पध्दतींचा लाभ दिला जातो.
(२) प्रसुतीगृहामध्ये येणाऱ्या अतिजोखमीच्या गरोदर मातांना तसेच प्रसुतीगृहामधील गुंतागुंतीच्या गरोदर मातांना आवश्यकतेनुसार पुढील उपचारांकरिता महानगरपालिकेच्या रुग्णालयामध्ये संदर्भित करण्यात येते.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सांगली, मिरज आणि कुपवाड महानगरपालिका अंतर्गत सांगली क्षेत्रातील गुंठेवारी नियमित करण्याबाबत

**(४८) * १९५९४ श्रीमती उमा खापरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रामदास आंबटकर, श्री.निलय नाईक, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली, मिरज आणि कुपवाड महानगरपालिका अंतर्गत सांगली क्षेत्रातील गुंठेवारी नियमित करण्याचा प्रश्न मागील अनेक वर्षांपासून प्रलंबित असल्याने गुंठेवारी क्षेत्रातील नागरिकांना अनेक समस्या येत असल्याची बाब माहे एप्रिल,२०२३ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सांगली-मिरज आणि कुपवाड महानगरपालिकेमध्ये सन १९८५ ला शेत जमिनीचे तुकडे पध्दतीने म्हणजेच गुंठेवारी पध्दतीने प्लॉट पाडून विक्री करून ७० टक्के वसाहती उभारल्या गेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या वसाहतींना आणि पूर पट्ट्यातील घरांना कायम करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) महाराष्ट्र गुंठेवारी विकास अधिनियम, २००१ मधील कलम-३ च्या पोटकलम-३ च्या परंतुकान्वये प्रशमन शुल्क व विकास शुल्कामध्ये भरीव वाढ केल्यामुळे सुधारित शासन अधिनियमाच्या पुर्वीच्या दराप्रमाणे प्रशमन शुल्क व विकास शुल्क भरुन घेणेबाबत नागरीकांचा आग्रह असल्यामुळे गुंठेवारी नियमितीकरण प्रक्रियेमध्ये अडचणी निर्माण होत आहे, ही वस्तूस्थिती आहे.

(२) महानगरपालिका क्षेत्रामध्ये सुमारे ५०% पर्यंत गुंठेवारी वसाहती निर्माण झालेल्या आहेत, ही वस्तूस्थिती आहे.

(३) शासनाने एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०२० लागू केलेली असून त्यानुसार लाल रेषेमधील (Red line) गुंठेवारी वसाहतीचे काही विशेष अटींसह नियमितीकरण करता येऊ शकेल. तथापि, नदीकाठ व निळी रेषा (Blue line) या प्रतिबंधीत क्षेत्रातील गुंठेवारी वसाहतीचे नियमितीकरण करता येत नाही. गुंठेवारी अधिनियमातील तरतूदीनुसार गुंठेवारी नियमितीकरणाची कार्यवाही महानगरपालिकेकडून करण्यात येत असून बहुतांश प्रस्तावधारक हे निर्धारीत केलेले शुल्क भरुन नियमितीकरणाचा लाभ घेत आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्य मार्ग परिवहन महामंडळामार्फत सोलापूर विभागास ई-बस मिळणेबाबत

**(४९) * १९८५२ श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने राज्य मार्ग परिवहन महामंडळामार्फत राज्यातील सर्व विभागांमध्ये ई-बस पुरवण्याचे धोरण अवलंबिले असून राज्य मार्ग परिवहन महामंडळाने चालू आर्थिक वर्षात ५१५० इलेक्ट्रीक बस देण्याचा

निर्णय घेतला असता सोलापूर विभागाने ५० इलेक्ट्रीक बसचा मागणी प्रस्ताव शासनाकडे पाठवला असून सदर प्रस्ताव प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सोलापूर विभागासाठी ई-बस देण्याबाबत तसेच ई-बस सोलापूर जिल्ह्यातून कोणत्या मार्गाने धावणार आहे, त्यासाठी चार्जींग स्टेशन निर्मिती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) नाही.
(२) व (३) रा.प.महामंडळात ५१५० इलेक्ट्रीक बसेस जीसीसी मॉडेल अंतर्गत भाडेतत्वावर घेणेकरीता निविदा प्रक्रिया सुरु आहे.
सोलापूर विभागांमार्फत इलेक्ट्रीक बसेस करीता एकूण ७५ नियते प्रस्तावित करण्यात आली आहेत.
सोलापूर विभागात ई-बसेससाठी सोलापूर, मंगळवेढा व पंढरपूर या ठिकाणी चार्जिंग स्टेशन उभारणे प्रस्तावित करण्यात आले आहे.

-----------------

## नवी मुंबई येथील उरण परिसरातील विशेष आर्थिक क्षेत्रामध्ये (सेझ) अल्ट्रा मॉडर्न आयटी हब प्रकल्प उभारण्याबाबत

**(५०)** * **१९६९१ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवी मुंबई येथील उरण परिसरातील विशेष आर्थिक क्षेत्रामध्ये (सेझ) अल्ट्रा मॉडर्न आयटी हब प्रकल्प उभारण्यात येणार असून या प्रकल्पामुळे पावसाचे पाणी शोषून घेण्यासाठी जमीन शिल्लक न राहिल्याने पुराचे पाणी शहरात घुसून मोठे नुकसान होण्याची शक्यता आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नवी मुंबई सेझच्या भूखंडाचा ८५% व्यावसायिक आणि १५% रहिवासी उद्देशासाठी वापर करण्यात येणार असल्याने शेकडो हेक्टर पाणथळ क्षेत्र आणि हजारो खारफुटींवर माती दगडाचा भराव घालण्यात येणार असल्याने तसेच बांधकामांमुळे अंतर भरतीच्या मुक्त प्रवाहात अडथळा निर्माण झाला असून द्रोणागिरी रोडच्या निर्मितीसाठी जमिनीच्या पातळया वाढविल्या गेल्यामुळे मोठ्या प्रमाणात पर्यावरणाची हानी होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आयटी हब प्रकल्प उभा राहिला तर पाणी शोषून घेण्यासाठी उरण परिसरात जमीनच शिल्लक राहणार नाही त्यामुळे उरण क्षेत्राला पुराचा तडाखा बसण्याची भीती पर्यावरणवाद्यांकडून व्यक्त केली जात असून तत्संदर्भातील तक्रारीनंतर तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी पर्यावरण आणि हवामान बदल विभागाचे प्रमुख सचिव आणि वन विभागाचे सचिव यांना या प्रकरणाची चौकशी करून कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उरण तालुक्यात खाड्या, नाले, आगरे आणि शेती बुजवून होत असलेल्या मातीच्या भरावांमुळे भूजल पातळीवर परिणाम होणार असून उरण तालुक्याला पुराचा धोका निर्माण होण्याची शक्यता असल्याचे मत कनेक्ट या निसर्गप्रेमी संस्थेने व्यक्त केले असून यासंदर्भात मा.मुख्यमंत्री महोदयांकडे तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने आयटी हब प्रकल्पास पर्यायी व्यवस्था उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२) व (३) नवी मुंबई येथील विशेष आर्थिक क्षेत्राकरीता (SEZ) द्रोणागिरी, कळंबोली व उलवे येथील एकूण १८४२ हेक्टर जमीन निर्देशित करण्यात आली आहे. तथापि, शासनाच्या दिनांक १६/०३/२०१८ रोजीच्या अधिसूचनेनुसार विशेष आर्थिक क्षेत्र (SEZ) हे एकात्मिक औद्योगिक क्षेत्र (IIA) विकसित करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. यामध्ये विविध उद्योग प्रस्तावित आहेत.

तथापि, सिडकोतर्फे नवी मुंबई प्रकल्प विकसित करण्यात येत असून उरण परिसर हा द्रोणागिरी नोडचा भाग आहे. सदर क्षेत्र सखल असून खाडीलगत आहे. पावसाळ्यात भरतीच्या वेळी पावसाचे पाणी साचत असल्याकारणाने द्रोणागिरी नोडचा विकास करतांना आयआयटी मुंबई संस्थेने सुचविल्यानुसार डच पध्दतीचा अवलंब करून द्रोणागिरी नोडमध्ये ६ होल्डिंग पॉन्डस बांधण्यात आले आहेत. समुद्राच्या भरतीच्या वेळी सदर होल्डिंग पॉन्डसमध्ये पावसाचे पाणी साठविण्यात येते व ओहोटीच्या वेळी पाईप आउटलेटद्वारे समुद्रात पाण्याचा निचरा करण्यात येतो.

सदर होल्डिंग पॉँन्डमध्ये काही प्रमाणात कांदळवनची वाढ झाल्याने व त्यांची धारण क्षमता कमी झाली आहे. तथापि, मा.न्यायालयाचे कांदळवन बाबतचे निर्बंध विचारात घेऊन होल्डिंग पॉँन्डमधील कांदळवन व गाळ काढण्यासाठी सिडकोमार्फत कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) यासंदर्भात निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.
(५) व (६)प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कळंबोली (नवी मुंबई) येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर उद्यानामधील विरंगुळा केंद्र नादुरुस्त असल्याबाबत

**(५१) * १९८७७ श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रामदास आंबटकर, श्रीमती उमा खापरे, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, प्रा.राम शिंदे, श्री.निलय नाईक, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कळंबोली (नवी मुंबई) येथील सेक्टर-२ व सेक्टर-१० मधील डॉ.बाबासाहेब आंबेडकर उद्यानामधील विरंगुळा केंद्राचे काम अर्धवट झाले असून वापरण्यायोग्य नसल्याने सदर विरंगुळा केंद्राचे नागरिकांच्या उपयोगात येत नसल्याची बाब माहे एप्रिल,२०२३ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर विरंगुळा केंद्र ज्येष्ठ नागरिक संघ कळंबोली यांना हस्तांतरित करण्याची मागणी जेष्ठ नागरिक संघाने पनवेल महानगरपालिकेकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) कळंबोली, सेक्टर-१० येथील भूखंड क्र. १७ मधील डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानामधील विरंगुळा केंद्राचे तसेच कळंबोली, सेक्टर-२ई येथील भूखंड क्र.१० मधील विरंगुळा केंद्राचे बांधकाम सन २०१६ मध्ये पूर्ण करण्यात आलेले आहे. सदर विरंगुळा केंद्रे सुस्थितीत असून त्यामध्ये लाईट, पंखा, टेबल, खुर्च्या उपलब्ध असून अंतर्गत स्वच्छतागृहाची व्यवस्था करण्यात आलेली आहे. तसेच, विरंगुळा केंद्रामध्ये पायऱ्या व रॅम्प दोन्ही पर्याय उपलब्ध आहेत.

सिडको संचालक मंडळाच्या ठराव क्र.११७७५, दिनांक १२/०१/२०१७ अन्वये सिडको महामंडळाकडील सेवा सुविधा पनवेल महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार वरील दोन्ही भूखंडांवरील उद्याने पनवेल महानगरपालिकेस हस्तांतरीत करण्यात आलेली आहेत. तथापि, वरील दोन्ही उद्यान्यांमधील विरंगुळा केंद्रांची आवश्यकतेनुसार दुरुस्ती करुन सुस्थितीत पनवेल महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करण्याची कार्यवाही सिडकोच्या स्तरावर सुरु आहे.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## उस्मानाबाद येथील शहर पोलीस स्टेशन ते बोंबले हनुमान चौक येथे फळ विक्रेते व भाजीविक्रेते यांनी अतिक्रमण केल्याबाबत

**(५२) * १९४४२ श्री.सुरेश धस :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद शहर पोलीस स्टेशन ते बोंबले हनुमान चौक या परिसरामध्ये शैक्षणिक शाळा, महाविद्यालय व ट्युशन कोचिंग क्लासेसची संख्याही मोठी असल्याने या रस्त्यावरून मोठ्या प्रमाणामध्ये विद्यार्थी-विद्यार्थिनी ये-जा करत असतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या परिसरातील जिजाऊ चौकात फळ गाडीवाले व भाजीवाले हे मुख्य चौकातील रस्त्यावर बसल्यामुळे तेथे वाहनांची वर्दळ ही वाढत असल्यामुळे ट्रॅफिक जाम होते व त्यामुळे शाळेत येणाऱ्या मुला-मुलींना नाहक त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नगरपरिषदेकडे वारंवार सदरील अतिक्रमण काढण्यासाठी मागणी करूनही व नगरपालिकेने सदरील फळ विक्रेते व भाजीविक्रेते यांना D.I.E.T. कॉलेज जवळ जागा दिलेली असतानाही तेथे न बसता चौकातच बसत असल्याने शिवाय तेथे वाहनतळ नसतानाही माल वाहतूकगाड्या उभ्या राहत असल्याने रहदारीस मोठ्या प्रमाणावर अडथळा निर्माण होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या भागातील बार्शी नाक्यावरील आउट पोस्ट पोलीस चौकी बंद करण्यात आलेली आहे हे खरे आहे काय,

(५) असल्यास, सदरील भागामध्ये शाळा, महाविद्यालय, कोचिंग क्लासेस असल्याने मुलींच्या छेडछाडीसारखे गंभीर प्रकार होवू नयेत म्हणुन तातडीने सीसीटीव्ही कॅमेरे बसवून बार्शी नाक्यावरील आउट पोस्ट पोलीस चौकी पूर्ववत कार्यान्वित करुन विद्यार्थी व विद्यार्थीनींना तात्काळ संरक्षण देण्यासाठी तेथील फळविक्रेते व भाजीवाले ह्यांचे अतिक्रमण तात्काळ काढून टाकण्यासाठी शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

(२) अंशतः खरे आहे,

सदर प्रकरणी नगरपरिषदेस प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने, दिनांक २६ मे, २०२३ ते २९ मे, २०२३ या कालावधीत अतिक्रमण निष्कासनाची मोहीम राबविण्यात आली.

(३) हे खरे नाही,

सदरील फेरीवाल्यांना नगरपरिषदेमार्फत D.I.E.T. कॉलेज जवळील जागा देण्यात आली नाही.

सद्य:स्थितीत सदर जागेवरील अतिक्रमणे काढण्यात आली असल्याने, रहदारीस कोणत्याही प्रकारचा अडथळा निर्माण होत नाही.

(४) हे खरे नाही,

पोलीस ठाणे, उस्मानाबाद शहर यांच्या अहवालानुसार, बार्शी नाका येथे आऊट पोस्ट/ पोलीस चौकी अस्तित्वात असल्याचे दिसून येत नाही.

(५) सदर भागात छेडछाडीच्या घटना घडू नये म्हणून बिट मार्शलची नेमणूक करण्यात आली आहे. तसेच गृह विभागाच्या दिनांक २४/०२/२०२२ रोजीच्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने, सुरक्षा उपाय म्हणून सार्वजनिक ठिकाणी सी.सी.टी.व्ही. (Close Circuit Television) संनिरीक्षण (Surveillance) यंत्रणा बसविण्याबाबत पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद यांच्यामार्फत कार्यवाही सुरु आहे.

शहरामध्ये अतिक्रमण निदर्शनास आल्यास ते काढून टाकण्याबाबतची कार्यवाही नगरपरिषदेमार्फत वेळोवेळी करण्यात येते.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत करण्यात येणाऱ्या रस्त्यांच्या कामांची चौकशी करण्याबाबत

**(५३) * १९९५१ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत ४०० कि.मी. रस्त्यांची कामे ही स्पर्धात्मक बोली किंमतीद्वारे देताना अधिकाऱ्यांनी आपल्या अधिकाराचा दुरुपयोग करुन बोली प्रक्रियेमध्ये असलेल्या नियमांचे पालन न करता ५ कंत्राटदारांना काम देण्यात आल्याने त्यांची चौकशी करण्याची मागणी मा.लोकप्रतिनिधींनी माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई वाहतूक पोलीस व इतर विभाग यांच्या कडून ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त झाली नसतानाही प्रस्तावित कामासाठी १० टक्के आगाऊ रक्कम कंत्राटदारांना देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रस्त्यांच्या कामाबाबत मा.लोकप्रतिनिधींनी व नागरिकांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने महानगरपालिकेकडून कंत्राटदारांना दंड आकारण्यात आला आहे परंतु बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कोणतीही कारवाई करण्यात आली नाही आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत ४०० कि.मी. रस्त्यांची कामे देताना नियमांचे पालन न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर व

कंत्राटदारांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.
(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कोणत्याही कंत्राटदाराला प्रस्तावित कामासाठी १० टक्के आगाऊ रक्कम देण्यात आलेली नाही.
(३) व (४) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत ३९७ कि.मी. लांबीच्या रस्त्यांचे काँक्रिटीकरण करण्याच्या कामाच्या ई-निविदा ३ लिफाफा पध्दतीने बोलीद्वारे नियमानुसार पूर्ण करण्यात आली आहे. सदर रस्त्यांची काम देताना कोणत्याही नियमांचे उल्लंघन झाले नसल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.
निविदेतील अटी व शर्तींचे पालन न करणाऱ्या कंत्राटदरांवर निविदेतील तरतूदीनुसार महानगरपालिकेमार्फत दंडात्मक कारवाई करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मराठवाड्यातील समृध्दी महामार्ग जलदगतीने पूर्ण करणेबाबत

**(५४) * १९०४१ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमोल मिटकरी : तारांकित प्रश्न क्रमांक १७१८५ ला दिनांक १ मार्च, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जालना ते नांदेड दरम्यान समृध्दी महामार्ग निर्माण करण्याबाबत संबंधित विभागाचे उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी यांच्यामार्फत निवाडा घोषित करण्याच्या अनुषंगाने जमीन व निगडीत घटकाच्या मुल्यांकनाचे काम माहे एप्रिल, २०२३ पर्यंत पूर्ण करण्यात आले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जमिनीच्या भूसंपदानासाठी भूधारकांना अद्यापर्यंत प्रत्यक्षात मोबदला वितरीत करणत आलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुल्यांकनाचे काम व जमीन भूसंपादनाचा मोबदला जलदगतीने वितरीत होण्यासाठी प्रधान सचिव, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांच्या स्तरावरून जिल्हानिहाय कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अपुषंगाने जालना ते नांदेड दरम्यान समृध्दी महामार्गासंदर्भातील मूल्यांकन व भूसंपादनाचा मोबदला विहित वेळेत वितरीत न केलेल्या संबंधितांवर तसेच संथगतीने धोरण राबविणाऱ्या संबंधित अधिकारी व इतर यंत्रणा यांच्या विरूध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) अंशतः खरे आहे

सदर प्रकल्पासाठी विविध गट क्रमांकामधील जमीन क्षेत्र संपादित करण्यात येत आहे. सदर गट क्रमांकामधील जमीन क्षेत्रमध्ये समाविष्ट जमीन व जमिनितर घटकांचे तांत्रिक व कायदेशीर तरतुदींप्रमाणे जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील "जिल्हास्तरीय मूल्यांकन समितीमार्फत" मुल्यांकन निश्चित

करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

(२) होय, हे खरे आहे.

सदर प्रकल्पासाठी महाराष्ट्र महामार्ग अधिनियम, १९५५ मधील तरतुदीनुसार भुसंपादन प्रक्रिया पार पाडण्यात येत आहे. जमिनीतर सर्व बाबींचे मूल्यांकन प्राप्त झाल्यानंतर संबंधित जिल्ह्याच्या भूसंपादन अधिकाऱ्यांमार्फत निवाडे घोषित करून संबंधित भूधाराकास तात्काळ मोबदला वितरीत करण्यात येईल.

(३) मूल्यांकन प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करण्याच्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ स्तरावर सर्व संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी व भूसंपादन अधिकाऱ्यांसमवेत वेळोवेळी आढावा बैठका आयोजित कण्यात येतात तसेच क्षेत्रिय स्तरावर महामंडळाच्या क्षेत्रिय अधिकाऱ्यांमार्फत मूल्यांकन व इतर अनुषंगिक बाबींबाबत वेळोवेळी पाठपुरावा करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्य मार्ग परिवहन महामंडळास कर्मचाऱ्यांचे प्रलंबित वेतनासह निधी अदा करण्याबाबत

**(५५) * १९१६३ श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य मार्ग परिवहन महामंडळातील कर्मचाऱ्यांना दर महिन्यांच्या ७ ते १० तारखेदरम्यान वेतन देण्याची जबाबदारी राज्यशासनाची असताना व एसटी कर्मचाऱ्यांच्या संप काळात राज्य सरकारच्या वतीने न्यायालयात वेळेत वेतन देण्याचे मान्य केले असताना देखील राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे ९० हजार कर्मचारी अद्याप विनावेतन कार्यरत असल्याचे माहे एप्रिल, २०२३ च्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य शासनाकडून वेतनासह सवलतीचे मूल्य वेळेत न मिळाल्याने राज्य मार्ग परिवहन महामंडळ आर्थिक संकटात सापडले आहे, हे ही खरे आहे काय,

(३)असल्यास, शासनाने निधीची तरतूद करुन वेतन व सवलत मूल्य राज्य मार्ग परिवहन महामंडळाला तातडीने देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) नाही.

(३) व (४) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातील कर्मचाऱ्यांच्या वेतनासह सवलतमुल्य राज्य परिवहन महामंडळास दरमहा नियमीत वितरीत करण्यात येते.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या काही रुग्णालयांमधील अग्निशमन यंत्रणा कार्यान्वित नसल्याबाबत

**(५६) * १९५५० डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.आमश्या पाडवी, श्री.सुनिल शिंदे, श्री.राजहंस सिंह : तारांकित प्रश्न क्रमांक १४०५१ ला दिनांक १७ ऑगस्ट, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयात आग विझविणारी पुरेशी यंत्रेच नसल्याचे तर काही रुग्णालयात उपलब्ध असलेली अग्निशमन यंत्रे कालबाहय झाल्याचे निदर्शनास आले असून अग्निशमन यंत्रणा नसल्यामुळे आगीची एखादी घटना घडल्यास रुग्णांसह डॉक्टर, कर्मचाऱ्यांचा जीव धोक्यात येण्याची शक्यता आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, काही रुग्णालयांत आग विझविणारी यंत्रेच पुरेशी नाहीत तर काही रुग्णालयांत उपलब्ध असलेली अग्निशमन यंत्रे कालबाह्य झाली आहेत त्यामुळे आगीची एखादी घटना घडल्यास रुग्णांसह डॉक्टर कर्मचाऱ्यांचा जीव धोक्यात येण्याची शक्यता इ. त्रुटी नुकतेच बृहन्मुंबई अग्निशमन दलाकडून महानगरपालिकेच्या नायर, के.ई.एम, जे.जे.सायन व इतर पालिका रुग्णालयात केलेल्या फायर ऑडिटच्या अहवालात आढळून येणे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बृहन्मुंबई अग्निशमन दलाकडून पालिकेच्या नायर, के.ई.एम, जे.जे.सायन व इतर पालिका रुग्णालयात केलेल्या फायर ऑडिटच्या अहवालातील सदर त्रुटी निवारण्यासाठी काय कार्यवाही करण्यात येत आहे वा आली आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी दोषी आढळून आलेल्या रुग्णालयांविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) सदर रुग्णालयात उपलब्ध असलेली अग्निशमन यंत्रे कालबाह्य झाली असून, मुंबई अग्निशमन दलामार्फत सदर रुग्णालयातील आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना यांची तपासणी केली असता काही रुग्णालयांत त्रुटी आढळून आल्या आहेत हे खरे आहे.

(३) व (४) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्रसुतीगृहे, रुग्णालयांमध्ये रुग्णांच्या सुरक्षेच्या दृष्टीने रुग्णालयात अग्निशमन यंत्रणा बसविण्याच्या कामासाठी आवश्यक असणारा निधी उपलब्ध असून, आवश्यकतेनुसार योग्य ती तरतूद करण्यात येते. त्याचप्रमाणे सदर रुग्णालयांत अधिकारी / कर्मचारी / कामगार यांना अग्निशमन यंत्रणा वापरण्याबाबत चक्रांकित पध्दतीने वेळोवेळी प्रशिक्षण दिले जाते.

शासकीय व महानगरपालिकेच्या रुग्णालयांच्या संबंधित प्राधिकृत अधिकारी यांना अग्निसुरक्षिततेच्या दृष्टीने योजावयाच्या अग्निसुरक्षा उपाययोजनांचे सूचनापत्र देऊन त्रुटींची पूर्तता करण्यास सूचित करण्यात आले आहे व वेळोवेळी अग्निसुरक्षितते संदर्भातील अटी / शर्तींचे पालन लवकरात लवकर व्हावे याकरिता रुग्णालय प्रशासनास अवगत केले जाते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत रस्त्यावरील खड्डे बुजविण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या कोल्डमिक्सबाबत

**(५७) * १८९०० श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिका खड्डे मुक्त मुंबईसाठी यंदाही कोट्यवधींचा खर्च करीत असून पावसाळ्यात रस्त्यावरील खड्डे बुजविण्यासाठी कोल्डमिक्स बनविण्याची तयारी महानगरपालिकेने सुरु केली असून पालिकेच्या अस्फाल्ट प्लांटमध्ये दरवर्षी जवळपास ३,२०० कोल्डमिक्सचे उत्पादन केले जात असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पावसाळ्यात रस्त्यांवर पडलेले खड्डे कोल्डमिक्स वापरून बुजविले जात असले तरीही पावसात ते कोल्डमिक्स वाहून पुन्हा खड्डे पडल्याचा अनुभव अनेक वेळा नागरिकांना येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोल्डमिक्स वापर केल्यानंतर अवघ्या काही तासांमध्येच डांबर मिश्रित खडी वाहून ती रस्त्यांवर पसरल्याने अनेकदा अपघात होत असल्याचे आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, खड्यांसाठी कोल्डमिक्स तंत्रज्ञानाऐवजी महानगरपालिका प्रशासनाकडून इतर एक विशिष्ट तंत्रज्ञान वापरण्याबाबतची मागणी नागरिकांची असून शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीतील ६ मी व त्यापेक्षा कमी रुंदीच्या रस्त्यावरील खड्डे बुजविण्याकरिता महानगरपालिकेमार्फत अस्फाल्ट प्लांटमध्ये यावर्षी ३२०० मे.टन कोल्डमिक्सचे उत्पादन करण्यात येत आहे.

(२) व (३) सदर कोल्डमिक्स, डांबर मिश्रित खडी काही तासांमध्येच वाहून गेल्याच्या तसेच कोल्डमिक्स वापर केल्यानंतर अवघ्या काही तासांमध्येच डांबर मिश्रित खडी वाहून ती रस्त्यांवर पसरल्याने अपघात झाल्याच्या लिखित तक्रारी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या रस्ते व वाहतूक विभागास प्राप्त झालेल्या नाहीत.

(४) पावसाळयादरम्यान पाऊस पडत असताना रस्त्यावरील खड्डे कोल्डमिक्सद्वारे भरण्यात मर्यादा येत असल्याने बृहन्मुंबई महानगरपालिकेने मास्टीक अस्फाल्ट, रिऍक्टीव अस्फाल्ट व रॅपिड हार्डनिंग काँक्रीट हे तीन तंत्रज्ञान वापरण्याची उपाययोजना केली आहे. सदर तंत्रज्ञान वापरुन ६ मी. पेक्षा जास्त रुंदी असलेल्या रस्त्यांवरी खड्डे बुजवण्याची कामे प्रगतीपथावर आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत पुरविण्यात येणाऱ्या वैद्यकीय सुविधांमध्ये वाढ करण्याबाबत

**(५८) * १९९७७ श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईची लोकसंख्या ही दीड कोटींच्या वर असून बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत पुरविण्यात येणारी वैद्यकीय व्यवस्था ही अत्यंत अपुरी असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सद्य:स्थितीत मुंबईच्या लोकसंख्येच्या अनुषंगाने जवळपास १००० दवाखान्यांची आवश्यकता असताना प्रत्यक्षात मात्र बृहन्मुंबई महानगरपालिकेचे केवळ १८७ दवाखाने मुंबई क्षेत्रात कार्यरत असून त्यापैकी १६४ दवाखाने हे सकाळी ९ ते ४ तर १२ दवाखाने सकाळी ९ ते रात्री १२ पर्यंत सुरू असतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सद्य:स्थितीत मुंबईत कार्यरत असलेल्या बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सर्व दवाखान्यातील पदांपैकी जवळपास ३० टक्के पदेदेखील रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी मुंबई क्षेत्रातील सद्य:स्थितीत सुरू असलेल्या बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या दवाखान्यांच्या कार्यवेळेत वाढ करणे, लोकसंख्येच्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या दवाखान्यांची संख्या वाढविणे तसेच या दवाखान्यांमधील रिक्त पदे लवकरात लवकर भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

नागरिकांना आरोग्य सेवा पुरविण्याकरीता बृहन्मुंबई महानगरपालिकेची खालीलप्रमाणे वैद्यकीय व्यवस्था उपलब्ध आहे :-

- ४ प्रमुख रुग्णालये
- १ दंतचिकित्सा रुग्णालय
- १६ उपनगरीय रुग्णालये
- ५ विशेष रुग्णालये
- १९० दवाखाने
- २११ आरोग्य केंद्रे
- ३० प्रसुतीगृहे
- १६३ हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना
- २४ पॉलिक्लिनिक आणि डायग्नॉस्टीक केंद्र

यांच्यामार्फत नागरिकांना वैद्यकीय तपासणी, औषध उपचार व विविध प्रकारच्या रक्त चाचण्या इत्यादी आरोग्य विषयक सुविधा मोफत पुरविल्या जातात. तसेच २४ पॉलिक्लिनिक आणि डायग्नॉस्टीक केंद्रांसाठी विशेषतज्ञ सेवा (कान-नाक-घसा तज्ञ, नेत्रचिकित्सा, स्त्री-रोग तज्ञ, वैद्यकीय तपासणी तज्ञ, त्वचा रोग तज्ञ, दंतशल्य चिकित्सा, बालरोग तज्ञ इत्यादी) आठवड्यातून ठराविक दिवशी मोफत उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत.

(२) दर १५,००० ते २५,००० लोकसंख्येसाठी एक दवाखाना या प्रमाणे १६३ हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाने माहे जून,२०२३ पर्यंत सुरु करण्यात आले आहेत. तसेच अतिरिक्त ८७ हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना चालू करण्याची कार्यवाही महानगरपालिकेमार्फत सुरु आहे.

महानगरपालिकेच्या १९० दवाखान्यामार्फत व २४ पॉलिक्लिनिक आणि डायग्नॉस्टीक केंद्रामार्फत सकाळी ९.०० ते संध्याकाळी ४.०० वाजेपर्यंत आरोग्य सुविधा देण्यात येतात.

तसेच १६३ हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखान्यांमार्फत दुपारी ३.०० ते रात्री १०.०० वाजेपर्यंत आरोग्य सुविधा पुरविण्यात येतात. या १६३ दवाखान्यांपैकी ११ दवाखान्यामध्ये

सकाळी ७.०० ते दुपारी २.०० या अतिरिक्त वेळेमध्ये आरोग्य सुविधा मोफत पुरविल्या जातात.

(३) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या १९० दवाखान्यांमध्ये विविध संवर्गामध्ये एकूण १८२३ मंजूर पदे आहे. यापैकी १२४३ कार्यरत असून ५८० पदे रिक्त आहेत.

१६३ हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखान्यामधील सर्व पदे कंत्राटी तत्वावर भरण्यात आली आहेत.

(४) बृहन्मुंबई महानगरपालिकेचे १९० दवाखाने व २४ पॉलिक्लिनिक आणि डायग्नॉस्टीक केंद्र सकाळी ९.०० ते संध्याकाळी ४.०० वाजेपर्यंत सुरु असतात. तसेच १६३ हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना दुपारी ३.०० ते रात्री १०.०० वाजेपर्यंत सुरु असतात. या १६३ दवाखान्यांपैकी ११ दवाखाने हे सकाळी ७.०० ते दुपारी २.०० या अतिरिक्त वेळेमध्ये सुरु असतात.

नवीन ८७ हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना चालू करण्याची कार्यवाही महानगरपालिकेमार्फत सुरु आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या १९० दवाखान्यांमधील ५८० रिक्त पदांपैकी २२० पदे कंत्राटी तत्वावर भरण्यात आली असून उर्वरित पदे कंत्राटी तत्वावर भरण्याची कार्यवाही महानगरपालिकेमार्फत सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील बनावट पत्त्यावर खरेदी केलेल्या दुचाकी वाहनांची चौकशी करण्याबाबत

**(५९) * १९९०१ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदयुत (इलेक्ट्रीक) वाहनांना प्रोत्साहन मिळण्यासाठी दुचाकी वाहन खरेदीवर शासनाचे अनुदान मिळत असल्याने मुंबईत बनावट पत्त्यावर खरेदी केलेल्या सुमारे ५ लाख ६४ हजार दुचाकी वाहनांची चौकशी करण्यात येणार असल्याचे माहे मे,२०२३ च्या शेवटच्या आठवड्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासाठी शासनाने माहे एप्रिल, २०२२ पासून अनुदानाचे अंदाजे रुपये १,४०० कोटी रोखले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अशाप्रकारे बनावट पत्त्यावर वाहन खरेदी करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) नाही.

महाराष्ट्र इलेक्ट्रीक व्हेईकल प्रोत्साहन धोरण- मुंबईत २०२१ अन्वये, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, शासन निर्णय दिनांक २३/०७/२०२१ नुसार राज्यात विक्री कशी व नोंदणी झालेल्या फक्त बॅटरी झालेल्या संचालीत २०२३ इलेक्ट्रीक वाहनांना आर्थिक प्रोत्साहने देण्यात येतात.

सदर आर्थिक प्रोत्साहने दुचाकी, तीनचाकी व चार चाकी विद्युत वाहन खरेदीवर ईलेक्ट्रीक व्हेईकल | उत्पादक कंपनी (OEM) यांना प्रोत्साहन दिली जातात.

(२) व (३) महाराष्ट्र इलेक्ट्रीक प्रोत्साहन धोरण- २०२१ अन्वये पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग शासन निर्णय दिनांक २३/०७/२०२१ नुसार. राज्यात विक्री व नोंदणी झालेल्या फक्त बॅटरी झालेल्या संचालित इलेक्ट्रीक दुचाकी- २१९२८ वाहनांना रुपये ४२ कोटी. तीनचाकी-४१ वाहनांना रुपये ०.२७ कोटी व चार चाकी - ५१२० वाहनांना रुपये १०६.२७ कोटी असे एकूण रुपये १४८.५४ कोटी इतके विद्युत वाहन खरेदीवर इलेक्ट्रीक व्हेईकल उत्पादक कंपनी (OEM) यांना आर्थिक प्रोत्साहन म्हणून माहे एप्रिल २०२२ ते माहे मार्च, २०२३ पर्यंत एकूण रक्कम अनुदान वाटप करण्यात आले आहे.

ईलेक्ट्रीक वाहनांना देय असेलेली प्रोत्साहने दिनांक ०१/०४/२०२३ पासून सर्व संबंधित विभागामार्फत सन २०२१ ते २०२५ पर्यंत येणाऱ्या रुपये ९३०/- कोटीच्या खर्चास शासनाने मान्यता दिली.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## डोंबिवली औद्योगिक विभाग फेज दोनमधील रासायनिक सांडपाण्याच्या गळतीमुळे प्रदूषण होत असल्याबाबत

**(६०) * १९५६५ अ‍ॅड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोंबिवली औद्योगिक विभाग फेज दोन मधील रासायनिक प्रक्रिया केलेले सांडपाणी हे भूमिगत पाईपलाईनद्वारे निवासी भागातील डॉ.नानासाहेब धर्माधिकारी रोडवरून ते औद्योगिक विभाग फेज एककडे जात असून परिसरातील एका सोसायटीसमोर सदर पाईपलाईनच्या व्हॉल्वमधून रासायनिक सांडपाण्याची गळती सुरु असल्याची बाब माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रासायनिक सांडपाण्याच्या गळतीमुळे परिसरात मोठ्या प्रमाणात प्रदूषण होऊन दुर्गंधी पसरली असल्याने औद्योगिक निवासी विभागात वास्तव्यास असलेल्या रहिवाशांना आणि रस्त्यावरून ये-जा करणाऱ्या नागरिकांना त्याचा प्रचंड त्रास होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर परिसरातील रहिवाशांनी याबाबत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ व कल्याण डोंबिवली महानगरपालिका यांचेकडे तक्रार केली असून अद्याप यावर कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने रासायनिक सांडपाण्याची गळती रोखण्यासाठी पाईपलाईनची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) व (४) सदर विषयाच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत महाराष्ट्र औदयागिक विकास महामंडळास दिनांक १८/०४/२०२३ रोजी कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती. त्यानुषंगाने महाराष्ट्र औदयागिक विकास महामंडळाकडून सांडपाणी वाहिन्यांमधून सांडपाणी गळती होऊ न देण्यासाठी आवश्यक ती खबरदारी घेण्यात येत असल्याबाबत कळविण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या चालक व वाहकांनी स्वच्छ गणवेश धारण करण्याबाबतच्या आदेशाबाबत

**(६१) * १८८५१ श्री.अरुण लाड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एस.टी बसमध्ये कर्तव्यावर रुजू होताना जे चालक व वाहक स्वच्छ गणवेश परिधान करणार नाहीत त्यांच्यावर कारवाई करण्याबाबतचे आदेश सांगली जिल्ह्यातील आगार प्रमुखांना राज्यमार्ग परिवहन महामंडळाने दिले असल्याचे दिनांक ८ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यमार्ग परिवहन महामंडळाने सांगली विभागात गेल्या चार वर्षांपासून चालक-वाहकांना गणवेशच दिले नसल्यामुळे चालक वाहकांवर आपले नियमित कपडे घालून कर्तव्य बजवावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने त्याप्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे, बस चालक-वाहकांना सन २०१८-१९ च्या कार्यपध्दतीनुसार वर्षातून दोन गणवेश व धुलाई भत्ता देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय.

(२), (३) व (४) राज्यमार्ग परिवहन महामंडळातील कर्मचाऱ्यांना सन २०१५-१६, २०१६-१७ व २०१७-१८ या तीन वर्षासाठी प्रति कर्मचारी ४ गणवेश संचाचे डिसेंबर-२०१९ पर्यंत वाटप करण्यात आले.

सन २०१९-२० या वर्षासाठी मार्च-२०२३ मध्ये निविदा प्रसारित करण्यात आली आहे. राज्यमार्ग परिवहन महामंडळाचे कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक दिनांक ३० जून, २०१८ अन्वये राज्यमार्ग परिवहन कर्मचाऱ्यांना सर्व प्रकारच्या गणवेशासाठी रुपये १००/- रुपये इतका धुलाई भत्ता अनुज्ञेय करण्यात आला आहे.

-----------------

## समृध्दी महामार्गावरील वाढत्या अपघातांबाबत

**(६२) * १९२०१ डॉ.प्रज्ञा सातव, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, श्री.सचिन अहिर, ॲड.अनिल परब :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर ते मुंबई या समृध्दी महामार्गावर गत ५ महिन्यापासून ३५८ अपघात झाले असून त्यामध्ये ९५ लोकांचा मृत्यू झाला असल्याची बाब माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, समृद्धी महामार्गावर अपघातांची संख्या दिवसेंदिवस लक्षणीय वाढत असून मनुष्यहानी व मालमत्तेचेही मोठ्या प्रमाणात नुकसान होत असून समृध्दी महामार्गावर अपघात होण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, समृध्दी महामार्गावरील अपघातांना आळा घालण्याच्या दृष्टीने शासनाने कोणकोणत्या उपाययोजना केल्या आहेत वा करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) होय, अंशत: खरे आहे.
(२) नागपूर मुंबई शिघ्रसंचार द्रुतगती महामार्गावर (हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृध्दी महामार्ग) नागपूर ते शिर्डी दरम्यानचा ५२० किमीचा पहिला टप्पा दिनांक ११ डिसेंबर, २०२२ व शिर्डी ते भरवीर ८० किमीचा दुसरा टप्पा दिनांक २६ मे, २०२३ पासून वाहतुकीसाठी कार्यान्वित करणेत आलेला आहे.

विहीत मर्यादेपेक्षा जास्त वेगाने वाहने चालवणे, वाहन चालविताना दोन वाहनांमध्ये सुरक्षित अंतर न ठेवणे, चुकीच्या पध्दतीने ओव्हरटेकिंग करणे, लेन शिस्त न पाळणे, सुस्थितीत वाहने नसणे, वाहन अवैधरित्या पार्क करणे, वाहतूक सुरक्षततेविषयी काळजी न घेणे, तसेच ड्रायव्हिंग करताना ड्रायव्हर सतर्क नसणे इत्यादी द्रुतगती महामार्गावर अपघात होणेची प्रमुख कारणे आहेत.
(३) नागपूर मुंबई समृध्दी महामार्ग या द्रुतगती महामार्गावर ठिकठिकाणी वेगवेगळ्या वाहनांची वेगमर्यादा दर्शक फलके लावण्यात आली आहेत. तसेच, महामार्ग पोलीसांमार्फत व आरटीओमार्फत अपघात होऊ नये यांसाठी सुरक्षततेच्यादुष्टीने वाहनचालकांना वेळोवेळी समुपदेशन केले जाते.

नागपूर-मुंबई समृध्दी महामार्गावर महामार्ग पोलीसांमार्फत व आरटीओमार्फत Interceptor Vehicle द्वारे वाहनांचा वेग मोजून, वेग मर्यादा न पाळणाऱ्या वाहन चालकांवर दंड आकारणी करून रस्त्यांवर वेग नियंत्रित करण्यात येतो.

द्रुतगती महामार्गावरील अपघात टाळणेसाठी आवश्यक दिशादर्शक चिन्हे, सूचना फलके, माहिती फलके, वेगमर्यादा दर्शक फलके लावणे, लेन मार्किंग करणे, क्रॅटआईज व डेलिनेटर्स लावणे इ. उपाययोजना केलेल्या आहेत.

तसेच समृध्दी महामार्गावर ‘ Public Address System’ टोल प्लाझाच्या ठिकाणी लावण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सन २०२१ मधील नागपूर जिल्ह्यात नुकसानग्रस्त झालेल्या शेतकऱ्यांना आर्थिक मदत मिळण्याबाबत

**(६३) * १९३१६ श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर जिल्ह्यातील काटोल, नरखेड व कळमेश्वर तालुक्यात सन २०२१ मध्ये झालेल्या फळगळतीमुळे १७८८० संत्रा व मोसंबी उत्पादकांच्या झालेल्या नुकसानीची भरपाई अद्याप मिळालेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गतवर्षी झालेल्या अतिवृष्टी व अवकाळी पावसामुळे शेतातील इतर पिकासोबतच संत्रा व मोसंबी शेतकरी उत्पादकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्यामुळे सर्वेक्षण करून अहवाल पाठविण्याचे आदेश नसल्याने बागायतदार शेतकऱ्यांचा या नुकसान भरपाईत समावेश नसल्यामुळे ते आर्थिक

मदतीपासून वंचित राहिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जिल्हाधिकारी, नागपूर यांनी पाठविलेल्या सर्वेक्षण अहवालात नरखेड तालुक्यातील ६६६४ हेक्टर मधील संत्रा व मोसंबी पिकांचे नुकसान झाले असून यात जवळपास १४५२९ शेतकऱ्यांसाठी रुपये २४ कोटीच्या नुकसान भरपाईची मागणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नागपूर जिल्ह्यातील सन २०२१ मधील नुकसानग्रस्तांना रुपये २४ कोटींची आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल पाटील :** (१) होय, सन २०२१ च्या पावसाळी हंगामात अतिवृष्टीच्या निकषाबाहेरील पावसामुळे झालेल्या नुकसानीकरिता मदत अनुज्ञेय नसल्याने या प्रकरणी मदत देण्यात आलेली नाही, हे खरे आहे.
(२) नाही.
(३) होय.
(४) सन २०२१ च्या पावसाळी हंगामातील अतिवृष्टीच्या निकषा बाहेरील पावसामुळे झालेल्या शेती पिकांच्या नुकसानीकरिता मदत अनुज्ञेय नाही. नागपुर जिल्ह्यातील नरखेड तालुक्यातील माहे सप्टेंबर, २०२२ मधील नुकसानीसाठी मागणी करण्यात आलेली रुपये २४ कोटी रक्कम जिल्हाधिकारी, नागपूर यांचेकडे प्राप्त झाली असून सदर निधी वाटपाची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्य मार्ग परिवहन महामंडळाकडून प्रवाशांसाठी स्वस्त अल्पोपहार योजना पुन्हा सुरु करण्याबाबत

**(६४) * २०४५२ श्री.अनिकेत तटकरे, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या उपहारगृहांमध्ये प्रवाशांना रुपये ३०/ च्या दरात चहा, नाश्ता उपलब्ध व्हावा याकरिता स्वस्त अल्पोपहार ही योजना दिनांक ८ जुलै, २०१६ रोजी सुरु करण्यात आली असून सद्य:स्थितीत ही योजना बंद असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसगाड्यांमधून प्रवास करताना लांब पल्ल्याच्या मार्गावर प्रवाशांना नाश्ता, मोफत पाणी, जेवणाची सोय तसेच स्वच्छतागृहाची व्यवस्था यासाठी महामंडळाकडून काही हॉटेलसोबत करार करण्यात आले असूनही अनेक हॉटेलमध्ये चढ्या दराने खाद्य पदार्थ, पाणी प्रवाशांना विकत घ्यावे लागत आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर योजना बंद झाल्यामुळे राज्य मार्ग परिवहन महामंडळातील बसस्थानकांवर हॉटेल व्यावसायिकांची मक्तेदारी निर्माण झाली असून ही योजना पुन्हा सुरू करावी अशी मागणी प्रवाशांनी /विविध संघटनांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, बस स्थानकातील ३६५६ वाणिज्य आस्थापनांपैकी ८९२ आस्थापना रिक्त आहेत तसेच राज्य मार्ग परिवहन महामंडळ तोट्यात असून त्यास उभारी देण्यासाठी प्रवाशांचा प्रवास सुरक्षित व सुखकर

करण्याबाबत उक्त योजना सुरु करुन रिक्त पदे भरणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अल्पोपहार योजना पुन्हा सुरु करुन वाणिज्य आस्थापनेतील रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहेत,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२) व (३) नाही.

सदरची योजना कार्यान्वित आहे.

(४) राज्यमार्ग परिवहन महामंडळातील सर्व विभागातर्गत रिक्त वाणिज्य आस्थापनांकरिता निविदा प्रक्रिया राबवून परवानाधारकाची नियुक्ती करण्याबाबत विभागास वेळोवेळी सूचना देण्यात आल्या असून, कार्यवाही चालू आहे. तसेच राज्यमार्ग परिवहन महामंडळाच्या खाजगी हॉटेल थांब्यावर प्रवाशांना रुपये ३०/- इतक्या दरात चहा व नाश्ता उपलब्ध करून देण्याबाबतची योजना आज रोजी देखील कार्यान्वित आहे.
(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारितील खाजगी विनाअनुदानित शाळांना अनुदान मिळणेबाबत

**(६५)** * **१९३३७ श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारितील १०४ खाजगी विनाअनुदानित शाळांना अनुदान मिळावे यासाठी शिक्षक भारतीने मुंबईत आझाद मैदान येथे ८१ दिवसाचे धरणे आंदोलन केले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारित खाजगी अनुदानित शाळेतील विद्यार्थ्यांना महानगरपालिकेच्या विद्यार्थ्यांप्रमाणे २७ वस्तू मोफत देण्याची मागणी शिक्षक भारतीने केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महानगरपालिकेच्या खाजगी अनुदानित व विनाअनुदानित शाळांतील विद्यार्थ्यांना २७ वस्तू मोफत देण्याबाबत महानगरपालिका भेदभाव करीत असल्याच्या तक्रारी दूर करण्याबाबत महानगरपालिकेने काय कार्यवाही केली आहे,
(४) असल्यास, महानगरपालिकेच्या खाजगी अनुदानित व विनाअनुदानित शाळांतील विद्यार्थ्यांना २७ वस्तू मोफत देण्याबाबत महानगरपालिकेने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) बृहन्मुंबई महानगरपालिका मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक अनुदानित शाळेतील विद्यार्थ्यांना २७ वस्तु व इतर लाभ देणे ही बाब संबंधित शाळा व्यवस्थापनाशी निगडीत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र राज्य लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अन्वये देण्यात येणाऱ्या सेवांच्या दर्जाबाबत

**(६६) * १९८१६ श्री.सत्यजीत तांबे : दिनांक १८ ऑगस्ट, २०२२ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक १८ मधील प्रश्न क्रमांक १३१६७ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्य लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अन्वये देण्यात येणाऱ्या ५११ सेवांपैकी १६६ सेवा सुमार दर्जाच्या असल्याचा निष्कर्ष राज्य लोकसेवा हक्क आयोगाने आपल्या अहवालात व्यक्त केल्याची बाब माहे एप्रिल, २०२३ च्या अखेरीस निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महाराष्ट्र राज्य लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ ची अंमलबजावणी योग्यरितीने होत नसल्याने नागरिक त्यांच्या हक्कापासून वंचित राहिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सेवांचा दर्जा सुधारण्यासाठी शासनातर्फे कोणती कार्यवाही व उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) राज्य सेवा हक्क आयोगाच्या सन २०२१-२२ च्या वार्षिक अहवालामध्ये एकूण २१ प्रशासकीय विभागांच्या १६६ सेवा असमाधानकारक कामगिरी म्हणून लाल श्रेणीत वर्गीकृत करण्यात आल्या आहेत.
(२) हे खरे नाही.

राज्य लोकसेवा हक्क कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी सदर अधिनियमातील कलम-१३ अन्वये आयोगासाठी राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त कार्यालय, मुंबई व प्रत्येक महसुली विभागासाठी प्रत्येकी एक अशी सहा सेवा हक्क आयुक्त कार्यालय स्थापन करण्यात आलेली आहेत. तसेच दिनांक १२/०३/२०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार सर्व जिल्हाधिकारी यांना "नियंत्रक अधिकारी" म्हणून पदनिर्देशित करण्यात आलेले आहे. सन २०२१-२२ या वर्षात आपले सरकार पोर्टलवर ऑनलाईन स्वरूपात प्राप्त झालेल्या अर्जांपैकी विहीत वेळेत कार्यवाही केलेल्या अर्जांचे प्रमाण हे ९१.६६ टक्के इतके आहे.
(३) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग दिनांक २८/११/२०२२ अन्वये ज्या अधिसूचित सेवा ऑफलाईन देण्यात येतात त्या सेवा दिनांक ३१/१२/२०२२ नंतर फक्त ऑनलाईन स्वरूपातच देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई शहरामध्ये भूमिगत कचरापेटी बसविण्यात येणार असल्याबाबत

**(६७) * १९१२४ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातील महानगरपालिकेच्या विविध रुग्णालयांतील तसेच रस्त्यांवर इतरत्र पडणाऱ्या कचऱ्यांमुळे पसरणारी दुर्गंधी रोखण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाने भूमिगत कचरापेटी संकल्पना अंमलात आणली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू निर्णयाचे थोडक्यात स्वरूप काय आहे, शहरातील महानगरपालिकेच्या विविध रुग्णालयात कचरापेट्या बसविण्याबाबत निविदा प्रक्रिया राबविण्यात आली आहे काय आणि अंदाजे किती खर्च अपेक्षित आहे,
(३) असल्यास, भूमिगत कचऱ्यापेटयांना जमिनीखाली असलेल्या विविध प्राधिकरणांच्या उपलब्धतेबाबत समस्या निर्माण झाली असल्यामुळे भूमिगत कचरापेटीवर लाखो रुपये खर्च करुनही भूमिगत कचरापेटी संकल्पना अडचणीत येण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने भुमिगत कचरापेटी संकल्पना अंमलात आणण्यासाठी तसेच मुंबई शहर कचरामुक्त करण्याबाबत कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहेत,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.
(२) आधुनिक भूमिगत स्वरुपाच्या कचरा डब्यांमुळे कचऱ्याचा येणारा वास तसेच मोकाट जनावरे व कचरा वेचकांकडून पसरविण्यात येणाऱ्या कचऱ्यावर नियंत्रण येऊन रुग्णालय परिसर स्वच्छ राहील व परिसरातील आरोग्य राखले जाईल.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयाचा परिसर स्वच्छ व आरोग्यदायी राखण्याकरीता शहर विभागातील ०५ रुग्णालयामध्ये एकूण १५ आधुनिक भूमिगत स्वरुपाचे कचरा डब्बे बसविण्याकरिता निविदा मागविण्यात आली आहे.

भूमिगत स्वरुपाच्या कचरा डब्यांच्या उभारणीचा व ते कार्यान्वित करण्याचा कार्यालयीन अंदाजित खर्च रुपये २.४४ कोटी इतका अपेक्षित आहे. सदर खर्चामध्ये एक वर्षाच्या हमी कालावधी व त्यानंतर दोन वर्षांचा सर्वसमावेशक देखभालीचा खर्च अंतर्भूत आहे.
(३) हे खरे नाही.

भूमिगत कचरापेटी संकल्पना यशस्वीरित्या अंमलात आणण्यासाठी उपाययोजना म्हणुन रुग्णालयात ज्याठिकाणी भूमिगत कचरापेट्या बसविण्यात येणार आहेत त्याठिकाणी प्राथमिक तपासणी करुन जमिनीखालील उपयोगिता वाहिन्यांचे अस्तित्व पडताळणीकरीता महानगरपालिकेमार्फत ग्राऊंड पेनेट्रॅटींग रडार सर्व्हे करण्यात आला आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे जिल्ह्यातील इंदापूर, निमगाव, केतकी येथे बसेसची संख्या वाढविणेबाबत

**(६८) * १९५०३ श्रीमती उमा खापरे, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रामदास आंबटकर, ॲड.निरंजन डावखरे, प्रा.राम शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इंदापूर, निमगाव, केतकी (जि.पुणे) येथील बसथांब्यावर वेळेवर बस येत नसल्यामुळे विद्यार्थ्यांना खूप वेळ बसची वाट बघावी लागत असून सदर परिसराजवळील वरकुटे खुर्द, पिटकेश्वर, कचरवाडी तसेच वाड्या वस्तीवरील शेकडो विद्यार्थ्यांचीही गैरसोय होत असल्याची बाब माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर परिसरातील बहुसंख्य विद्यार्थ्यांना इंदापूर येथील महाविद्यालयात जाण्यासाठी पास सुविधा उपलब्ध असूनही विहित वेळेत बस सुविधा उपलब्ध करुन न देण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, इंदापूर, निमगाव केतकी व आजूबाजूच्या भागातील विद्यार्थ्यांची गैरसोय दूर करण्यासाठी नियमित वेळेत बसेस उपलब्ध करून देण्यासाठी तसेच सदर परिसरात बसेसची संख्या वाढविणेबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) नाही.
(२), (३) व (४) पुणे विभागातील निमगांव, केतकी हे गांव इंदापुर ते बारामती या मार्गावर रस्त्यालगतचे गांव आहे. इंदापुर आगारातुन इंदापुर ते बारामती शटल फेऱ्या चालनात आहेत. तसेच इंदापुर, बारामती व एमआयडीसी या ३ आगारांच्या लांब व मध्यम लांब पल्याच्या फेऱ्या चालनात आहेत.

परिसरातील गाव व इतर वाड्यावरील शेकडो विद्यार्थ्यांची गैरसोय होत नसुन सदर मार्गावरती जाणाऱ्या पंधरा मिनिटांच्या वारंवारितेने एकूण ५५ फेऱ्या उपलब्ध आहेत.

दिनांक १५ जून, २०२३ पासून शालेय फेऱ्या सुरू झालेल्या आहेत. त्यासाठी इंदापुर निमगांव केतकी या मार्गावर नियमित बसेस असून, इंदापुर ते ५४ फाटा इंदापुर अशी एक फेरी आणि इंदापुर ते व्याहाळी अशी दुसरी फेरी वाढवण्यात आलेली आहे.

-----------------

## राज्य माहिती आयोगाच्या मुख्य आयुक्त पदासह अन्य रिक्त पदे भरण्याबाबत

**(६९)** * **१९८६२ श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाच्या माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १५ (उपकलम-१)नुसार राज्यात एक मुख्य माहिती आयुक्त व ७ राज्य माहिती आयुक्त असलेला राज्य माहिती आयोग गठीत करण्यात आला असून सध्या राज्यातील मुख्य माहिती आयुक्तपदासह चार विभागीय आयुक्तपदे रिक्त असल्याने माहिती अधिकारात नागरिकांना माहिती मिळण्यास विलंब होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अनेक खंडपीठांमध्ये पाच वर्षांहून अधिक काळापासूनचे अर्ज अजूनही निकाली निघालेले नसल्याचे माहे मार्च, २०२३ अखेर निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुख्य माहिती आयुक्तांसह विभागीय माहिती आयुक्तांच्या पदावरील नेमणुका प्रलंबित असण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, रिक्त पदांमुळे प्रथम व द्वितीय अपिलांची प्रकरणे प्रलंबित राहत असल्याचेही निदर्शनास आले असून प्रलंबित प्रकरणे निकालात काढण्यासंदर्भात तसेच आयुक्तांची रिक्त पदे भरण्यासंदर्भात

शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) अंशतः खरे आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत नागरिकांना आवश्यक असणारी माहिती संबंधित सार्वजनिक प्राधिकरणाच्या जन माहिती अधिकाऱ्यांमार्फत पुरविण्यात येते आणि माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये प्रथम अपिलीय अधिकाऱ्याच्या निर्णयाविरुध्दचे दुसरे अपिल राज्य माहिती आयोगाकडे दाखल करता येते.

राज्य माहिती आयोग, मुख्यालय व अन्य खंडपीठांकडे माहे मे, २०२३ अखेर एकूण १०१३५० द्वितीय अपिले प्रलंबित आहेत.

(३), (४) व (५) राज्य माहिती आयुक्तांची रिक्त पदे भरण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे:- राज्य मुख्य माहिती आयुक्त व अन्य माहिती आयुक्त यांना माहिती अधिकार अधिनियमान्वये द्वितीय अपिलांवर कार्यवाही करण्यासंदर्भात अर्धन्यायिक स्वरुपाचे अधिकार आहेत.

प्रलंबित अपिलांचा निपटारा करण्यासाठी मुख्यालयाच्या स्तरावर विशेष मोहीम राबविण्यात आली होती.

राज्य माहिती आयोग कार्यालयात रिक्त असलेल्या राज्य माहिती आयुक्त पदांचा कार्यभार अन्य राज्य माहिती आयुक्तांकडे सोपविण्यात आला आहे.

महाराष्ट्र शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार राज्य मुख्य माहिती आयुक्त/ राज्य माहिती आयुक्त पदावरील नियुक्तीसाठी अस्तित्वात असलेल्या महाराष्ट्र राज्यातील नियुक्ती समितीस सहाय्य करण्यासाठी शासन निर्णय, दिनांक २२ फेब्रुवारी, २०१९ अन्वये शोध समिती (Search Committee) स्थापन केली आहे.

राज्य माहिती आयोगामध्ये राज्य माहिती आयुक्त यांची ३ रिक्त पदे भरण्यासाठी, विहित प्रपत्रात इच्छुक उमेदवारांचे अर्ज मागविण्यासाठी राज्यातील प्रमुख वर्तमानपत्रात (मराठी व इंग्रजी) आणि शासनाच्या संकेतस्थळावर दिनांक ७ फेब्रुवारी, २०२३ रोजी जाहीरात प्रसिध्द करण्यात आली होती. तसेच राज्य मुख्य माहिती आयुक्त यांचे पद भरण्यासाठी, विहित प्रपत्रात इच्छुक उमेदवारांचे अर्ज मागविण्यासाठी राज्यातील प्रमुख वर्तमानपत्रात (मराठी व इंग्रजी) आणि शासनाच्या संकेतस्थळावर दिनांक २४ फेब्रुवारी, २०२३ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. सदर जाहिरातीस अनुसरुन अर्ज प्राप्त झाले आहेत. सदर सर्व अर्जांची छाननी करुन, त्यांच्या नोंदी घेण्याचे काम सुरु आहे.

जाहिरातीत नमुद करण्यात आलेल्या अंतिम दिनांकापर्यंत प्राप्त झालेले अर्ज शासन निर्णय दिनांक २२ फेब्रुवारी, २०१९ अन्वये या प्रयोजनार्थ गठीत केलेल्या शोध समितीसमोर ठेवण्यात येतील. शोध समितीमार्फत अर्जदारांची संक्षिप्त यादी तयार केली जाते. प्राप्त झालेले सर्व अर्ज व सदर संक्षिप्त यादी अधिनियमातील कलम १५ (३) नुसार गठीत केलेल्या मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखालील समितीच्या विचारार्थ ठेवण्यात येतात.

माहिती अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत कलम १५(३)मधील तरतुदीनुसार, मा.राज्यपालांना राज्य मुख्य माहिती आयुक्त आणि राज्य माहिती आयुक्त नेमण्याची शिफारस करण्यासाठी, शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, दिनांक १५ मार्च, २०२३ अन्वये, मा.मुख्यमंत्री महोदयांच्या

अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे त्रिसदस्यीय समिती गठीत केली आहे.

१. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य ... अध्यक्ष;

२.विरोधी पक्ष नेता, विधान सभा, महाराष्ट्र राज्य ... सदस्य;

३.उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य ... सदस्य.

उपरोक्त समितीच्या शिफारशीनंतर मा.राज्यपाल महोदयांच्या मान्यतेनंतर राज्य माहिती आयुक्तांची नियुक्ती करण्यात येईल.

-----------------

## मुंबईतील हजारो टन कचऱ्यांमुळे समुद्रकिनाऱ्यांना तसेच कांदळवनातील जैवविविधतेला धोका झाल्याबाबत

**(७०) * १९६९४ श्री.जयंत पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील हजारो टन कचरा दररोज समुद्रात फेकला जात असून हा कचरा मांडवा, सासवणे, वर्सोली या समुद्रकिनाऱ्यावर वाहत येऊन यात प्लास्टिक कचऱ्याचे प्रमाण सरासरी ६० टक्के असून अलिबाग समुद्रकिनारी येणाऱ्या पर्यटकांकडूनही परिसरात कचरा टाकला जातो, त्यामुळे सागरी जिवांच्या अन्नसाखळीत बाधा येत असून मत्स्य दुष्काळाचे संकट निर्माण झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाढत्या कचऱ्यामुळे समुद्रकिनारे विद्रूप होत असून कचऱ्याचा सर्वाधिक प्रादुर्भाव कांदळवनांमध्ये दिसून येत असल्यामुळे कांदळवनांची जैवविविधता धोक्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गतवर्षी आझादी का अमृत महोत्सव अंतर्गत दिनांक ३ जुलै ते १७ सप्टेंबर दरम्यान व्यापक स्वरूपात स्वच्छ सुंदर समुद्रकिनारा हा उपक्रम राबवण्यात आला होता, त्याचबरोबर विविध सामाजिक संस्थांचे कार्यकर्ते ही सातत्याने किनाऱ्यावर स्वच्छता मोहीम राबवितात तरीही किनाऱ्यांवरील कचऱ्याची समस्या कायम आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कचऱ्यामुळे होत असलेल्या समुद्रकिनाऱ्यांचे तसेच कांदळवनांचे रक्षण करण्याबाबत तसेच कचऱ्याची विल्हेवाट लावण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) उपवनसंरक्षक अधिकारी, अलिबाग-रायगड, ता.अलिबाग, जि.रायगड यांनी दिनांक ०७/०७/२०२३ रोजीच्या पत्रान्वये सदर बाब अलिबाग वन विभागाच्या निदर्शनास आलेली नाही असे कळवले आहे.

(३) हे अंशत: खरे आहे.

(४) अलिबाग नगरपरिषद यांनी दिनांक ०५/०७/२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे की, समुद्रकिनारी वाहत आलेला कचरा हा समुद्रकिनारा स्वच्छता मशिनद्वारे संकलित करण्यात येतो. तसेच पर्यटकांकरिता ठिकठिकाणी कचऱ्याचे डस्टबिन ठेवण्यात आलेले आहे व समुद्रकिनारी स्वच्छता करणेकरीता सफाई कामगारांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांचेद्वारे दररोज कचरा संकलित केला

जातो व सदर कचऱ्याची विल्हेवाट ही नगरपरिषदेच्या MRF प्रकल्पावर लावण्यात येते.

उपमुख्य कार्यकारी अधिकारी रायगड जिल्हा परिषद, अलिबाग यांनी दिनांक ०७/०७/२०२३ रोजी कळविल्याप्रमाणे ग्रामपंचायतीच्या आर्थिक परिस्थितीनुसार ग्रामपंचायतीमार्फत खाडीलगत येणारा कचरा उचलण्याचा प्रयत्न केला जातो.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## दिघा (नवी मुंबई) येथील बेकायदेशीर बांधकामांना नवी मुंबई महानगरपालिकेकडून नोटिस दिल्याबाबत

**(७१) * १९८२७ श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रसाद लाड, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रामदास आंबटकर, श्रीमती उमा खापरे, श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिघा (नवी मुंबई) येथील बेकायदेशीर बांधकामांना एमआरटीपी अंतर्गत नोटीसा बजाविणाऱ्या नवी मुंबई महानगरपालिकेच्या ऐरोली विभागाच्या कार्यालयाच्या इमारतीला भोगवटा प्रमाणपत्र नसल्याची माहिती माहितीच्या अधिकारातून निदर्शनास आल्याची बाब माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सेक्टर ३ (ऐरोली) येथील नवी मुंबई महानगरपालिकेचे जी विभाग कार्यालय, मालमत्ता कर संकलन आणि प्रशासकीय महसूल विभागाच्या तलाठी कार्यालयाच्या कामासह नागरिक/ संस्थांची सर्व कामे या कार्यालयातून केली जातात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन १९९२ मध्ये नवी मुंबई महानगरपालिकेच्या स्थापनेनंतर ग्रामपंचायत कार्यालयाचे वार्ड कार्यालयात रुपांतर करण्यात आले असून सन १९९० मध्ये सीसीओसी घेतली जात नसल्यामुळे आराखडा द्यावा लागत होता, परंतु सन २००७ मध्ये शासकीय इमारतींना सुद्धा सीसीओसी घेण्याचा अधिकार देण्यात आल्यामुळे सन २००१ पूर्वीच्या इमारतींना सीसीओसी नाही तसेच खाजगी इमारतींना सुद्धा हा निर्णय लागू राहणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) सदर इमारतीचे बांधकाम सन २००० पूर्वी पूर्ण झाले असल्याने, सदर इमारतीकरीता सीसीओसी लागू नाही.

तथापि, खाजगी इमारतींकरिता महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ४४ अन्वये, केंद्र किंवा राज्य शासन किंवा स्थानिक प्राधिकरण व्यतिरिक्त इतर बांधकामास नियमावली नुसार बांधकाम परवानगी व भोगवटा प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## लातूर महानगरपालिकेच्या हद्दीमधील जमिनींच्या मालमत्ता कराचा भरणा महानगरपालिकेत होत नसल्याबाबत

**(७२) * १९८९७ श्री.सुरेश धस :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातुर महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये येणाऱ्या काही सर्व्हे. नंबर उदा.२६२,२६३ इ.मध्ये मालमत्ता कर भरणा होत नाही हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिकेच्या जुन्या हद्दीमध्ये सन १९८८ मध्ये असलेले सर्व्हे नंबर हे महानगरपालिका हद्दीत येत असतानाही येत नसल्याचे लिहून दिल्या कारणांनी महानगरपालिकेचा कोटयावधी रुपयांचा महसूल बुडविण्यात आलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सर्वे नंबर २६२,२६३ इ.महानगरपालिका हद्दीमध्ये असताना सुद्धा ते महानगरपालिका हद्दीत येत नसल्याचे लिहून दिल्याकारणाने सदरील सर्व्हे नंबरचा नव्याने स्थापन झालेल्या काशी लिंगेश्वर या ग्रामपंचायत मध्ये समावेश करण्यात आलेला असल्याने महानगरपालिकेचा कोटयावधी रुपयांचा महसूल बुडाला आहे हे खरे आहे काय,

(४) असल्यास, महानगरपालिकाने या सगळया सर्व्हे नंबर मध्ये बांधकाम परवानगी व सर्व सोयी सुविधा देउनही सदरील सर्व्हे नंबर मधील मालमत्ता कराचा भरणा हा पालिकेत केला जात नसल्याने याबाबत चौकशी करण्यात येऊन सबंधितांवर कारवाई करण्यासाठी शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

श्री.सु.ज.देशपांडे, तत्कालीन नगररचनाकार, लातूर शहर महानगरपालिका यांनी तहसिलदार, लातूर यांनी दिलेल्या यादीतील सर्वे नंबर २६२,२६३ इ. हे हद्दी बाहेर असल्याबाबत कोणतीही शहानिशा न करता व आयुक्त, लातूर शहर महानगरपालिका यांची मान्यता न घेता परस्पर कळविले आहे.

त्यामुळे लातूर शहर महानगरपालिकेच्या अंतर्गत काशी लिंगेश्वर नगर या भागातील मालमत्ता कर, पाणी कर, विकास शुल्क यामधून मिळणाऱ्या उत्पन्नावर परिणाम झाला असल्याचे लातूर शहर महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) लातूर शहर महानगरपालिकेने, काशी लिंगेश्वर नगर येथील लातूर शहर महानगरपालिकेच्या हद्दीतील येणारे सर्वे नंबर दुरुस्ती बाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, लातूर यांचेकडे दिनांक २/०१/२०२३ रोजी सादर केला आहे.

या प्रकरणी तत्कालीन नगररचनाकार, लातूर शहर महानगरपालिका यांच्याविरुध्द योग्य ती कार्यवाही करण्याबाबत आयुक्त, लातूर शहर महानगरपालिका यांचेकडून प्राप्त अहवालावर संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडून अहवाल मागविण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद येथील गितानगरमध्ये सिडकोच्या आरक्षित जागेवर नगररचना विभागाने गुंठेवारी करुन दिल्याबाबत

**(७३) * १९९९८ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद शहरातील रोजेबाग परिसरातील गितानगर येथे सिडकोच्या आरक्षित जागेवर काही भागात अतिक्रमण झाले असून, उर्वरित खुल्या जागेवर काही नागरिकांनी बाँड पेपर, रजिस्ट्रीच्या आधारे दावा केला असून, महानगरपालिकेच्या नगररचना विभागाने गुंठेवारी कायद्यानुसार शहानिशा न करता गुंठेवारी करून दिल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यापुर्वीही नगररचना विभागाने आरक्षित जागेवरच्या बांधकाम परवानग्या, प्रकल्प पूर्ण होण्यापुर्वीच भोगवटा प्रमाणपत्र, डबल टीडीआर दिल्याचे अशा अनेक बाबी निदर्शनास आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय चौकशीच्या अनुषंगाने संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) मौजे.गितानगर रोजेबाग, औरंगाबाद येथील सर्व्हे क्र.११७/१,भूखंड क्र.६ व ७ या मिळकतीवर अर्जदार श्री.मोहम्मद युसुफ सज्जाद खान यांच्या विनंतीनुसार औरंगाबाद महानगरपालिकेमार्फत गुंठेवारी कायद्यांतर्गत सदर मिळकतीचे नियमितीकरण दिनांक ५/०१/२०२३ रोजी करण्यात आले होते.

तथापि, सिडकोने दिनांक २४/०५/२०२३ रोजी सदर गुंठेवारी रद्द करण्याबाबत केलेल्या विनंतीनुसार महानगरपालिकेमार्फत गुंठेवारी दिनांक ६/०६/२०२३ रोजी रद्दबातल करण्यात आली आहे.

याविरोधात अर्जदाराने मा.न्यायालयात आर.सी.एस.क्र.२६/२०२३ अन्वये दावा दाखल केला असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही

-----------------

## मराठा समाजाला आरक्षण देण्याबाबत

**(७४) * १९०४५ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमोल मिटकरी : तारांकित प्रश्न क्रमांक १५५७७ ला दिनांक २१ डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर राज्य सरकारने केलेली पुनर्विचार याचिका मा.सर्वोच्च न्यायालयाने फेटाळल्यामुळे राज्यातील मराठा समाजात असंतोष निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मराठा समाजाला आरक्षण देण्याबाबत क्युरेटीव्ह पिटिशन दाखल करण्याबाबत तसेच यासंदर्भातील इतर बाबींबाबत राज्य शासन स्तरावरून काय कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(३) असल्यास, केंद्र सरकारने ५० टक्के आरक्षण मर्यादा शिथिल करावी याबाबत राज्य सरकारकडून केंद्राकडे कोणत्या बाबींचा पाठपुरावा करण्यात आला आहे काय अथवा सद्य:स्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ५/०५/२०२१ च्या आदेशान्वये सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास (SEBC) वर्गाचे आरक्षण रद्द केल्यामुळे राज्य शासनाने त्याविरोधात पुनर्विचार याचिका क्र.१४/२०२२ दाखल केली होती. सदर पुनर्विचार याचिका दिनांक ११/०४/२०२३ रोजी फेटाळण्यात आल्यामुळे त्याविरुध्द मा.सर्वोच्च न्यायालयात उपचारात्मक याचिका (Curative Petition) दाखल केली आहे. सदर उपचारात्मक याचिकेमध्ये तसेच, मराठा आरक्षण प्रकरणी उद्भवणाऱ्या सर्व न्यायालयीन प्रकरणी शासनाच्या वतीने प्रभावी बाजू मांडण्यासाठी ज्येष्ठ विधिज्ञांचा एक टास्क फोर्स स्थापन करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.

मा.सर्वोच्च न्यायालयाने उपचारात्मक याचिका (Curative Petition) फेटाळल्यास मराठा समाजास आरक्षण देण्यासाठी त्या समाजाचे सामाजिक व शैक्षणिक मागासलेपण तपासण्यासाठी एक समर्पित मागासवर्ग आयोगाचे गठन करण्यात येईल. तसेच, दिनांक ९/१०/२०२० च्या शासन निर्णयान्वये मराठा समाजास विविध सवलती देण्यात आल्या आहेत.
(३) आरक्षणाची ५० टक्क्याची मर्यादा उठविण्याचा अधिकार केंद्र शासनास आहे. त्यामुळे मा.न्यायालयाच्या न्यायनिर्णयामध्ये आरक्षणाची निश्चित केलेली ५० टक्के इतकी मर्यादा शिथिल करुन भारताच्या संविधानात यथोचित सुधारणा करण्याचा ठराव महाराष्ट्र विधानमंडळाने दिनांक ५/०७/२०२१ रोजी केला असून, सदर ठराव उचित कार्यवाही करण्यासाठी केंद्र शासनास पाठविला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## उंब्रज (ता.कराड, जि.सातारा) येथील भूकंपग्रस्त व पुरग्रस्त भूखंड धारकांची ७/१२ वर नोंद घेण्याबाबत

**(७५) * १९१४४ श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उंब्रज (ता.कराड, जि.सातारा) येथे सन १९६७ मध्ये झालेल्या भुकंपात अनेकांची घरे जमिनदोस्त झाली आहेत, तसेच सन १९७६ मध्ये कृष्णा नदीला आलेल्या महापुरामुळे बेघर झालेल्यांना उंब्रज गावातील सर्व्हे नंबर ४५/१, ४५/२ आणि ४५/३ हे क्षेत्र पुनर्वसन करण्यासाठी त्यांना देण्यात आले असूनही ११६ प्लॉटची आखणी करण्यात येऊन ११६ भूखंडापैकी केवळ २७ भूखंडधारकांचीच ७/१२ वर नोंद करण्यात आली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उर्वरित भूखंडधारकांची ७/१२ वर लवकारात लवकर नोंद करण्याबाबबत भुकंपग्रस्त व पूरग्रस्त यांनी संबधिताकडे मागणी करुनही तसेच सभागृहात प्रश्न उपस्थित करण्यात येऊनही अदयापी भूखंडधारकांची ७/१२ नोंद करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रस्तुत ठिकाणी अस्तित्वात असलेल्या भूकंपग्रस्त व पूरग्रस्त गावठाणामध्ये उप अधीक्षक, भूमी अभिलेख, कराड यांचेमार्फत सध्याच्या वहिवाटीनुसार मोजणी पूर्ण झाल्यावर तयार झालेल्या रेखांकनाच्या नकाशास नगररचना विभागाची मान्यता घेवून पात्र भूकंपग्रस्त व पूरग्रस्त धारकांची नावे ७/१२ वर दाखल करण्याची कार्यवाही जिल्हाधिकारी यांचेकडून करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पात्र भूकंपग्रस्त व पूरग्रस्त यांची ७/१२ वर नोंद करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल पाटील :** (१), (२) व (३) हे खरे आहे.
(४) जिल्हाधिकारी, सातारा यांचेमार्फत चौकशी करुन कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विविध विभागांतील अभियंता संवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(७६) * १८८७४ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस : दिनांक २१ डिसेंबर, २०२२ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ५ मधील प्रश्न क्रमांक १३९४७ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या २४ विभाग कार्यालयांसह विविध विभागात अभियांत्रिकी संवर्गातील दुय्यम व कनिष्ठ अभियंत्यांची ३८० पदे रिक्त असल्याने महानगरपालिकेच्या विविध नागरी सेवांसह सुविधा प्रकल्पांवर त्याचा विपरीत परिणाम होत असल्याची बाब दिनांक २३ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेतील घनकचरा व्यवस्थापन विभागामध्ये प्रमुख अभियंत्यांची जागा १०० टक्के रिक्त, कनिष्ठ अभियंत्यांच्या ५० टक्के जागा रिक्त असल्याचे तसेच सन २०२० ते २०२२ दरम्यान सहायक कार्यकारी अधिकाऱ्यांच्या रिक्त पदांची संख्या ३५ टक्क्यांहून ७६ टक्क्यांपर्यंत वाढली असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, घनकचऱ्याचे व्यवस्थापन आणि विल्हेवाटीसाठी कचरा निर्मितीची नियमित माहिती गोळा करण्यासाठी कोणतीही रचना नसल्यामुळे अनेक विभागात निर्माण होणाऱ्या कचऱ्याच्या माहितीत विसंगती होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेतील विविध विभागातील रिक्त पदे तातडीने भरण्याचे निर्देश मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिनांक १३ ऑगस्ट, २०२२ रोजी प्रशासनाला दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिलेल्या निर्देशांन्वये बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या घनकचरा विभागातील प्रमुख अभियंत्याची तसेच २४ विभाग कार्यालयांसह विविध विभागातील अभियंता संवर्गातील दुय्यम व कनिष्ठ अभियंत्यांची रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या २४ विभाग कार्यालयांसह विविध विभागात अभियांत्रिकी संवर्गातील दुय्यम व कनिष्ठ अभियंत्यांची ६७१ पदे रिक्त आहेत.
(२) घनकचरा व्यवस्थापन विभागामध्ये प्रमुख अभियंत्यांच्या २ पदांपैकी १ पद दिनांक ०१/०२/२०२३ पासून व १ पद दिनांक १५/०६/२०२३ पासून रिक्तआहे.

तसेच कनिष्ठ अभियंत्यांच्या ३६ पदांपैकी १७ पदे रिक्त आहेत.

बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये ‘सहाय्यक कार्यकारी अधिकारी’ हे पद अस्तित्वात नाही. परंतु, महानगरपालिकेतील कार्यकारी सहाय्यक या संवर्गाच्या एकूण ५४८६ पदांपैकी २८७९ पदे रिक्त आहेत.
(३) बृहन्मुंबई महानगरपलिकेमार्फत घनकचऱ्याचे व्यवस्थापन व विल्हेवाट लावण्यासाठी प्रणाली कार्यरत आहे. यामध्ये माहिती तंत्रज्ञानचा वापर करुन माहिती प्राप्त करण्यावर भर देण्यात येतो.

महानगरपालिकेमधील कचऱ्याची वाहतूक करण्याऱ्या वाहनावर जी.पी.एस. प्रणाली कार्यरत आहे. त्यामुळे वाहनांचे सटीक स्थान माहिती होण्यास मदत होते. तसेच सर्व वाहनांवर वेहिकल ट्राकिंग मॉनिटरींग सिस्टीम कार्यरत आहे. त्यामुळे वाहनांच्या फेऱ्यांचे निश्चित मार्ग कळण्यास मदत होते. सदर वाहन क्षेपनभूमीवर आल्यानंतर त्या गाडीचे वजन वे-ब्रिज (Weigh Bridge) प्रणालीने मोजणी केली जाते. वे-ब्रिज मॅनेजमेंट सिस्टीममध्ये कचऱ्याची माहिती (वजन) ठरविण्याचे काम करण्यात येते.

संगणीकृत माहिती संकलित केल्यामुळे सदर माहिती अचूक असते. त्यामुळे कचऱ्याच्या गाड्यांची व त्यामधून वाहून नेणाऱ्या कचऱ्यांच्या माहितीमध्ये विसंगती आढळून येत नाही.
(४) हे खरे आहे.
(५) घनकचरा व्यवस्थापन खात्यातील प्रमुख अभियंता (घनकचरा व्यवस्थापन) व प्रमुख अभियंता (घनकचरा व्यवस्थापन) प्रकल्प ही दोन्ही पदे रिक्त आहेत. तथापि, सदर दोन्ही पदांचा कार्यभार उप प्रमुख अभियंता संवर्गातील अधिकाऱ्यांकडे सोपविण्यात आलेला आहे. प्रमुख अभियंता (घनकचरा व्यवस्थापन) व प्रमुख अभियंता (घनकचरा व्यवस्थापन) प्रकल्प ही पदे ‘उप प्रमुख अभियंता’ या संवर्गातून पदोन्नतीने भरण्यात येतात. तथापि, ‘प्रमुख अभियंता’ पदाकरिता आवश्यक असलेला २ वर्षाच्या अनुभवाची अट कार्यरत उप प्रमुख अभियंता माहे नोव्हेंबर २०२३ मध्ये पूर्ण करत आहेत. त्यामुळे, सद्य:स्थितीत महानगरपालिकेमार्फत सदर पदे भरण्यात आलेली नाहीत.

बृहन्मुंबई महानगरपालिकेमधील दुय्यम व कनिष्ठ अभियंता संवर्गातील रिक्त पदे भरण्याकरीताच्या प्रस्तावास सक्षम अधिकाऱ्यांची मंजुरी प्राप्त झाली आहे. सद्य:स्थितीत सरळसेवा अंतर्गत विविध संवर्गाच्या बिंदुनामावली नोंदवही पडताळणीबाबतची कार्यवाही सुरु आहे. सदर पडताळणीनंतर सरळसेवेची रिक्त पदे भरण्याची कार्यवाही महानगरपालिकेमार्फत करण्यात येणार आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शासकीय जाहिरातींवर मोठ्या प्रमाणावर खर्च झाल्याबाबत

**(७७) * १८८६४ श्री.अरुण लाड, श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात नव्याने सरकार स्थापन झाल्यापासून शासनाने ५२ कोटी ९० लाख ८० हजार रुपये जाहिरातींवर खर्च करण्यास मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे झालेल्या नुकसानाकरिता त्यांना मदत न करणे, शासनावर असलेले कर्ज यासारख्या अनेक समस्या असताना शासकीय जाहिरातींवर मोठ्या प्रमाणावर खर्च करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, यापुर्वी शासकीय जाहिरातीवर ४२ कोटी रुपये खर्च केल्यानंतर आता शासन आपल्या दारी या जाहिरातींवर ५२ कोटी ९० लाख रुपये खर्च केल्याची बाब दिनांक १९ मे, २०२३ रोजी माहिती अधिकारात निर्दशनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, हा खर्च कमी करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय.

(२) शासकीय योजना लोकाभिमुख करुन त्यांची अंमलबजावणी गतिमान करण्यासाठी नियोजन विभागाने दिनांक १३/०४/२०२३ च्या शासन निर्णयान्वये राबविलेल्या "शासन आपल्या दारी" या उपक्रमाच्या अनुषंगाने जन कल्याणाशी संबंधित विविध शासकीय योजनांची माहिती नागरिकांना होण्याच्या दृष्टीने दिनांक १८/०५/२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये शासकीय योजनांच्या जाहिराती विविध प्रसिद्धी माध्यमांद्वारे माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत विशेष प्रसिद्धी मोहीम राबविण्यासाठी येणाऱ्या रुपये ५२ कोटी ९० लाख ८० हजार इतक्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात आली आहे.

या अभियानांतर्गत विविध लोकप्रतिनीधींनी केलेल्या मागणीनुसार विविध शासकीय योजनांचे लाभ गरजू नागरिकांना एका छताखाली तसेच कमीतकमी कालावधीत मिळण्याच्या दृष्टीने शासकीय योजनांची प्रचार व प्रसिद्धी करण्यात आली आहे.

(३) होय.

(४) लोकाभिमुख योजना / शासन निर्णय लोकांपर्यंत पोहोचविणे आवश्यक असल्याने सदर खर्च काटकसरीनेच करण्यात आलेला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर जिल्ह्यातील मोवाड नगरपरिषदेंतर्गत मुलभूत सोयीसुविधा उपलब्ध करून देण्याबाबत

**(७८) * १९३२१ श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्रातील मोवाड (जि.नागपूर) नगरपरिषदेस दिनांक १७ मे, १८६७ रोजी मान्यता मिळाली असून मोवाड नगरपरिषदेचा (ता.नरखेड) १५६ वा स्थापना दिवस दिनांक १७ मे, २०२३ रोजी साजरा करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन १९९१ च्या महापुरानंतर मोवाड हे गाव पूर्णतः उध्दवस्त झाले असून २२४ नागरिकांना जलसमाधी प्राप्त होवूनही अद्यापही आवश्यक सोयीसुविधा मोवाड नगरवासियांना उपलब्ध झालेल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मोवाड नगरपरिषदेंतर्गत आवश्यक मुलभूत सोयीसुविधा पुरविणे, वर्धा नदीवर सिंचनासाठी मोठ्या बंधाऱ्यांची निर्मिती करणे, संत्रा उत्पादक शेतकऱ्यांसाठी कोल्ड स्टोरेज व वेअरहाऊस निर्माण करणे, जुन्या मोवाडला पर्यटन स्थळाचा दर्जा देणे, आवश्यक रस्ते विकास तथा शहरात आरोग्याच्यादृष्टीने १०० बेडचे ग्रामीण रूग्णालय उभारणे तसेच शहराकरिता मुबलक पाणीपुरवठा उपलब्ध करून देणे इत्यादी सुविधा देण्याबाबत मोवाड नगरपरिषदेने आवश्यक ती कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने ऐतिहासिक वारसा प्राप्त मोवाड नगरपरिषदेंतर्गत आवश्यक सर्व सोयीसुविधा उपलब्ध करुन देणेबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) मोवाड नगरवासियांना सोई-सुविधा उपलब्ध झालेल्या नाहीत, ही बाब खरी नाही.

• शासनाने मागील ५ वर्षात मोवाड नगरपरिषदेकरीता वैशिष्ट्यपूर्ण योजनेंतर्गत रुपये २.७८ कोटी, सर्वसाधारण रस्ता अनुदान रुपये ७० लाख, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजनेंतर्गत रुपये २.१३ कोटी, नागरी दलितेत्तर वस्ती सुधार योजनेंतर्गत रुपये १.४५ कोटी, महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजना यामध्ये रुपये ७४.२० लाख, १४ व्या वित्त आयोगामध्ये रुपये १.८१ कोटी, १५ व्या वित्त आयोगामध्ये रुपये १.४४ कोटी व स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत रुपये ७८.५४ लाख इतका निधी उपलब्ध करुन दिला आहे.

• तसेच महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत दिनांक १५/१२/२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये मोवाड नगरपरिषदेकरिता रुपये ८.०७ कोटी रकमेच्या पाणीपुरवठा प्रकल्पास शासनाने प्रशासकीय मान्यता दिली आहे.

• वर्धा नदीवर नरखेड तालुक्यातील काही भाग उर्ध्व वर्धा प्रकल्पाच्या पाणलोट क्षेत्रात वर्धा उपखोऱ्यात येत असून या क्षेत्रात नवीन प्रकल्पासाठी पाणी उपलब्ध नसल्याने नवीन प्रकल्पाचे नियोजन करता येत नाही.

• सन २०२३-२४ या वर्षाकरीता नागपूर जिल्ह्यासाठी कोल्ड स्टोरेजकरीता सर्वसाधारण

घटकाकरिता १ कोल्ड स्टोरेजचा लक्ष्यांक दिला असून यासाठी ११ अर्ज प्राप्त झाले आहेत. त्याबाबतची कार्यवाही महाराष्ट्र राज्य फलोत्पादन आणि औषधी वनस्पती मंडळ, पुणे यांच्याकडे सुरु आहे.

• जुन्या मोवाडला पर्यटन स्थळाचा दर्जा देण्याबाबत कोणताही प्रस्ताव पर्यटन संचालनालयास प्राप्त झालेला नाही.

• सदर ठिकाणी अस्तित्वात असलेल्या प्राथमिक आरोग्य केंद्र, मोवाड श्रेणीवर्धन करुन ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालय मंजूर करण्याबाबत प्रस्ताव सादर करण्याची कार्यवाही सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :** **जितेंद्र भोळे**
**मुंबई.** **सचिव-१ (का.),**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.